मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र-ज्येष्ठ १९३६

एप्रिल-जून २०१४ / खंड ३८ अंक १

## आर्थिक महाराष्ट्र विशेषांक



## मराठी अर्थशास्त्र परिषद

# ३८ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, अकोला

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अडतिसावे वार्षिक अधिवेशन श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे दि. ७, ८ व ९ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. जळगाव येथील डॉ. श्रीराम जोशी हे अध्यक्षस्थान भूषवतील. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) मौद्रिक क्षेत्र व वास्तव क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैध्दांतिक विवेचन.

२) जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल.

३) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल सद्यस्थिती व आव्हाने.

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील.

◆

डॉ. श्रीराम जोशी,
अध्यक्ष

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष

प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे,
स्थानिक कार्याध्यक्ष

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार

डॉ. रामेश्वर भिसे,
स्थानिक कार्यवाह
भ्रमणध्वनी: ९९७०१५१३४८

डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक
अर्थसंवाद

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

एप्रिल-जून २०१४ / खंड ३८ अंक १

International Research Journal
ISSN 0973-8452
Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**
**अविनाश रामलाल निकम**

**सहाय्यक संपादक**
शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**
(२०१२-१५)
प्रशांत काटोले
अशोक खाचणे
राहुल म्होपरे
अशोक हळ्ळी

**संपादकीय पत्रव्यवहार**
**डॉ.अविनाश निकम**
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद.............................................०१
संतोष दास्ताने, पुणे
अर्थशास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक डॉ.आनंद नाडकर्णी.........०३
कुंडलिक भिमराव चौगुले, अलिबाग
महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांचा विकास........०७
माधव शिंदे, अहमदनगर
महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील संक्रमण: एक मागोवा..........१३
शशिकांत चंद्रकांत आंडगे, मोहोळ
शेतमाल निर्यात वाढीस म.रा.कृ.पणन मंडळातर्फे प्रोत्साहन...१९
मधुकर रामचंद्र वेदपाठक, मुरूड-जंजीरा
कोरडवाहू शेतीअभियानाद्वारे शाश्वतीकरण...................२६
रामकृष्ण टाले, खापरखेडा, मनिष कायरकर, बल्लारपूर
महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग....................................३२
दिपक चौधरी, मुंबई, अशोक खाचणे, जळगाव
महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल: एक दृष्टिक्षेप..............४३
धनाजी बाबुराव इंगवले, तिसंगी
महाराष्ट्रातील नागरीकरण: स्वरूप व कारणे..................४९
श्रीमती बी. डी. पाटील, ओझर-मिग
महाराष्ट्रातील महिला नागरी सह. बँका: वास्तव व अपेक्षा....५४
नलिनी पाचर्णे, पुणे
महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विविध पैलू.......................५९
दिलीप रामभाऊ जगताप, नंदुरबार
महाराष्ट्राची अर्थव्यवस्था: विविध पैलू...................... ६५
गजानन भाकरे, कोल्हापूर
महाराष्ट्रातील बँकींग क्षेत्र-नागरी बँका: एक दृष्टिक्षेप......... ७१
वनिता चोरे, चांदुरबाजार
महाराष्ट्रातील कृषि विकास: शासकिय धोरण.............. ७७
कल्पना भागवत, धुळे; वर्षा नेहेते, भालोद
अस्मानी संकट: महाराष्ट्रातील शेती उत्पादन................... ८३
आर.के.नाळे, सरूड
महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक-स्वरूप .............. ९०
संभाजी गोपाळा शिंदे, पिंपरी
महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विशेष पैलू..................... ९६
निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी रूपरेषा
दि.व्यं.जहागिरदार, व्ही.बी. भिसे, विनायक देशपांडे....... १०३
ज.फा.पाटील,कोल्हापूर-अर्थ शब्दांची वाट पाहे ......... ११३

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ २०१४-१५**

**अध्यक्ष**

श्रीराम देविदास जोशी (जळगाव)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्ता जहागिरदार (अमरावती)
अर्जुन महाडिक (कोल्हापूर)

**सदस्य**

रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
अशोक खाचणे (जळगाव)
राजू शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
बालाजी शिंदे (परभणी)
विद्या पाटील (धुळे)
रामेश्वर भिसे (अकोला)

**अक्षर रचना**- सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय**- सातपुडा ऑफसेट, जळगाव.

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

**वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१३-१४ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय संवाद...

### वेध महाराष्ट्राचा.... वेध विकासाचा....

देशानं जागतिकीकरणाचं धोरण स्वीकारल्यानं गेल्या २०-२५ वर्षात अर्थव्यवस्था अनेक स्थित्यंतरातून गेली. पूर्वीच्या दोन-चार टक्के वृध्दी दराऐवजी अर्थव्यवस्थेनं आठ-साडेआठ टक्के विकास दराची आस धरली. विकास करणं हा देशाचा अन् महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा स्थायीभाव बनला. राज्यात आर्थिक परिवर्तन वेगानं घडून आलं. आर्थिक-सामाजिक हिताच्या योजनांनी महाराष्ट्राच्या विकासाला मानवी चेहरा मिळाल्याचं स्पष्टपणे दिसलं. गेल्या वर्षात महाराष्ट्राला अतिवृष्टी, गारपीट अन् दुष्काळ अशा विविध नैसर्गिक संकटांना तोंड द्यावं लागलं. राज्यानं समर्थपणे तोंड दिलंही. एका वर्षात अशा विविध नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्याची परिस्थिती पहिल्यांदाच निर्माण झाली असावी. तरी देखील दुष्काळात ज्या वेगानं अन् ज्या संख्येनं जल प्रकल्पांची कामं झालीत, महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षात एवढ्या संख्येनं बंधारे घातले गेले नव्हते, त्यामुळे पुन्हा दुष्काळाची झळ आपल्याला इतकी सोसावी लागणार नाही, हेच खरे.

माझे एक प्राध्यापक मित्र उत्स्फूर्तपणे सहज म्हणायचे, गर्जा महाराष्ट्र माझा.... गरजा पूर्ण करत नाही महाराष्ट्र माझा.... महाराष्ट्र सरकार सध्या टीव्हीवर जाहिरात करतय्.... सर्वात पुढे महाराष्ट्र माझा.... पण देश पातळीवर इतर राज्यांशी तुलना केल्यास आपला महाराष्ट्र आहे तरी कुठं? राज्याच्या विविध विकास दरांची स्थिती अलिकडे कशी आहे? महाराष्ट्रातील जिल्ह्यांची विकासाबाबत तुलनात्मक स्थिती आहे तरी कशी? महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोल आहे काय? हे पहायचं असेल तर एकच मार्ग आहे तो म्हणजे आकडेवारी पहाणं. आर्थिक वृध्दी अथवा विकास साध्य करण्यास अनेक घटक उपयुक्त ठरतात. पण हे सर्व घटक सर्व प्रदेशात उपलब्ध असतीलच असं नाही. म्हणूनच राज्यांचा वृध्दीदर वेगवेगळ्या क्षेत्राबाबत भिन्न आढळतो. सन २०१३ मध्ये भारतात सर्वाधिक वृध्दीदर केरळ राज्याचा ८.२% होता. त्यानंतर गुजरात ८%, प.बंगाल ७.३%, हरयाणा ६.५% तर पाचव्या स्थानी महाराष्ट्र ६.२% असा वृध्दीदराचा क्रमांक लागतो. सन २०१३ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या सकल घरेलु उत्पादनात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेनं ८.७% वृध्दी अपेक्षित आहे. सरकारी माहितीनुसार सन २०१३-१४ या वर्षात शेती क्षेत्राचा वृध्दीदर ४.६%, उद्योग क्षेत्र वृध्दीदर ०.७%, सेवा क्षेत्र वृध्दीदर ६.९% तर स्थूल राज्य उत्पन्न ४.९% अपेक्षित आहे. भारताच्या तुलनेत महाराष्ट्र कुठय् हे पहाणं आवश्यक आहे. सन २०१४ च्या अंदाजपत्रकपूर्व पहाणीनुसार भारताच्या तुलनेत महाराष्ट्राची लोकसंख्या ९.३% आहे, ग्रामीण लोकसंख्येचं प्रमाण ७.४% तर शहरी लोकसंख्येचं प्रमाण १३.५% आहे. महाराष्ट्र नैसर्गिक साधन-सामग्री, नैसर्गिक सौंदर्य, व्यापार-उद्योग आणि जैविक विविधतेबाबत समृध्द आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ९.४% असले तरी शेतजमिनीखालील क्षेत्र १२.३% आहे मात्र स्थूल पिकाखालील क्षेत्र ११.६% इतके आहे. थेट विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र मात्र देशात अग्रस्थानी आहे. महाराष्ट्रातील प्रस्तावित थेट विदेशी गुंतवणूक २२.९% तर प्रकल्प मान्यतेचं प्रमाण २०.६% आहे. देशाच्या

स्थूल उत्पन्नातील महाराष्ट्राचा हिस्सा १४.१% असून चालू किमतीनुसार देशाच्या स्थूल उत्पन्नात महाराष्ट्राचा हिस्सा १४.५% आहे यावरून राज्याची वास्तव आर्थिक स्थिती कळते.

गेल्या आर्थिक वर्षात प्रतिव्यक्ती उत्पन्नाच्या बाबतीत मात्र महाराष्ट्राची स्थिती समाधानकारक म्हणावी लागेल. प्रतिव्यक्ती राज्य उत्पन्नात हरयाणा (रु.१,२०,३५२) प्रथमस्थानी, महाराष्ट्र (रु.१,०३,९९१) द्वितीयस्थानी, तामीळनाडू (रु.९८,५५०) तृतीयस्थानी, गुजरात (रु.९६,९७६) चतूर्थस्थानी तर पाचव्या स्थानी केरळ (रु.८८,५२७) आहे. प्रतिव्यक्ती उत्पन्नाबाबत महाराष्ट्रातील जिल्ह्यांची आकडेवारी लक्षवेधकच म्हणावी लागेल. महाराष्ट्राच्या प्रतिव्यक्ती उत्पन्नापेक्षा पाच जिल्ह्यांचे प्रतिव्यक्ती उत्पन्न अधिक आहे, मुंबई सर्वाधिक (रु.१,६७,७३६), द्वितीय ठाणे (रु.१,५७,७३७), तृतीय पुणे (रु.१,५०,९६९), चतुर्थ रायगड(रु.१,३२,६०७) तर पाचव्या स्थानी नागपुर (रु.१,११,८६०) आहे. त्याखालोखाल कोल्हापूरचा (रु.१,०१,६२२) क्रमांक लागतो. एक लाखाच्या जवळपास जिल्हा प्रतिव्यक्ती उत्पन्नामध्ये सिंधुदुर्ग (रु.९९,५०३), नाशिक (रु.९७,८९६) आणि औरंगाबाद (रु.९४,७२०) यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांचे प्रतिव्यक्ती उत्पन्न रु.५०,००० पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्रात सर्वात कमी प्रतिव्यक्ती उत्पन्न नंदुरबार जिल्ह्याचे (रु.५०,१२४) आहे. त्यानंतर हिंगोली (रु.५३,२०५), बीड(रु.५५,००९), उस्मानाबाद (रु.५६,५५३), बुलढाणा (रु.५७, ३८३), गडचिरोली (रु.५८,४६९) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. यावरून महाराष्ट्रात विकास विशिष्ट भागात अधिक झाला असून जिल्हानिहाय विषमतेचं आव्हान आजही आहे हे स्पष्टय्. राज्य उत्पन्नातील मोठा हिस्सा (२२%) मुंबईचा आहे, तर ठाणे (१३%), पुणे (११.३%) आहे. या तीनही जिल्ह्यांचा स्थूल राज्य उत्पन्नातील हिस्सा ४६.८% आहे हे विशेष. या आकडेवारीवरून मुंबई अन् नंदुरबार जिल्ह्यांच्या विकासात खूप अंतर पडलंय हे स्पष्ट आहे. एका बाजूला महाराष्ट्रात मुंबईसारखं आंतरराष्ट्रीय स्तरावरील शहर, मेट्रो रेल्वेचं शहर, उड्डाणपुलांचं शहर, व्यापार-उद्योगाचा विकास झालेलं शहर आहे तर दुसऱ्या बाजूला नंदुरबारसारखा अत्यंत अविकसित जिल्हा आहे. या जिल्ह्यातील तोरणमाळच्या सातपुडा पहाडपट्टीत ४०-५० कि.मी. चे क्षेत्र असे आहे की जिथं रस्त्यांअभावी बस जाणे दूरच परंतु मोटरसायकलदेखील जाऊ शकत नाही. अशा भागात पिण्याचं पाणी, अन्नधान्य, शिक्षण, वैद्यकिय सुविधा यांच्या बाबतीत किती दयनिय अवस्था असेल याची कल्पनाच केलेली बरी. सुरवातीच्या आकडेवारीवरून महाराष्ट्र काहीसं प्रगत राज्य वाटतं तेही खरं आहे. तरीदेखील विकासाची फळे अर्थव्यवस्थेतील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचायला हवीत, नव्हे ती जरूर पोहोचलीच पाहिजेत तेव्हाच तो शेवटचा घटक राज्याच्या अर्थिक विकासात आपलं योगदान सक्षमतेनं देऊ शकतो.

अर्थसंवादच्या लेखकांनी या विशेषांकास भरभरून प्रतिसाद दिला हे आवर्जून सांगावसं वाटतं. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी सलग नऊ अंकांना जाहिरात देऊन सहकार्य केलं, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार! अर्थसंवाद अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

अविनाश रामलाल निकम

प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# अर्थशास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक डॉ. आनंद नाडकर्णी

**संतोष दास्ताने, पुणे,**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद,
भ्रमणध्वनी - ९८२२००९९५४

अर्थशास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. आनंद शांताराम नाडकर्णी यांचे पुणे मुक्कामी दि. २७ मे, २०१४ रोजी दुःखद निधन झाले. निधनसमयी ते ९० वर्षाचे होते. त्यांच्या निधनाने मागील पिढीतील एक हुशार व विद्यार्थी प्रिय प्राध्यापक काळाच्या पडद्याआड गेला आहे. अर्थशास्त्र अध्यापनाच्या आणि अर्थशास्त्रातील संशोधनाच्या सुमारे तीन तपांच्या प्रदीर्घ वाटचालीमध्ये अनेक सहकाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्वत्तेचा लाभ झाला. त्या सर्वांना आज पोरकेपणाची जाणीव होत आहे. पदवी व पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासामध्ये मी फर्ग्युसन कॉलेज व पुणे विद्यापीठ येथे त्यांचा विद्यार्थी असल्याने मला व्यक्तिशः ही जाणीव प्रकर्षाने होत आहे. डॉ.धनंजयराव गाडगीळ, डॉ. वि.म. दांडेकर यांचा सहवास लाभलेले व तितक्याच तोलामोलाची विद्वत्ता लाभलेले नाडकर्णी सर हाडाचे शिक्षक होते. त्यांचे कॉलेजमधील अगदी वेळेवर सुरु होणारे व पुर्णपणे गांभीर्याने घेतले जाणारे प्रत्येक लेक्चर म्हणजे एक प्रकारची मेजवानीच असे. सुरवातीस सुमारे मिनिटभर त्यांचा आवाज अगदी हळु असे, पण नंतर मात्र त्यांचा खुला आवाज साऱ्या वर्गाची पकड घेई. हातात कोणतेही टिपण-चिठ्ठीचपाटी न धरता अगदी सावकाश व तर्कशुद्ध पद्धतीने ते मुद्यांची मांडणी करीत असत. शिकण्याचे माध्यम इंग्रजी असो अगर मराठी असो, ते कोणत्या शब्दावर अडले आहेत किंवा एखाद्या मुद्याकरिता चाचपडले आहेत असे कधीच होत नसे. विषय समजाऊन देण्याची त्यांची हातोटी सुगम आणि अर्थवादी होती असे जाणवत असे. विद्यार्थी कोणती पुस्तके वाचतात त्याची आवर्जुन विचारपूस ते करत. अर्थशास्त्र मंडळामध्ये विद्यार्थ्यांनी शोधनिबंध लिहून सादर करावा यामध्ये ते आस्थापुर्वक लक्ष घालीत असत. आर्थिक विचारांचा इतिहास शिकवत असतांना विचारांच्या अभिनिवेशाला

जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व सैद्धान्तिक तटस्थता आणि वस्तुनिष्ठता यांना आहे ही भुमिका ते ठसवत असत. तो अभ्यासक्रम फक्त त्यांनीच शिकवावा असे मनापासून वाटत राही.

विषय शिकवत असतांना स्वत: नवीन शिकत रहाणे हे व्रत त्यांनी प्रथमपासून पाळले होते. इकनॉमिक टाइम्स तसेच इकनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीमधील ताज्या लेखांचे संदर्भ ते मार्गदर्शनाच्या वेळी देत असत. त्यातील काही लेखांचा संक्षिप्त अनुवाद करा, काही लेखांच्या आधारे टिपण तयार करा. काही मुद्यांच्या आधारे शोधनिबंध लिहा अशा गोष्टी ते विद्यार्थ्यांना सुचवित त्या गोष्टींचा पाठपुरावा करीत, आपण लिहिलेली पाने पुन्हा लिहायला सांगत व अशा रीतीने विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष काम करुन घेत. मी स्वत: याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असल्याने त्यांची तळमळ व आपुलकी मी अनुभवली आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि संपादन ही चतु:सुत्री त्यांनी समरसतेने जपली. ते अर्थसंवादचे संपादक होते तेव्हा काही वर्षे सहायक संपादकाची जबाबदारी त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी पार पाडली. अर्थसंवादमध्ये प्रसिद्धीमध्ये लेख निवडतांना पत्रव्यवहार, मार्गदर्शन ते करीत. पण इतर संपादकीय संस्कार, पुनर्लेखन, जरुर पडल्यास अनुवाद करणे, प्रुफे तपासणे या गोष्टी ते सहायक संपादकावर सोपवीत असत. वेळप्रसंगी मुद्रणालयात हेलपाटे घालणे, तेथील कमीजास्त अडचणी सोडवणे हे ही करावे लागत असे. त्या काळात पीएच्.डी. च्या अभ्यासासाठी मी गोखले इन्स्टीट्युटमध्येच असल्याने अशा कामाचा रोज आढावा घेतला जाई. अर्थसंवादच्या संपादनाचे काम त्यांनी किती समर्थपणे व्यवस्थितपणे आणि सजगपणे केले हे मला जवळून पहाता आणि अनुभवता आले. या अनुभवाचा आयुष्यात पुढे खुप फायदा झाला हे मी नम्रपणे नमुद करतो.

÷÷महाराष्ट्रातील शेती उत्पन्नाचा अभ्यास'' या विषयावर त्यांनी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदशनाखाली पीएच्.डी. पदवी प्राप्त केली. साकलिक अर्थशास्त्र, सार्वजनिक वित्तव्यवहार, राष्ट्रीय उत्पन्न हे त्यांचे आवडीचे विषय होते. वार्षिक अंदाजपत्रकावरील त्यांचे लेखन व टिपणी अभ्यासपुर्ण असे. त्यातल्या त्यांच्या काही शोधनिबंधांची शिफारस पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात एक आवश्यक संदर्भ म्हणून करण्यात आली होती. संशोधनासाठी त्यांच्याकडून मार्गदर्शन घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बद्दल एक भीतीयुक्त आदर वाटत असे. पण विशेष म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थी किंवा मराठी माध्यमाचे विद्यार्थी यांच्या बाबतीत त्यांना तितकीच आत्मीयता वाटत असे. गोखले इन्स्टिट्यूटच्या धीरगंभीर वातावरणामध्ये संशोधक विद्यार्थ्यांना डॉ. नाडकर्णी (व नंतर डॉ. भ.ग.बापट) आपले वाटत, जवळचे वाटत. गोखले इन्स्टिट्युट पुणे विद्यापीठाच्या बरोबरीने इतर अनेक विद्यापीठांच्या कामकाजात ते सहभागी असत. शिवाजी विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, एस.एन.डी.टी., टिळक विद्यापीठ, य.चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अशा विद्यापीठांमध्ये व्याख्याने, परिसंवादामधील उपस्थिती विषय तज्ञ अशा मार्गाने त्यांचा संपर्क असे. अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य व नंतर अध्यक्ष या नात्याने त्यांनी पदरमोड करुन अनेक वेळा मार्गदर्शनपर अभ्यासदौरे काढले आहेत. ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांशी त्यांचा संपर्क असे. त्या काळी पुणे

विद्यापीठाचा विस्तार जळगांव-धुळे या जिल्ह्यांपर्यंत होता. या सर्व ठिकाणी प्रवास, पत्रव्यवहार, भेटीगाठी याचा त्यांनी कधीच कंटाळा केला नाही.

त्यांचे अध्यापनाचे कार्य लिंगराज कॉलेज, बेळगांव, बी.एम.सी.सी. पुणे, फर्ग्युसन कॉलेज, पुणे व गोखले इन्स्टिट्युट, पुणे येथे पार पडले. गोखले इन्स्टिट्युटचे ते सहसंचालक होते. तेथे एम.फिल. आणि पीएच्.डी. च्या मार्गदर्शनाबरोबर अनेक संशोधन प्रकल्पही त्यांनी पुरे केले. त्यातला एक आगळा वेगळा संशोधन प्रकल्प नमुद करण्याजोगा आहे. राज्यातील शेती विकास योजनांचा ग्रामीण भागातील वर्गीकृत जाती व जमातीच्या लोकसंख्येवर काय परिणाम झाला हे पहाण्यासाठी हा संशोधनाचा मोठा प्रकल्प होता. प्रत्येक जिल्ह्यातील पाच खेडेगावे निवडून त्यातील सर्व कुटुंबाची सांख्यिकी माहिती संकलित करण्याचा तो महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. पुणे जिल्ह्यातील पाच खेड्यांचे पुर्ण सर्वेक्षण करण्याचें काम माझ्याकडे होते. त्या अंतर्गत प्राथमिक माहितीचे संकलन करतांना काय काळजी घ्यावी, त्यातील चुका कशा टाळाव्यात याचे मोलाचे मार्गदर्शन नाडकर्णी सरांनी केले. या प्रकल्पात डॉ. नीळकंठ रथ, डॉ. स.ह. देशपांडे यांचेही मार्गदर्शन लाभले. एकूणच तो एक अपुर्व अनुभव होता. त्या प्रकल्पावरील एक मोठा शोधनिबंध अर्थविज्ञान या त्रैमासिकात प्रसिद्ध झाल्याचे स्मरते. त्यावेळचे मुख्यमंत्री बॅ.अंतुले यांनी या प्रकल्पात विशेष रस दाखवला होता.

मराठी अर्थशास्त्र परिषदेस डॉ. नाडकर्णी यांचे प्रथमपासून योगदान लाभले. संगमनेर येथील सहाव्या वार्षिक अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. (१९८३) अधिवेशनामधील त्यांची उपस्थिती सहकारी प्राध्यापकांना प्रेरणादायी वाटत असे. त्यांच्या अर्थसंवादच्या संपादकत्वाच्या काळात नियतकालिकाचे स्वरुप पालटून गेले. संशोधनपर लेख, चर्चा, टिपणे, पत्रव्यवहार, पुस्तक परीक्षणे या सर्व पद्धतींनी हे नियतकालिक वाचनीय झाले. समाज प्रबोधन पत्रिकेच्या संपादनातही त्यांचा हातभार होता. प्रा. देवदत्त दाभोळकर, गं.बा. सरदार, डॉ. भा. शं. भणगे या विचारवंताशी नाडकर्णी सरांच्या तारा विशेष करुन जुळल्या होत्या. त्यामुळे राज्यातील सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीने गती दयावी अशा बाजूने नाडकर्णींचे विचार व लेखन झुकलेले आढळते. १९८५ साली गोखले इन्स्टिट्यूट मधून निवृत्त झाल्यावर भारतीय अर्थ विज्ञान वर्धिनी या संस्थेत ते प्राध्यापक व संचालक या पदावर १९९० पर्यंत काम पहात होते. त्या संस्थेच्या नियामक मंडळाचे मानद सदस्य म्हणून त्यांनी शेवटपर्यंत काम पाहिले. त्या संस्थेच्या इंग्रजीतील संशोधनपर त्रैमासिकाचे त्यांनी कुशलतेने संपादन केले. त्यांच्या शास्त्रशुद्ध कार्यपद्धतीचा आणि अनुभवाचा सरकारने वेळोवेळी फायदा करून घेतला. गोवा सरकारच्या नियोजन मंडळाचे सभासद म्हणून त्यांनी काम पाहिले. नव्याने स्वतंत्र झालेल्या या राज्यात औद्योगिक विकास, पायाभूत सुविधांचा विकास, पर्यावरणस्नेही विकास प्रतिमान याबद्दलचे त्यांचे मार्गदर्शन बहुमोल ठरले. महाराष्ट्रातील पंचायती राज मुल्यमापन समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. या संस्थांचे सबलीकरण करावे हा विचार त्यांनी मांडला. नंतर काही वर्षांनी घटना दुरुस्ती करुन तो विचार आमलात आणला गेला. यात त्यांचे द्रष्टेपण दिसून येते.

पुण्यातील विद्या सहकारी बँक या नागरी सहकारी बँकेचे ते संस्थापक-संचालक होते. प्राध्यापकांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाने या बँकेने सुरवातीपासूनच दमदार वाटचाल केली आहे. या मागे नाडकर्णी सारख्या संचालकांनी प्रथमपासून जे कष्ट घेतले ते कारणी लागले असे म्हणता येईल.

सतत अभ्यास, व्यासंग, चर्चा, चिंतन, लेखन, टिकात्मक व चिकित्सक परीक्षणे यात त्यांना विशेष रस असे. त्यांच्याकडे काही शंका घेऊन गेले तरी गप्पांमध्ये पाहिलेला चित्रपट, क्रिकेटची मॅच, नुकताच झालेला गाण्याचा कार्यक्रम, वाचलेली नवीन कादंबरी यांच्याबद्दल बोलणे निघत असे व त्यांचे व्यक्तिमत्व किती चौफेर आणि सर्वस्पर्शी होते याचा प्रत्यय येई. डॉ. नाडकर्णी यांच्या निधनाने सर्वार्थाने शिक्षक असणारा एक विद्याव्रती आपल्यातून गेला अशीच भावना होत आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेसारख्या सेवाभावी संस्था अशा निरलस वृत्तीने झोकुन देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच जगत असतात. त्यामुळे परिषदेला त्यांच्यासारख्या पितृतुल्य व्यक्तिमत्वाची अनुपस्थिती नेहमीच जाणवेल. त्यांच्या स्मृतीला माझे विनम्र अभिवादन ×

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन ठाणे ऐवजी अकोला येथे होणार

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन ठाणे येथे आयोजित केले जाणार होते. परंतु काही तांत्रिक अडचणींचा विचार करून मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारी मंडळाने **अकोला** येथील **श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात** मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन घेण्याचे निश्चित केले आहे. हे राष्ट्रीय अधिवेशन **दि.७, ८ व ९ नोव्हेंबर २०१४** या कालावधीत होणार आहे, याची कृपया सर्व आजीव सदस्यांनी नोंद घ्यावी.

कार्यकारी मंडळ
मराठी अर्थशास्त्र परिषद

# महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचा विकास

कुंडलिक भिमराव चौगुले, अलिबाग,
सहयोगी प्राध्यापक,
जे.एस्.एम्. कॉलेज, जिल्हा रायगड,
भ्रमणध्वनी ९४२२५९४००७

उद्योगांचा किंवा उपक्रमांचा विकास हा देशाच्या किंवा राज्याच्या विकासाचा पाया असतो. महाराष्ट्र राज्य भारतातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य मानले जाते. महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक उत्पादन, रोजगार, गुंतवणूक आणि निर्यात यादृष्टीने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. सूलमउ(MSMEs)क्षेत्र प्रामुख्याने श्रम प्रधान आहे. त्यामुळे रोजगार निर्मिती अधिक होते. या उपक्रमांमध्ये स्थानिक साधनसामग्रीचा व कौशल्याचा उपयोग केला जातो. विभागीय असमतोल, उत्पन्न विषमता, दारिद्र्य कमी करण्याच्या कामी हे उपक्रम उपयुक्त ठरतात आणि सरकारला उद्योगांचे पसरणाचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होते.

लघुउद्योग क्षेत्रात २००६ पर्यंत लघु उद्योग, ग्रामीण कुटीरोद्योग, ताग, खादी व सिल्क आदी पारंपरिक उद्योग, लघुसेवा व व्यापार उद्योग, वस्तुनिर्माण आणि सेवा उद्योग, कृषी आणि बिगर कृषि उद्योग, पुरक उद्योग, अतिसूक्ष्म उद्योग अशा विविध उद्योगांचा अंतर्भाव होता. तसेच लघु उद्योग खाते व त्याचे स्वतंत्र मंत्री आणि कृषी आणि ग्रामीण उद्योग खाते व त्याचे स्वतंत्र मंत्री अशी दोन्ही खाती स्वतंत्र होती.

## सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा-२००६:

लघु उद्योग क्षेत्राचा विकास सुलभ व्हावा व त्यांची स्पर्धात्मकता वाढावी यादृष्टीने ÷सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा-२००६' मंजूर करण्यात आला व तो २ ऑक्टोबर २००६ पासून अंमलात आला. या कायद्यानुसार प्रथमच ÷उपक्रम' या संज्ञेला कायद्याने मान्यता देण्यात आली. उपक्रमांची विभागणी १) वस्तुनिर्माण उपक्रम २) सेवा पुरविणारे उपक्रम अशा दोन वर्गात करण्यात आली. मध्यम उपक्रम ही संज्ञा प्रथम आणली. वस्तुनिर्माण उपक्रम व

सेवा पुरविणारे उपक्रम या दोन प्रकारांची विभागणी गुंतवणूकीच्या प्रमाणानुसार सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम अशा आणखी तीन विभागात केली आहे. तसेच ९ मे २००७ च्या कायद्यातील दुरुस्तीनुसार लघु उद्योग खाते आणि कृषी व ग्रामीण उद्योग खाते यांचे विलिनीकरण करुन एकच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम खाते व त्याचे कार्यभार एकाच मंत्र्याकडे सोपविण्यात आला. धोरणांचा आराखडा तयार करणे आणि विविध कार्यक्रम, प्रकल्प आणि योजना वाढविणे/अधिक सुलभ करणे आणि सूलमउ(MSMEs) क्षेत्राच्या प्रगतीस आणि वाढीस मदत होईल यादृष्टीने अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य हा विभाग करतो. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या व्याख्या गुंतवणूकीच्या मर्यादेच्या निकषांवर, वस्तुनिर्माण उपक्रम व सेवा पुरविणारे उपक्रमांसाठी विहित करण्यात आल्या.

अ) वस्तुनिर्माण उपक्रम :

१. ज्या उपक्रमात संयंत्र आणि यंत्रसामग्रीतील गुंतवणूक रु. २५ लाखापेक्षा जास्त नाही त्या उपक्रमास सूक्ष्म उपक्रम म्हटले जाईल.
२. ज्या उपक्रमात संयंत्र आणि यंत्रसामग्रीतील गुंतवणूक रु. २५ लाखापेक्षा जास्त परंतु रु. ५ कोटी पेक्षा ज़ास्त असणार नाही त्या उपक्रमास लघु उपक्रम म्हटले जाईल.
३. ज्या उपक्रमात संयंत्र आणि यंत्रसामग्रीतील गुंतवणूक रु. ५ कोटी पेक्षा जास्त परंतु रु. १० कोटी पेक्षा जास्त असणार नाही त्यास मध्यम उपक्रम म्हटले जाईल.

ब) सेवा पुरविणारे उपक्रमः

१. ज्या उपक्रमात साधनसामग्रीतील गुंतवणूक रु.१० लाखापेक्षा जास्त नाही. त्या उपक्रमास सूक्ष्म उपक्रम म्हटले जाईल.
२. ज्या उपक्रमात साधनसामग्रीतील गुंतवणूक रु.१० लाखापेक्षा जास्त परंतु रु. २ कोटी पेक्षा जास्त असणार नाही त्या उपक्रमास लघु उपक्रम म्हटले जाईल.
३. ज्या उपक्रमात साधनसामग्रीतील गुंतवणूक रु. २ कोटीपेक्षा जास्त परंतु रु. ५ कोटी पेक्षा जास्त असणार नाही त्या उपक्रमास मध्यम उपक्रम म्हटले जाईल.

लघुउद्योग क्षेत्राचा सुनियोजितपणे विकास करण्यासाठी या क्षेत्रातील उद्योग घटकांची परिपूर्ण माहिती संग्रहित करुन माहितीचा साठा तयार करणे आवश्यक असते. या दृष्टीकोनातून देशातल्या लघु उद्योगांची वारंवार गणना करण्यात आली. पहिली गणना १९७३-७४, दुसरी १९९०-९१, तिसरी २००१-०२ मध्ये करण्यात आली. चौथी गणना २००६-०७ मध्ये करण्यात आली. यात ३१ मार्च २००७ पर्यंतच्या देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा उद्योग केंद्रात नोंदणीकृत उपक्रमांचा समावेश आहे. यामध्ये मध्यम उपक्रमांचा प्रथम अंतर्भाव करण्यात आला आहे.

## महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची सद्यस्थिती :

चौथ्या गणनेनुसार (२००६-०७) महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची संख्या ८६,६२५ एवढी होती. सूलमउ(MSMEs) क्षेत्रातील गुंतवणुक १४,८५,९०० लाख एवढी होती. तर रोजगार १०,९५,०६६ एवढा होता. २००७-०८ नंतर या क्षेत्रातील उपक्रमांची संख्या, गुंतवणूक व रोजगार यामध्ये सतत वाढ होत गेली आहे. ती वाढ पुढील तक्त्याद्वारे दर्शविली आहे.

## सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची संख्या, गुंतवणूक आणि रोजगार

| वर्ष | उपक्रमांची संख्या | | गुंतवणूक (लाखात) संयंत्र, यंत्रसामग्री / साधनसामग्री | | रोजगार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष संख्या | संचित संख्या | प्रत्यक्ष गुंतवणूक | संचित गुंतवणूक | प्रत्यक्ष रोजगार | संचित रोजगार |
| २००७-०८ | १०,२४४ | १०,२४४ | २,२८,१०० | २,२८,१०० | १,३९,५५७ | १,३९,५५७ |
| २००८-०९ | ११,६८२ | २१,९२६ | ३,२९,५०० | ५,५७,६०० | १,७१,०९८ | ३,१०,६५५ |
| २००९-१० | ११,८९६ | ३३,८२२ | ३,०२,७५६ | ८,६०,३५६ | १,४९,८३७ | ४,६०,४९२ |
| २०१०-११ | १४,४९६ | ४८,३१८ | ५,५६,३३१ | १४,१६,६८७ | १,८७,००४ | ६,४७,४९६ |
| २०११-१२ | १५,६०६ | ६३,९२४ | ४,४४,३४१ | १८,६१,०२५ | २,०६,६५७ | ८,५४,१५३ |
| २०१२-१३ | १६,१३६ | ८०,०६० | ५,४५,४७३ | २४,०६,५०१ | २,०५,९९६ | १०,६०,१४९ |

स्त्रोत :

१. Document of Census Branch Directorate of Industries Mumbai.

२. www.dcmsme.gov.in/publications/EMP-II

तक्यातील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील सूलमउ (MSMEs) क्षेत्रातील उपक्रमांची संख्या, गुंतवणूक आणि रोजगार यात लक्षणीय वाढ झाली आहे.

२००७-०८ पासून २०१२-१३ पर्यंत सूलमउ (MSMEs) क्षेत्रातील उपक्रमांची संख्या प्रतिवर्षी सरासरी १५.३९ टक्के नी वाढत जाऊन, २०१२-१३ ला उपक्रमांची संचित संख्या ८०,०६०एवढी झाली आहे. ही एकूण वाढ ९२.४१ टक्के एवढी आहे. २००६-०७ पर्यंतचे एकूण ८६,६३५ उपक्रम आणि २००७-०८ ते २०१२-१३ या काळात नव्याने सुरु झालेले ८०,०६० उपक्रम, असे एकूण १,६६,६९५ उपक्रम विविध वस्तुनिर्मितीचे व सेवा पुरविण्याचे कार्य करीत आहेत.

देशाच्या किंवा राज्याच्या विकासाच्या दृष्टीने विविध उपक्रमांमधील गुंतवणूकीतील वाढ अत्यंत महत्वाची असते. सुलमउ(MSMEs) क्षेत्रातील गुंतवणूकीतील वाढ ही महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने जमेची बाजू आहे. या क्षेत्रात २००७-०८ ते २०१२-१३ या काळात गुंतवणूकीत प्रतिवर्षी सरासरी २६.९७टक्के नी वाढ होत जाऊन २०१२-१३ मध्ये या क्षेत्रातील संचित गुंतवणूक २४,०६,५०१ लाख एवढी झाली आहे. ही एकूण वाढ १६१.९५ टक्के एवढी आहे. २००६-०७ पर्यंतची १४,८५,९०० लाख गुंतवणूक आणि २००७-०८ ते २०१२-१३ या कालावधीतील २४,०६,५०१ लाख संचित गुंतवणूक अशी एकूण २०१२-१३ मधील सूलमउ(MSMEs) क्षेत्रातील गुंतवणूक ३८,९२,४०१ लाख एवढी आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम श्रम प्रधान उपक्रम आहेत. या उपक्रमांमध्ये रोजगार निर्मितीची क्षमता अधिक आहे. या उपक्रमांना रोजगार निर्मितीचे इंजिन म्हणता येईल. कारण २००६-०७ च्या आकडेवारीनुसार सूलमउ

(MSMEs) क्षेत्रातील एकूण रोजगार १०,९५,०६६ एवढा होता. २००७-०८ ते २०१२-१३ या काळात सूलमउ(MSMEs) क्षेत्रातील रोजगारात प्रतिवर्षी सरासरी १६.१३ टक्के नी वाढ होत जाऊन, २०१२-१३ मध्ये या क्षेत्रातील संचित रोजगार १०,६०,१४९ एवढा झाला आहे. ही एकूण वाढ ९६.८१ टक्के एवढी आहे. २००६-०७ पर्यंतचा या क्षेत्रातील १०,९५,०६६ एवढा रोजगार आणि २००७-०८ ते २०१२-१३ या काळातील १०,६०,१४९ एवढा संचित रोजगार, या पध्दतीने २०१२-१३ मध्ये २१,५५,२१५ लोकांना रोजगार पुरविण्याचे कार्य सूलमउ (MSMEs) उपक्रम करीत आहेत.

सूलमउ(MSMEs)क्षेत्रातील उपक्रमांची संख्या, गुंतवणूक व रोजगार या बाबत उल्लेखनीय वाढ झाली आहे. पण एकूण उपक्रमांमध्ये सूक्ष्म उपक्रमांचीच संख्या जास्तीत जास्त आहे. त्यानंतर लघु उपक्रम व मध्यम उपक्रमांची संख्या अल्प आहे. २००९-१० मधील ११,८९६ उपक्रमांमध्ये अनुक्रमे ८,४७८(७१.२६%),३,३३२ (२८.००%) व ८६ (०.७४%) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम, २०१०-११ मधील १४,४९६ उपक्रमांमध्ये अनुक्रमे ९५४५(६५.८५%), ४,८२९ (३३.३१%) व १२२(०.८४%) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम, २०११-१२ मधील १५,६०६ उपक्रमांमध्ये अनुक्रमे १०,५६३ (६७.६९%),४,९२७(३१.५७%) व ११६ (०.७४%) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम तर २०१२-१३ मधील १६,१३६ उपक्रमांमध्ये अनुक्रमे १०,९८६(६८.०९%), ४,९९५ (३०.९५%) व १५५(०.९६%) सूक्ष्म, लघु, आणि मध्यम उपक्रमांचा समावेश आहे. एकूण उपक्रमांमध्ये सरासरी ६८.२० टक्के एवढी संख्या सूक्ष्म उपक्रमांचीच आहे. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सूक्ष्म उपक्रमांची वाढ अत्यंत चांगली आहे. कारण लघु आणि मध्यम उपक्रमांच्या तुलनेत सूक्ष्म उपक्रमांमध्ये अत्यंत कमी भांडवलाच्या सहाय्याने जास्त रोजगार निर्मिती शक्य होते.

सूलमउ(MSMEs)क्षेत्रातील वस्तुनिर्माण उपक्रमांबरोबर सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांची संख्या ही वाढत आहे. अलिकडील आकडेवारीनुसार प्रत्यक्ष उपक्रमांच्या वाढीमध्ये वस्तुनिर्माण उपक्रमांची संख्या ७३.२३ टक्के आहे तर सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांची संख्या २६.७७ टक्के एवढी आहे. नवीन उपक्रम रचनेतील सेवा पुरविणारे उपक्रम ही वाढताना दिसून येतात.

सूलमउ(MSMEs) क्षेत्राची प्रगती उल्लेखनीय आहे. पण याला खरी प्रगती म्हणता येत नाही. कारण विभागीय असंतुलन दिसून येते. २००६-०७ ते २०१२-१३ या काळात मुंबई व उपनगरे विभागातील सूलमउ (MSMEs) ची वाढ १२८.३० टक्के एवढी आहे. हीच वाढ कोकण विभाग १२२.०१ टक्के, नाशिक विभाग ८८.२९ टक्के, पुणे विभाग ७९.५६ टक्के, औरंगाबाद विभाग ८७.३४ टक्के, अमरावती विभाग ४५.५२ टक्के व नागपूर विभाग ११८.७२ टक्के या प्रमाणे आहे. २०१२-१३ मधील एकूण १,६६,६९५ उपक्रमामध्ये १,३२,८६२ (७९.७ टक्के) एवढे उपक्रम मुंबई व उपनगरे, कोकण, नाशिक व पुणे या चार विभागामध्ये केंद्रीत झाले आहेत. तर औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागात ३३,८३३ (२०.३०टक्के) उपक्रम कार्य करतात.

सूलमउ(MSMEs)क्षेत्रातील उपक्रमांची संख्या, वाढती गुंतवणूक व रोजगार यावरुन असे म्हणता येते की, या क्षेत्रात महाराष्ट्र राज्याची स्थिती चांगली आहे. पण भारतातील इतर

राज्यातील सूलमउ(MSMEs) क्षेत्राशी महाराष्ट्र राज्यातील या क्षेत्राची तुलना करता, महाराष्ट्र खूप पाठीमागे असल्याचे दिसून येते. २००७-०८ ते २०११-१२ या काळातील भारतातील सूलमउ(MSMEs) क्षेत्रातील उपक्रमांची संचित संख्या ११,०१,०४९ एवढी आहे. यामध्ये तामिळनाडूतील या क्षेत्रातील उपक्रमांची संचित संख्या २,२९,५९८(२०.८५ टक्के), उत्तर प्रदेश १,६२,१४६(१४.७२ टक्के), गुजरात १,३०,७६३ (११.८७ टक्के) एवढी आहे, तर महाराष्ट्रात या क्षेत्रातील उपक्रमांची संख्या ६३,९२४ (५.८० टक्के) एवढीच आहे. या क्षेत्रातील उपक्रमांच्या बाबतीत भारतात तामिळनाडूचा प्रथम, उत्तर प्रदेशचा दुसरा तर गुजरातचा तिसरा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रसारख्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्याला सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम क्षेत्राच्या बाबतीत तामिळनाडू प्रमाणे किंवा त्याहून चांगली प्रगती करणे शक्य आहे. त्यासाठी फक्त सरकारी, प्रशासकीय व लोकांच्या पातळीवर इच्छा शक्तीची गरज आहे.

**संदर्भसूची :**


१. Dr. J. Robert Edwin Chester. Dr. X. Antony Thanaraj. *"Micro Enterprises- An Indian Scenario."* Vista International Publishing House, Delhi-110053 (India).

२. Nidhi Jethwant, *"Micro, Small and Medium Enterprises In Today's Perspective"* Axis Publications, New Delhi 110002 (India)

३. Dr. Chaudhury Suman Kalyan. *"Rural Micro Finance and Micro Enterprise"* Discovery publishing house PVT. Ltd., New Delhi-110002.

४. डॉ. कुरुलकर र. पु. *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* विद्या प्रकाशन, नागपूर.

५. Dr. Gumma Vijay Nagesh, *"The impact of Globalization on Small-scale Industries"* Regal Publications, New Delhi.

६. Kuchhal S.C. *"TheIndustrial Economy of India"* Chaitanya publishing House, 5-A, University Road, Allahabad-2.

७. Desai S.S.M. *"Industrial Economy of India."* Himalaya Publishing House,

८. Rosen George, *"Industrial Change in India 1970-2000."* Allied Publishers Private Limited.

९. Misra S. K., Puri V. K.*Indian Economy.* 29th Edition, Himalaya Publishing House.

१०. Sivayya K. V., Dar V. B. *"Indian Industrial Economy"*, S.Chand and Co. Ltd.,Ram Nagar, New Delhi- 110055

११. Datt Ruddar, Sundharam K.P.M. *Indian Economy*, 57th Revised Edition, S. Chand and Company Ltd., Ram Nagar, New Delhi-110055.

१२. प्रा.जगताप डी. आर., प्रा. सौ. वाणी निता, डॉ. जंगले मंगला, प्रा. पाटील डी. जी., *भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टीक्षेप*, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव-४२५००१.

१३. The Management Accountant. The Journal for CMAS, *The Institute of Cost Accounts of India* Vol.48, May 2013.

१४. Economic & Political Weekly, Vol XVIII no. 28 July 13, 2013.

१५. *अर्थसंवाद*, एप्रिल जून २०१२/ खंड ३६, अंक १ (भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक)

१६. Document Of Census Branch Directorate of Industries Mumbai

१७. Various website
www.demsme.gov.in
MSME DI Institute
MSME DI Mumbai

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद ×

डॉ. श्रीराम जोशी,
अध्यक्ष
सार्थक, प्लॉट नं.२०, विवेकानंदनगर,
रामानंदनगर जवळ,
जळगावं-४२५ ००१,
भ्रमणध्वनी:९४२१००८७७६

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील संक्रमण : एक मागोवा

माधव शिंदे, अहमदनगर,
अर्थशास्त्र विभाग,
अहमदनगर महाविद्यालय.
ई-मेल: madhavshinde.1@rediffmail.com

प्रस्तावना:

देशामध्ये आर्थिकदृष्ट्या प्रगतीशील राज्य म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. राज्यातील औद्योगिक क्षेत्राबरोबरच कृषी आणि सेवा क्षेत्रांची झालेली प्रगती राज्याचे राष्ट्रीय पातळीवरील अग्रणी स्थान टिकवून ठेवण्यासाठी महत्वपूर्ण राहीली आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये (जी डी पी) राज्याचा वाटा जवळपास १५ टक्के इतका आहे. याबरोबरच, राज्यातील वस्तुनिर्माण क्षेत्राची राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी उल्लेखनिय स्वरूपाची आहे. राज्याच्या वस्तूनिर्माण क्षेत्रातील मूलवृध्दीचा राष्ट्रीय स्तरावरील वाटा जवळपास २३ टक्के इतका आहे तर भारतीय वस्तूनिर्माण क्षेत्रातील एकूण रोजगारामध्ये राज्याचा वाटा १५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. तसेच देशात येणाऱ्या एकूण परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीपैकी सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्रात झाली असून देशातील एकूण गुंतवणूकीशी हे प्रमाण जवळपास २३ टक्के इतके आहे. १९९१ ते २०१० या काळात राज्यामध्ये जवळपास ४२२१ प्रकल्पांच्या माध्यमातून ८४,९५८ कोटी रूपयांची गुंतवणूक झाली आहे. सहकार क्षेत्रातही महाराष्ट्राचे देशात नेहमीच अग्रणी स्थान राहिले आहे. महाराष्ट्रामध्ये सहकाराचा पाया खोलवर रूजलेला आहे. २०११ मध्ये महाराष्ट्रामध्ये जवळपास २.२४ लाख विविध प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत होत्या. राज्याच्या विकासात सहकार क्षेत्राची महत्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. अशाप्रकारे या उपरोक्त घटकांवरून राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्र राज्याचे स्थान महत्वपूर्ण असल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुत शोध निबंधामध्ये महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करण्यात आले असून प्रमुख चलांच्या सहाय्याने अर्थव्यवस्थेत झालेले संक्रमण अभ्यासण्यात आले आहे.

१ मे १९६० रोजी संयूक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. त्यानंतरच खऱ्या अर्थाने राज्याच्या विकासाला अपेक्षित गती मिळाली. स्वातंत्र्यपूर्व काळापासुनच महाराष्ट्राला औद्योगिकरणाची पार्श्वभूमी असल्याने उद्योग क्षेत्राचे राज्याच्या आर्थिक

विकासामध्ये महत्वाचे स्थान राहिले आहे. उद्योगधंद्यांच्या विस्तारामुळे राज्यातील कृषी व सेवा क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळाली तर उद्योगधंद्यांच्या विकासामध्ये कृषी व सेवा क्षेत्रांची महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा मागोवा घेतला असता, संयुक्त महाराष्ट्राची स्थापना ते आजतागायत राज्याच्या अर्थव्यवस्थेत अमुलाग्र स्वरूपाचे बदल झाले आहेत. स्थूल राज्य उत्पन्न (जी एस डी पी), लोकसंख्या शास्त्रीय वैशिष्टे, उत्पादन, रोजगार, गुंतवणूक, दरडोई उत्पन्न, इ.घटकांमध्ये झालेले संक्रमण राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अनुकूल की प्रतिकूल स्वरूपाचे राहिले आहे हे पाहणे महत्वाचे आहे.

## सांख्यिकीय विश्लेषण:

१९६०-६१ साली २२४९ कोटी रु असलेले स्थूल राज्य उत्पन्न २०१०-११ साली ९,८२,४५२ कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. महाराष्ट्राच्या स्थूल राज्य उत्पन्नात झालेली ही भरीव वाढ निश्चितच राज्याच्या आर्थिक विकासाचे प्रतीक आहे असे म्हणता येईल. स्थूल राज्य उत्पन्नाची रचना लक्षात घेता, त्यामध्ये महत्वपूर्ण संक्रमण झाले असल्याचे स्पष्ट होते. विशेषतः स्थूल राज्य उत्पन्नाच्या रचनेत १९९१ च्या नविन आर्थिक सुधारणांनंतरच्या काळात विशेष बदल झाल्याचे दिसून येते. १९६०-६१ साली स्थूल राज्य उत्पन्नामध्ये कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा वाटा अनुक्रमे २६.०१, २४.५८ आणि ४९.३९ टक्के असा होता. १९९०-९१ मध्ये त्यात अनुक्रमे १७.८९, ३२.७५ आणि ४९.३४ तर २०१०-११ साली या तिन्ही क्षेत्रांचा वाटा अनुक्रमे १३.०४, २८.४२ आणि ५८.५२ टक्के अशा प्रकारे बदलल्याचे दिसून येते. सेवा क्षेत्राचा स्थूल राज्यउत्पन्नातील वाटा वाढण्यासाठी १९९१ साली स्विकारण्यात आलेल्या आर्थिक सुधारणांना अनुषंगून करण्यात आलेले धोरणात्मक बदल कारणीभूत ठरले आहेत. तर दुसरीकडे, स्थूल राज्य उत्पन्नाचे कृषी क्षेत्रावरील अवलंबीत्व दरम्यानच्या कालखंडात कमी होताना दिसून येते जी राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने जमेची बाजू मानता येईल. असे असले तरी, औद्योगिकदृष्टया प्रगत असणाऱ्या या राज्यात उद्योग क्षेत्राचा स्थूल राज्य उत्पन्नातील वाटा मात्र काहीसा कमी झाल्याचे दिसते. विशेषतः १९९१ नंतरच्या कालखंडात झालेला हा बदल राज्यातील उद्योग क्षेत्राची निराशाजनक कामगिरी स्पष्ट करतो.

देशाची होत असलेली आर्थिक प्रगती मानवी विकासामध्ये रूपांतरीत होत आहे की नाही याचे मापन करण्यासाठी १९९० साली मुहंमद-उल-हक आणि अमर्त्य सेन यांनी मानव विकास निर्देशांकाचा शोध लावला. यासंदर्भात जागतिक पातळीवर भारताची कामगिरी निराशाजनक असली तरी देशातील काही प्रमुख राज्यांची कामगिरी निश्चितच समाधानकारक राहिली आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश होतो. देशातील प्रमुख राज्यांच्या क्रमवारीमध्ये महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक असून राज्याचा मानव विकास निर्देशांक (०.५७२) राष्ट्रीय स्तरापेक्षा (०.४६४) निश्चितच अधिक असल्याचे दिसते. थोडक्यात मानव विकास निर्देशांक संदर्भातील राज्याची कामगिरी समाधानकारक राहिली आहे. राज्यातील दरडोई उत्पन्नाचा विचार करता, त्यामध्ये १९६०-६१ साली ५७६ रूपयांवरून २०१२-१३ साली १०५४९३ रूपयांपर्यंत भरीव वाढ झाली आहे.

वस्तूनिर्माण, व्यापार, वाहतूक आणि दळणवळण या क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण संबंधित कालखंडात वाढल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या उद्योगनिहाय रचनेमध्ये महत्वपूर्ण संक्रमण झाल्याचे दिसून येते. वस्तुनिर्माण क्षेत्रातील उद्योगांचे ग्राहक वस्तू, दुय्यम वस्तू आणि भांडवली वस्तू उद्योग अशा वर्गामध्ये वर्गीकरण केले जाते. त्यानुसार या तिन्ही प्रकारच्या उद्योगातील रोजगाराची महाराष्ट्रातील रचना अभ्यासली असता १९७१ साली राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील एकूण रोजगारामध्ये ५०.३ टक्के वाटा ग्राहक वस्तु उद्योगाचा होता. तर दुय्यम वस्तू आणि भांडवली वस्तू उद्योगांचा वाटा अनुक्रमे २४.४ आणि २१.१ टक्के इतका होता. १९९१ साली यामध्ये अनुक्रमे ३८.८, २९.३ आणि २३.२ टक्के तर २०१० साली यात अनुक्रमे २९.७, ३६.३ आणि २६.० टक्के अशाप्रकारे बदल झालेला दिसून येतो. यावरून ग्राहक वस्तू उद्योगाचा एकूण रोजगारातील वाटा कमी होताना तर दुय्यम आणि भांडवली वस्तू उद्योगांचा वाटा वाढताना दिसून येतो थोडक्यात, ग्राहक वस्तू उद्योगामध्ये भांडवलप्रधान तंत्राचा वापर वाढत असल्याचे तर दुय्यम आणि भांडवली वस्तू उद्योगांमध्ये श्रमप्रधान तंत्राचा वापर वाढत असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रामधील रोजगाराच्या रचनेमध्ये झालेले हे संक्रमण महत्वपूर्ण होय.

राज्यातील औद्योगिक क्षेत्राच्या मोठया प्रमाणात होत असलेल्या विस्ताराबरोबरच राज्यात रोजगाराच्या संधीत वाढ होत असली तरी राष्ट्रीय पातळीवरील औद्योगिक क्षेत्रातील एकूण रोजगारातील राज्याचा वाटा घटत असल्याचे दिसून येते. विशेषत: आर्थिक सुधारणांच्या कालखंडात यामध्ये लक्षणीय घट झाली आहे. १९७९-८० साली यासंबंधी राज्याचा वाटा १७.४५ टक्के इतका होता. १९९०-९१ साली तो १५.१८ टक्क्यांपर्यंत तर २००७-०८ साली त्यात ११.०० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे दिसून येते. थोडक्यात आर्थिक सुधारणांच्या कालखंडात राज्यातील उद्योग क्षेत्रातील उत्पादन तंत्रामध्ये झालेल्या बदलामुळे रोजगारात अपेक्षीत वाढ झालेली नाही हे स्पष्ट होते.

महाराष्ट्र राज्याने कृषी क्षेत्रातही समाधानकारक प्रगती साधली आहे. पारंपरिक पिकांबरोबरच व्यवसायीक पिकांच्या उत्पादनात राज्याचे स्थान आघाडीवर असून राज्य सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या कृषी धोरणांचा हा एक सकारात्मक परिणाम असल्याचे म्हणता येईल. राज्यातील अन्नधान्य उत्पादनामध्ये १९६०-६१ साली ७,७४४ मे.टनांवरून २०१०-११ साली १५,४१७ मे.टनांपर्यंत जवळपास दुपटीने वाढ झाली आहे. याबरोबरच व्यवसायीक पिकांच्या उत्पादनामध्ये भरीव वाढ झाली आहे. १९९३-९४ साली राज्यातील ऊस पिकाचे २७८९१.५ मे.टन इतके असणारे उत्पादन २०१०-११ साली ७८,८३८.० मे.टनांपर्यंत वाढले आहे. तसेच याच कालावधीत कापूस आणि तेलबियांच्या उत्पादनातही अनुक्रमे २६२५.४ हजार बेल आणि २३४६.२ हजार मे.टनांवरून ८८००.० हजार बेल आणि ४९९७ हजार मे.टनांपर्यंत भरघोस वाढ झाली आहे. तसेच राज्यातील जलसिंचनाखालील क्षेत्राचे प्रमाण १९६०-६१ साली ६.५ टक्क्यांवरून २००९-१० साली १७.५

तसेच याच कालखंडात राज्यातील साक्षरता दर ३५.१ टक्क्यांवरून ८२.९ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. तर राज्यातील आर्युमान ७०.५ वर्षे इतके असुन राष्ट्रीय स्तरावरील आकडेवारीपेक्षा (६८.४ वर्षे) अधिक असल्याचे दिसून येते. याबरोबरच १९६०-६१ ते २०१०-११ या कालखंडात राज्यातील मृत्यूदर १२ वरून २८ इतका कमालीचा खाली आला असून राज्यामध्ये आरोग्य सुविधांचा मोठया प्रमाणात झालेला विस्तार यावरून स्पष्टपणे दिसून येतो. तसेच राज्यातील दरडोई आरोग्य खर्चात देखील वाढ होताना दिसते. १९८५-८६ साली ६३.७३ रूपये असणारा हा खर्च २००६-०७ साली २२८.१० रूपयांपर्यंत वाढला असून सरकारच्या आरोग्यावरील खर्चात झालेली वाढ यावरून स्पष्ट होते.

दारिद्र्यनिर्मुलन हे राज्य सरकारच्या विविध आर्थिक धोरणांचे आणि नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे. राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रमाणात १९७३-७४ साली ५३.२ टक्क्यांवरून २००९-२०१० साली २४.५% पर्यंत घट झाली आहे. परंतु दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येत मात्र फारशी घट झाली नाही. १९७३-७४ साली दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या २८७.४ लाख इतकी होती २००९-१० साली ती २७०.८ लाखांपर्यंत कमी झाल्याचे दिसते. राज्यातील एकूण लोकसंख्येशी असणाऱ्या प्रमाणात घट झाली असली तर प्रत्यक्ष संख्येत मात्र फारसा फरक झालेला नसल्याने याबाबतीत सरकारची धोरणे व आर्थिक नियोजन काहीसे अपयशी ठरले असल्याचे दिसून येते.

देशातील एकूण रोजगारामध्ये महाराष्ट्राचा महत्वपूर्ण वाटा राहिला आहे. औद्योगिकरणाच्या मोठया प्रमाणात झालेल्या विस्तारामुळे आणि सेवा व कृषी क्षेत्रांच्या विकासामुळे राज्यात रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात निर्माण होत आहे. राज्यातील रोजगाराचे क्षेत्रीय विभाजन पाहता, कृषी क्षेत्रामध्ये सर्वाधिक रोजगार निर्माण होत असल्याचे दिसते. २००९-१० साली राज्यातील एकूण रोजगारामध्ये कृषी व संबंधीत क्षेत्राचा वाटा ५१.४ टक्के इतका होता. सेवा क्षेत्राचा ३०.६ टक्के तर औद्योगिक क्षेत्राचा वाटा १८ टक्के इतका असुन कृषी क्षेत्रामध्ये आजही सर्वाधिक रोजगार निर्माण होत असल्याचे दिसते. दुसरीकडे राज्यातील ग्रामीण भागातील अ-कृषी रोजगारामध्ये मात्र वाढ झाली आहे. १९८३ साली या क्षेत्रातील रोजगाराचा वाटा १४ टक्के इतका होता. २००९-१० साली त्यामध्ये २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. राज्यातील ग्रामीण भागातील अ-कृषी क्षेत्रातील रोजगारामध्ये झालेली वाढ सकारात्मक असून ग्रामीण भागातील लोकांचे कृषी क्षेत्रावरील अवलंबीत्व काही प्रमाणात अ-कृषी क्षेत्राकडे स्थलांतरीत झाल्याचे स्पष्ट करते. अ-कृषी क्षेत्रामध्ये विशेषतः बांधकाम क्षेत्राचा महत्वपूर्ण वाटा आहे.

कामगारांचे मुख्यतः दोन भागात विभाजन केले जाते. एक मुख्य कामगार आणि दोन सीमांत कामगार यापैकी मुख्य कामगारांचे क्षेत्रनिहाय विभाजन केले जाते. १९६०-६१ साली कृषी आणि संबंधीत क्षेत्रामध्ये मुख्य कामगारांचे एकूण कामगारांशी असलेले प्रमाण ६९.९ टक्के इतके होते. १९९१ साली त्यात ५५.९ टक्क्यांपर्यंत तर २००१ साली ४५.१ टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे दिसते. दुसरीकडे खणकाम,

टक्क्यांपर्यंत वाढले असून त्यामध्ये अजून मोठी वाढ होणे अपेक्षित आहे. राज्यातील अन्नधान्य उत्पादनामध्ये झालेली वाढ ही व्यावसायिक पिकांच्या उत्पादनात झालेल्या वाढीपेक्षा कमी असल्याचे दिसते. यावरून राज्यातील पिकरचनेमध्ये पारंपरिक पिकांकडून व्यावसायिक पिकांकडे महत्वपूर्ण संक्रमण झाल्याचे स्पष्ट होते.

महाराष्ट्रामध्ये गेल्या ५० वर्षांच्या कालखंडात सेवाक्षेत्राचाही मोठया प्रमाणात विस्तार झाला आहे. शिक्षण, आरोग्य, बँकींग, वाहतूक, दळणवळण सुविधांमध्ये मोठया प्रमाणात झालेल्या वाढीमुळे राज्याच्या आर्थिक विकासास निश्चितच मदत झाली आहे. राज्यामध्ये बँकींग व्यवसायाचा मोठया प्रमाणात विस्तार होत आहे. राज्यातील बँक कार्यालयांची संख्या १९७०-७१ साली १४७१ वरून २०१०-११ साली ८०३७ इतकी लक्षणीय वाढली आहे. त्यामुळे राज्याच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या वित्ताची उपलब्धता होण्यास मदत झाली आहे. तसेच याच कालखंडात राज्यातील प्राथमिक शाळा आणि रूग्णालयांची संख्या अनुक्रमे ४४५३५ आणि २९९ वरून ७५६९५ आणि १३६८ इतकी लक्षणीय वाढली आहे. शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये झालेली ही लक्षणीय वाढ राज्याच्या विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. याचबरोबर वाहतूक व्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावणा-या रस्त्यांची लांबी संबंधित कालखंडात मोठया प्रमाणात वाढली आहे. १९६०-६१ ते २०१०-११ या कालखंडात राज्यातील रस्त्याची लांबी ३९२४१ कि.मी. वरून २४१७१२ कि.मी. इतकी वाढली असून त्यामुळे राज्यातील उत्पादन साधनांची गतिक्षमता वाढण्यास व त्यामुळे एकूणच अर्थव्यवस्थेच्या विकासास गति मिळण्यास मदत होत आहे. याबरोबरच राज्याची वीजनिर्मितीची क्षमता देखील मोठया प्रमाणात वाढली आहे. १९६०-६१ साली ३२६८ दशलक्ष किलोवॅट असलेली वीजनिर्मिती २०१०-११ साली ८३०१७ दशलक्ष किलोवॅटपर्यंत वाढली आहे. परंतु राज्यातील वीज उपभोगात विशेषत: १९९१ नंतर औद्योगिकरणाच्या झपाटयाने झालेल्या विस्तारामुळे आणि जलसिंचन सुविधांमध्ये वाढ झाल्यामुळे औद्योगिक आणि कृषी-साठी वीजेच्या उपभोगात भरमसाठ वाढ झाल्यामुळे व दुसरीकडे, वीजनिर्मितीच्या दृष्टीने धोरणात्मक पाऊल उचलण्यास झालेल्या विलंबामुळे राज्यात वीजकपातीचे धोरण सरकारला अमलात आणावे लागले. सद्यपरिस्थितीत राज्यात उभारल्या गेलेल्या आणि उभारल्या जात असलेल्या वीजनिर्मिती प्रकल्पांमधून पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती झाल्यास राज्य वीजेच्या बाबतीत पुन्हा स्वयंपूर्ण होईल यात शंका नाही.

**सारांश:**

उपरोक्त विवेचनाद्वारे स्पष्टपणे दिसून येते की, महाराष्ट्राचे राष्ट्रीय पातळीवरील स्थान महत्वपूर्ण असून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते आजतागायत विशेषत: १९९१ साली स्वीकारलेल्या आर्थिक सुधारणानंतरच्या कालखंडात राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये झालेले बदल महत्वपूर्ण आहेत. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील उत्पादन, रोजगार, गुंतवणूक इ.च्या रचनेमध्ये झालेले संक्रमण सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचे असल्याचे स्पष्ट होते. एकीकडे, स्थूल राज्य उत्पन्नाच्या रचनेमध्ये

झालेला बदल सकारात्मक असला तरी स्थूल राज्य उत्पादनातील बदल रोजगार निर्मितीच्या दृष्टीने रूपांतरीत झालेला नाही. दुसरीकडे राज्यातील दरडोई उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असली तरी राज्यातील आर्थिक विषमता मात्र वाढली आहे. तसेच राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण घटले असले तरी दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या प्रत्यक्ष संख्येमध्ये अपेक्षित घट झालेली नाही. याबरोबरच राज्यामध्ये सर्वाधिक परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक होत असुन राज्यातील औद्योगिक विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे. परंतु राज्यातील औद्योगिक गुंतवणूकीमध्ये वाढ होत असली तरी त्यामुळे राज्यातील औद्योगिक रोजगारामध्ये अपेक्षित वाढ होऊ शकलेली नाही. तसेच राज्याचा आर्थिक विकास वेगाने होत असला तरी, राज्यात विकासाचा विभागीय असमतोल वाढत आहे. राज्यातील आर्थिक विकास केवळ मुंबई, ठाणे, पुणे या पट्ट्याबरोबरच औरंगाबाद, नागपुर, कोल्हापुर अशा मोजक्या शहरांपुरता मर्यादित राहिलेला आहे तर विदर्भ, मराठवाडा हे विभाग आर्थिकदृष्ट्या विकास प्रक्रियेमध्ये मागास असल्याचे दिसते. त्यामुळे राज्यातील प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक पाऊल उचलणे गरजेचे आहे. मागास भागात उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधांची उभारणी करून उत्पादन साधनांची गतीशिलता वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. राज्यातील निसर्गसंपन्नता लक्षात घेता दुर्मिळ नैसर्गिक साधन सामुग्रीचे जतन करत त्या माध्यमातुन रोजगार निर्मिती करण्यासाठी नैसर्गिक क्षेत्रांची निर्मिती लाभदायक ठरेल. त्याबरोबरच मागास भागातील जिल्हा पातळीवर कार्यरत असलेल्या एम.आय.डी.सी मध्ये सरकारी उपक्रमांच्या माध्यमातुन गुंतवणूक करून त्याभागातील औद्योगिकरणाच्या प्रक्रियेला जोराचा धक्का देण्याची गरज निर्माण झाली आहे. थोडक्यात राष्ट्रीय पातळीवरील राज्याचे आर्थिक दृष्टया असलेले अग्रणी स्थान टिकवून ठेवण्यासाठी धोरणात्मक पुनर्मांडणी करण्याची वेळ आता आली आहे.

### संदर्भ सूची :


1. *Economic Survey of Maharashtra*, Directorate of Statistics and Economics, Govt. of Maharashtra.
2. *Handbook of statistics of the Indian Economy*, Reserve Bank of India, Govt. of India.
3. *Economics Survey of India*, Govt. of India.
4. *Statistical Abstract of Maharashtra* Directorate of Statistics and Economics, Govt. of Maharashtra.
5. Savade, *Industrial Development of Maharashtra*, Govt. Publication, Govt.of Maharashtra.
6. Thomas J.J. *The Demographic Challenge and Employment Growth in India*, Economic and Political Weekly, VOL XLIX NO.6, Feb 08, 2014.

# शेतीमाल निर्यात वाढीस महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळातर्फे दिले जाणारे प्रोत्साहन

**शशिकांत चंद्रकांत आंडगे,** मोहोळ,
नागनाथ कॉलेज, ता. मोहोळ,
जि. सोलापूर.
भ्रमणध्वनी: ९७६६१०४१७५
email-shashiandge@gmail.com

फळे व भाजीपाल्याच्या उत्पादनामध्ये भारत हा चीन नंतरचा जगातील दुसरा सर्वात मोठा उत्पादक देश होय. जगाच्या एकूण फलोत्पादनामध्ये भारताचा वाटा १० टक्के एवढा आहे. आंबा, केळी, चिकू, कागदी लिंबू या फळांच्या उत्पादनामध्ये भारताचा प्रथम क्रमांक आहे. द्राक्षे, सफरचंद, संत्री या फळांच्या बाबतीतही भारताचा जगातील पहिल्या १० देशामध्ये क्रमांक लागतो. त्याचप्रमाणे फ्लॉवर कोबी च्या उत्पादनात जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचा प्रथम क्रमांक लागतो तर पानकोबी, कांदे, बटाटे, टॉमेटो, वांगी इ. च्या बाबतीतही दुसरा क्रमांक आहे. एवढे असूनही भारताचा जगाच्या एकूण निर्यातीतील हिस्सा फक्त १ टक्का एवढाच आहे. कृषी संस्कृतीची पाळेमुळे भारतात खोलवर रूजलेली आहेत. भारतातील एक अग्रगण्य राज्य म्हणून ओळख असणाऱ्या महाराष्ट्र या राज्यातील भौगोलिक परिस्थिती, पर्जन्यमानातील असमानता, जलसंचयातील नैसर्गिक अडथळे यामुळे कृषी उत्पादनावर मर्यादा पडली, हे वास्तव आहे. पण येथील शेतकरी गेल्या २०-२५ वर्षात फलोत्पादन, पुष्पोत्पादनासारख्या अपारंपरिक शेतीकडे वळले. कमी पावसाच्या प्रदेशात तापमान नियंत्रित ठेवून किफायतशीर शेतीसाठी उपयुक्त ठरणारे पॉलीहाऊस, ग्रीनहाऊस उभारण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो. परिणामी महाराष्ट्राने फलोत्पादनात आघाडी मिळवली. हापूस आंब्याबरोबरच केशर आंब्याची मोठ्या प्रमाणात परदेशात निर्यात होत आहे. सोलापूरसारख्या दुष्काळी प्रदेशातील डाळींब व बोरांनी परदेशी बाजारपेठा काबीज केल्या आहेत. थोडक्यात महाराष्ट्र राज्य हे ÷÷फ्रूट बाऊल ऑफ इंडिया÷÷ म्हणून प्रसिध्द आहे. राज्यातील १७ ते १८ लाख हेक्टर जमीन फळ पिकाखाली असून द्राक्ष, केळी, डाळिंब, काजू, संत्री, मोसंबी या पिकांच्या उत्पादनात राज्य प्रथम क्रमांकावर आहे. तसेच कांद्यासारखे पीक शेतकरी व निर्यातदारांना वरदान असून

कांदा पिकामुळे देशाला सुमारे १४०० कोटी रुपयांचे परकिय चलन प्राप्त होते. भाजीपाल्याच्या उत्पादनातही राज्य अग्रेसर असून फळे आणि भाजीपाल्याची सर्वात जास्त निर्यात महाराष्ट्रातून होते. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात कृषीमालाच्या निर्यात वृध्दीसाठी आवश्यक सुविधा मोठ्या प्रमाणावर दिसतात. तथापि आंतरराष्ट्रीय स्तरावर तुलना केल्यास या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे. या सुविधा निर्माण झाल्यास निश्चित निर्यातीत तसेच नाशवंत मालाच्या आयुष्यात वाढ होऊन कृषीमालाचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी होण्यातही त्यांचा फायदा होणार आहे. हा दूर दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवूनच महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची स्थापना करून निर्यात वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजनांची आखणी करण्याबरोबरच सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत त्याचाच आढावा या लेखामध्ये घेतला आहे.

### महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची स्थापना:

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (नियमन) १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प, योजना, कार्यक्रम राबविणे, कृषी मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ. साठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणे, निर्यात सुविधा केंद्र तसेच प्रशितकरण आणि शितगृहाची उभारणी करणे, शेतकरी बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशील असते.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत शेतमाल निर्यात वाढीसाठी दिले जाणारे प्रोत्साहन व सुविधा पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### कांदा ना हरकत प्रमाणपत्र :

कांदा निर्यात करण्यासाठी भारत सरकारने नेमलेल्या कोणत्याही एका कॅनलायझिंग एजन्सीकडे कांदा निर्यातदार म्हणून नोंदणी करावी लागते. त्यासाठी वाणिज्य मंत्रालय, भारत सरकारमार्फत सध्या एकूण १२ कॅनलायझिंग एजन्सीजची नियुक्ती झालेली आहे. या एजन्सीजमध्ये महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची फेब्रुवारी १९९९ पासुन नियुक्ती झालेली आहे. कॅनलायझिंग एजन्सी म्हणून नियुक्ती झाल्यापासून कृषी पणन मंडळाकडे देशभरातील एकूण ७३५ कांदा निर्यातदारांनी सहयोगी निर्यातदार म्हणून नोंदणी केलेली आहे. या नोंदणीकृत कांदा निर्यातदारांना कृषी पणन मंडळामार्फत कांदा निर्यातीसाठी वेळोवेळी ना हरकत प्रमाणपत्र दिले जात आहे. कृषी पणन मंडळातर्फे दर वर्षी सुमारे १.२६ लाख मे. टन कांदा निर्यातीसाठी ना हरकत प्रमाणपत्रे देण्यात येतात.

### युरोपियन देशांना कांदा निर्यातीसाठीची वाहतूक अनुदान योजना :

भारतातून युरोपिय देशात अल्प प्रमाणात कांद्याची निर्यात केली जाते. परंतु युरोपिय देशात भारतीय कांद्यास प्रचंड मागणी आहे. महाराष्ट्रातून बहुतांश कांद्याची निर्यात मुख्यत्वे आखाती देश, मलेशिया, सिंगापूर, श्रीलंका, बांग्लादेश इ. देशात केली जाते. युरोपिय देशामधील कांदा निर्यातीची संधी विचारात घेता व युरोपियन देशात निर्यातीस

| क्र. | कृषिनिर्यातक्षेत्र | अंतभूत जिल्हे | सामंजस्य करार दिनांक |
|---|---|---|---|
| १. | हापूस आंबा | रत्नागिरी, रायगड, ठाणे, सिंधुदुर्ग | १२ फेब्रुवारी २०१२ |
| २. | केसर आंबा | औरंगाबाद,जालना, लातूर, बीड, अहमदनगर, नाशिक | ११ फेब्रुवारी २०१२ |
| ३. | कांदा | पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, नाशिक, जळगाव | १६ जानेवारी २००३ |
| ४. | डाळींब | पुणे, अहमदनगर, सोलापूर, सांगली, नाशिक, लातूर, उस्मानाबाद | ९ जून २००३ |
| ५. | केळी | जळगाव, धुळे, नंदुरबार, परभणी, नांदेड हिंगोली, बुलढाणा, वर्धा | ४ जुलै २००५ |
| ६. | संत्रा | अमरावती, नागपूर | ४ जुलै २००५ |

*संदर्भ : www.msamb.com*

जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळणे गरजेचे होते. यासाठी २००६-२००७ पासून महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत खाजगी निर्यातदार व सहकारी संस्था यांना निर्यात वाहतूक अनुदान योजना घोषित केलेली आहे. या योजनेअंतर्गत १०,००० रु. प्रति रेफर कंटेनर अनुदानाची महत्तम मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. एका निर्यातदारास एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त ५०,००० रु. अनुदान देय आहे.

### कृषी निर्यात क्षेत्र :

भारताची कृषीमालाची निर्यात वाढावी व कृषीमालाच्या निर्यातीत भारताचा मोठ्या प्रमाणात सहभाग असावा या दृष्टीने केंद्र शासनाच्या वाणिज्य विभागामार्फत अपेडा ही संस्था कार्यरत आहे. निर्यातीसाठी आवश्यक सोयी सुविधा आणि एकात्मिक प्रयत्न होणे गरजेचे असल्याने अपेडा संस्थेमार्फत कृषी निर्यात क्षेत्र घोषित करून निर्यातीसाठी एकात्मिक विकास कार्यक्रम हे विविध राज्यांच्या सहाय्याने राबविण्यात येतात. यापैकी महाराष्ट्र राज्यात हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, डाळींब, केळी, संत्री, फुले व मद्यार्क निर्मिती अशा एकूण आठ पिकांसाठी कृषी निर्यात क्षेत्रे घोषित करण्यात आलेली आहेत. यातील प्रमुख कृषी निर्यात क्षेत्रे तक्त्यात दर्शविली आहेत.

### व्हेपर हिट ट्रिटमेंट सुविधा :

जपानच्या बाजारपेठेत आंबा पाठविण्यासाठी आंब्यावरील फळमाशी (फ्रुट फ्लाय) चा होणारा प्रादुर्भाव नष्ट होण्यासाठी व्हेपर हिट ट्रिटमेंट करणे आवश्यक आहे. सदरची सुविधा महाराष्ट्रात सध्यातरी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडेच आहे. जपान येथे आंब्याची निर्यात करण्यासाठी कृषी पणन मंडळामार्फत अपेडा, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने सन १९९९-२००० मध्ये सुमारे ४ कोटी रुपये

खर्चाच्या व्हेपर हिट ट्रिटमेंट ची सुविधा वाशी, नवी मुंबई येथे उभारणी करण्यात आलेली आहे. त्यामुळेच कृषी पणन मंडळाला सन २००६ पासून आंबा निर्यातीला खुल्या झालेल्या जपानला हापूस आंबा निर्यात करणे शक्य झाले. तसेच या सुविधा केंद्रावरील इतर सुविधांचा वापर करून खाजगी निर्यातदार विविध देशांना फळे व भाजीपाला निर्यात करतात. युरोपिय देशांस कारले निर्यातीसाठी सदर सुविधा केंद्राचे प्रमाणिकरण झालेले असून निर्यातदारांनी जानेवारी २०१२ पासून दि. १५ मे २०१२ पर्यंत सुमारे ३२८ मे. टन कारले निर्यात केले आहे.

## निर्यात सुविधा केंद्र :

कृषी निर्यात क्षेत्र या उपक्रमाचाच एक भाग म्हणून कृषी निर्यात क्षेत्र अंतर्गत निर्यातीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी अपेडा, नवी दिल्ली, स्थानिक सहकारी संस्था व बाजार समिती यांचे सहकार्याने करण्यात आली आहे. सध्या कार्यन्वित असणाऱ्या निर्यात सुविधा केंद्रामध्ये व्हि.एच.टी. सुविधा वाशी, नवी मुंबई येथे उपलब्ध करून दिली आहे. हापूस आंब्याची निर्यात सुविधा केंद्रे नाचणे जि. रत्नागिरी व जामसंडे जि. सिंधुदुर्ग येथे आहेत. केशर आंब्याचे निर्यात सुविधा केंद्रे जालना व लातूर येथे तर केशर आंब्याशिवाय डाळिंबाचे निर्यात सुविधा केंद्रही आहे. त्याचप्रमाणे डाळिंबाचे निर्यात सुविधा केंद्र बारामती व नाशिक मधील कळवण येथे कांद्याबरोबरच डाळिंबाचेही निर्यात सुविधा केंद्र आहे. फळे व भाजीपाल्याचे एक व कृषिमालाचे एक अशी दोन निर्यात सुविधा केंद्र इंदापूर जि. पुणे येथे आहेत. केळीची निर्यात सुविधा केंद्र वसमत जिल्हा हिंगोली व रावेर जिल्हा जळगाव येथे आहेत. संत्रासाठीचे निर्यात सुविधा केंद्र आष्टी जिल्हा वर्धा येथे आहे. याशिवाय फुलोत्पादनाचे निर्यात सुविधा केंद्र तळेगाव जि. पुणे येथे आहे. त्याचप्रमाणे फळे व भाजीपाल्याकरिताची २०, विविध फळांसाठी ७ आणि फुलोत्पादनासाठी ४ अशा ३१ नविन निर्यात सुविधा केंद्रांचे कामकाज प्रगतीपथावर आहे.

## कृषक विकिरण सुविधा केंद्र :

२००७ च्या उत्तरार्धात भारतीय आंब्यासाठी अमेरिकेची बाजारपेठ खुली करण्यात आलेली होती. अमेरिकेला आंब्याची निर्यात करण्याअगोदर आंब्यावर विकीरण प्रक्रिया करणे क्रमप्राप्त असते. महाराष्ट्रातून अमेरिका येथे आंब्याच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने लासलगाव जिल्हा नाशिक येथे कृषक विकीरण सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली. या सुविधा केंद्रामार्फत निर्यातदारांना चांगली सुविधा मिळून पणन मंडळाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त शेतमाल निर्यात होऊ शकेल या उद्देशाने कृषी पणन मंडळ, बीएआरसी आणि बीआरआयटी यांच्यामध्ये झालेल्या त्रिपक्षीय करारान्वये दि. १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१४ या कालावधीपर्यंत कृषी पणन मंडळामार्फत सदर सुविधा भाडेतत्त्वावर घेण्यात आलेली आहे.

## ग्लोबल गॅप (युरेप गॅप) प्रमाणिकरण योजना:

युरोपिय संघांतील २८ देशामध्ये भारतीय आंब्याची निर्यात करण्यासाठी ग्लोबल गॅप (युरेप गॅप) प्रमाणपत्राची आवश्यकता असते. युरोपिय संघांमधील व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन तेथील ग्राहकांना शेतीमालाच्या गुणवत्ता व सुरक्षिततेची हमी देण्याबाबत युरेपगॅप प्रमाणीकरणाची पध्दत

विकसित केलेली आहे. आता त्यांनी युरेपगॅपचे रूपांतर ग्लोबलगॅप प्रमाणीकरणामध्ये केले आहे. यामध्ये फळे व भाजीपाल्याचे प्रमाणीकरण केले जाते. विशेषतः युरोपियन देशातील शेतीमाल आयातदारांकडून ग्लोबलगॅप प्रमाणीकरणाची मागणी केली जाते. या प्रमाणपत्रामुळे ग्राहकांना अन्नसुरक्षितता प्राप्त होत असल्यामुळे वाढीव दराची प्राप्ती होते. हे ग्लोबलगॅप प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत मिळविता येते. तसेच महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ ग्लोबलगॅप प्रमाणिकरण करण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के अनुदानही देते.

**आयात-निर्यात परवाना काढून देणे व अपेडा रजिस्ट्रेशन करून देणे :**

निर्यात करण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्ती व संस्थांना आयात-निर्यात परवाना काढून देणे, अपेडा रजिस्ट्रेशन करून देणे इ. बाबतचे कामकाज कृषी पणन मंडळामार्फत करण्यात येते. याबाबत संपूर्ण मार्गदर्शन पणन मंडळामार्फत करण्यात येते. कृषी पणन मंडळाकडून आयात-निर्यात परवाना काढून देण्यासाठी प्रति परवाना रु. ५५३ आणि खाजगी व्यापाऱ्यांसाठी २२०६ रु शुल्क आकारते. एवढेच शुल्क अपेडाही आकारते.

**देशनिहाय तसेच उत्पादननिहाय परदेशातील आयातदारांची यादी उपलब्ध करणे:**

कृषी पणन मंडळाकडे विविध देशांमधील व विविध उत्पादनांची आयात करणाऱ्या आयातदारांची नावे, पत्ता आणि फोन/फॅक्स नंबर्सची यादी संकलित करण्यात येते. अशा प्रकारची यादी कृषी पणन मंडळाकडून इच्छुक संस्था वा खाजगी निर्यातदार यांना प्रति देश किंवा प्रति कृषिमालास ५० रु. प्रमाणे शुल्क आकारून उपलब्ध करून दिली जाते.

**खाजगी निर्यातदारांना निर्यातीसाठी निर्यातयोग्य गुणवत्तेच्या मालाचा पुरवठा करणे :**

निर्यातदारांना आवश्यक कृषीमालाची राज्यातील शेतकऱ्यांकडून अथवा सहकारी संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन कृषी पणन मंडळामार्फत सदर मालाचा निर्यातदारांना काही अटी व शर्तींवर पुरवठा करण्यात येतो. ५ मेट्रीक टनापर्यंत पुरवठा करण्यात येणाऱ्या मालाच्या विक्री रक्कमेवर संस्था अथवा शेतकऱ्यांकडून १० टक्के व निर्यातदारांकडून १० टक्के इतके सेवा शुल्क कृषी पणन मंडळाकडून आकारण्यात येते. ५ टनापेक्षा जास्त वजनाच्या कृषीमालाच्या पुरवठ्यासाठी प्रत्येकी ५ टक्के इतके सेवा शुल्क आकारण्यात येते.

**कृषीमालाची गुणवत्ता तपासणी, ग्रेडींग, पॅकींग इ. बाबतचे कामकाज करून प्रत्यक्ष निर्यात करून देणे :**

राज्यातून सहकारी संस्थांमार्फत कृषीमालाच्या निर्यातीमध्ये वाढ व्हावी यासाठी कृषी पणन मंडळाकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून, सद्यस्थितीत कृषी पणन मंडळाकडून सहकारी संस्थांना त्यांच्याकडील कृषी मालाची निर्यात करून देण्यात येत आहे. त्याच धर्तीवर राज्यातील इतरही शेतकऱ्यांना अथवा सहकारी संस्थांना त्यांच्याकडील कृषीमालाची कृषी पणन मंडळाकडून काही नियम व अटीनुसार निर्यात करून देण्यात येईल. ज्या संस्थांना त्यांच्याकडील कृषीमालाची निर्यात करून देण्यात येईल त्या संस्थेस प्राप्त होणाऱ्या विक्री रक्कमेवरील ३ टक्के शुल्क आकारले जाते.

कृषी पणन मंडळास प्राप्त होणाऱ्या विविध कृषीमाल निर्यातीच्या ऑर्डर्स खाजगी निर्यातदार

अथवा संस्थांना देणे :

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कृषी पणन मंडळाच्या असलेल्या विश्वासाहर्तेमुळे आणि कृषी पणन मंडळाद्वारे आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये घेण्यात येत असलेल्या सहभागामुळे परदेशातील आयातदारांकडून मोठ्या उलाढालीच्या ऑर्डर्स कृषी पणन मंडळास प्राप्त होत असतात. अशा प्रकारच्या कृषी पणन मंडळास प्राप्त होणाऱ्या ऑर्डर्स संस्थांना अथवा खाजगी निर्यातदारांना काही नियम व अटीनुसार पूर्ततेसाठी देण्यात येतील. या योजनेसाठी कृषी पणन मंडळाकडून एल.सी. रक्कमेच्या ०.५ टक्के इतके सेवा शुल्क आकारण्यात येईल.

केंद्र व राज्य शासनाकडील कृषीमाल निर्यातीबाबतच्या विविध अनुदानाच्या योजनांचे प्रस्ताव तयार करून देणे :

कृषी पणन मंडळामार्फत राज्यातील निर्यातदार सहकारी संस्था तसेच खाजगी निर्यातदार यांना शासनाच्या विविध अनुदानाच्या योजनांची माहिती देऊन त्यांनी जर संबंधित शिर्षकाखाली कृषीमाल निर्यातीचे कामकाज केले असेल तर अशा संस्थांचे अनुदानाचे प्रस्ताव तयार करून व सदरचे प्रस्ताव संबंधीत विभागाकडे सादर करून अनुदानाची रक्कम संबंधीत संस्थेला मिळवून देण्यात येतात. यासाठी १ लाख रूपयांपर्यंतच्या अनुदान रक्कमेच्या प्रस्तावासाठी १० टक्के इतके सेवा शुल्क आकारण्यात येते आणि त्यापेक्षा अधिकच्या अनुदानाच्या रक्कमेसाठी ५ टक्के इतके शुल्क आकारण्यात येते.

विविध देशांमध्ये कृषीमालाची निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेल्या क्वालिटी स्टँडर्डसबाबत, पॅकींगबाबत तसेच त्या देशातील आयात करांबाबतची माहिती उपलब्ध करून देणे :

कृषीमालाच्या निर्यातीसाठी विविध देशांमध्ये असलेल्या क्वालिटी स्टँडर्डबाबत, त्या देशामध्ये आवश्यक असलेल्या पॅकींगबाबत तसेच त्या देशामध्ये आकारण्यात येणाऱ्या आयात कराबाबतची माहिती निर्यातदार संस्थांना आवश्यक असल्यास कृषी पणन मंडळाकडून पुरविण्यात येते. त्यासाठी कृषी पणन मंडळ प्रति बाजारपेठ व प्रति उत्पादनाच्या माहितीसाठी १०० रू. इतके सेवा शुल्क आकारते.

२८, २९, ३० एप्रिल व १ मे २०१४ च्या बहुतांशी प्रसार माध्यमांमध्ये (प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीया) एक प्रमुख बातमी झळकत होती की, ÷कोकणचा राजा असणाऱ्या हापूस आंब्याला युरोपामध्ये बंदी.÷ या बातमीमुळे देशातील भारतीयांबरोबरच व युरोपात वास्तव्य करत असणाऱ्या भारतीय समुदायामध्ये आणि हापूस आंब्यावर प्रेम करणाऱ्या युरोपीय लोकांमध्ये संतापाची एक लाटच उसळली. युरोपात शतकानुशतके लोकप्रिय असणाऱ्या हापूस आंब्यावर युरोपीय संघाने प्रवेशबंदी आणली आहे. हापूस आंब्याबरोबरच वांगी, कारले, पडवळ आणि अळूकंद या भाज्यांनाही युरोपात प्रवेशापासून रोखण्यात आले. कारण गेल्या वर्षी हापूस आंबा व फळभाज्यांच्या ज्या २०७ पेट्या युरोपात दाखल झाल्या होत्या त्यामध्ये फळमाशा व कीटक आढळून आले होते. हा कीटक प्रादुर्भाव संपूर्ण युरोपातही पसरेल या भीतीने हापूस आंबा व इतर चार भाज्यांना युरोपीय समुदायाच्या २८ देशांमध्ये प्रवेशबंदी करण्यात आली. हा अनुभव भारतासाठी नविन नाही. कारण काही वर्षापूर्वी याच कारणांनी नाशिकमधून निर्यात होणाऱ्या द्राक्षांवर बंदीचा निर्णय युरोपिय संघाने घेतला होता. त्यामुळे युरोपिय देशाकडे पाठविलेला जहाजातील माल

आफ्रिका आदि देशांच्या गळ्यात मारण्याची वेळ भारतावर आली होती आणि उर्वरित माल महासागरास अर्पण करावा लागला होता. युरोपीय समुदायाच्या बंदीच्या या निर्णयामुळे भारतीय हापूस उत्पादकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होण्याबरोबरच मानहानीही होणार आहे. कारण एकटा ब्रिटन दरवर्षी एक कोटी ६० पाऊंडाची हापूस आंब्याची आयात करत होता. इंग्लंडमध्ये आंब्याच्या हंगामात दररोज २५ टन आंबा खरेदी केला जात असे.

अशा प्रकारची मानहानी टाळण्यासाठी महाराष्ट्रातील खाजगी निर्यातदार अथवा सहकारी संस्थांनी परदेशात शेतमालाची निर्यात करावयाची झाल्यास महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शनानुसार करणे उचित ठरते.

## संदर्भ सूची :


१) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, *वार्षिक अहवाल* २००७-०८ ते २०११-१२.

२) Maharashtra State Agricultural Marketing Board, *Annual Report*, 2010-11.

३) गोविंद हांडे, *÷÷शेतकऱ्यांनो स्वतःच करा निर्यात,÷÷* लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, महाराष्ट्र शासन.

४) उदय देशमुख, *÷÷शेतकरी झाला ग्लोबल,÷÷* लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, महाराष्ट्र शासन.

५) रोमन संजय, *÷÷हमी शुध्दतेची÷÷* लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, महाराष्ट्र शासन.

६) यादव दादाभाऊ व सपकाळ संजय, *÷÷डाळिंब निर्यातीला आहे चांगली संधी,÷÷* दै. ॲग्रोवन, दि. १९ ऑक्टोबर २०१०.

७) गोविंद हांडे, *÷÷परदेशातील शेतीमाल निर्यातीसाठी आवश्यक प्रमाणपत्रे,÷÷* दै ॲग्रोवन, दि. ३१ मार्च २०१०.

८) *÷कृषि व पणन विषयक योजना,÷÷* महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन.

९) चौधरी स्वाती, *÷÷ग्लोबलगॅप प्रमाणपत्र÷÷* कृषि पणन मित्र, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे, मार्च २०१२.

१०) *÷हापूसला युरोपबंदी,÷÷* दैनिक लोकसत्ता, दिनांक-२९ एप्रिल २०१४, पान नं.१.

११) *÷कोकणचा राजा खाणी खणतो...÷÷* दैनिक लोकसत्ता, दिनांक - ३० एप्रिल २०१४, पान नं.७.

१२) *÷युरोप नाही, मग दुबई भली अन्यथा मुंबईशिवाय पर्याय नाहीच*, दैनिक लोकसत्ता, दि.-०१ मे २०१४, पान नं.६.

१३) www.msamb.com

१४) www.apeda.com

१५) www.mahaagri.gov.in.

१६) www.agricpp.nic.in.

# कोरडवाहू शेती अभियानाद्वारे शाश्वतीकरण

**मधुकर रामचंद्र वेदपाठक, मुरुड-जंजिरा,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय,जि.रायगड,
भ्रमणध्वनी: ९२७१९२५२२५
ई मेल: ved63madhu@gmail.com

महाराष्ट्र राज्य विविध प्रकारचे कृषी उत्पादने घेण्यात एक महत्वाचे राज्य आहे. शेतीचे प्रामुख्याने सहा प्रकार पडतात. जसे ओलीत शेती, कोरडवाहू शेती, बागायती शेती, आर्द्र शेती, स्थलांतरीत शेती व पायऱ्यापायऱ्यांची शेती. महाराष्ट्रात मुख्यत्वे मोसमी पावसावर अवलंबून असणारी कोरडवाहू शेती आहे. एकूण २२५.७ लाख हेक्टर पिकाखालील क्षेत्रापैकी सुमारे ८०-८५ टक्के शेती जिरायती आहे. सुमारे १७-१८ टक्के क्षेत्र बागायती शेती खाली आहे. देशपातळीवर हे प्रमाण सुमारे ४५ टक्के आहे. अशा स्थितीत कोरडवाहू क्षेत्राचा विकास अपरिहार्य ठरतो.

## कोरडवाहू शेतीच्या समस्या :

महाराष्ट्राच्या विविध विभागात पावसाचे दिवस व पर्जन्यमान यात मोठी तफावत आहे. सरासरी पावसाचे प्रमाण पाहता कोकणात ८४ दिवस, विदर्भात ४५ दिवस, मध्य महाराष्ट्रात ४० दिवस व मराठवाड्यात ३७ दिवस असे स्वरुप दिसते. अवर्षण प्रवण क्षेत्रात जेमतेम ५०० मि.मि.तर घाट माथ्याच्या काही प्रदेशात ३,५०० मि.मि. पर्यंत वार्षिक पर्जन्यमान आढळून येते. पावसाळा ऋतू सामान्यपणे जून ते ऑक्टोबर असा असतो. अलिकडे पावसाचे प्रमाण कमी होत आहे. पाऊस येण्यातच अनिश्चितता असल्याने संपूर्ण शेतीचेच भवितव्य अनिश्चित,अशाश्वत आहे. कोरडवाहू शेतीत पाण्याअभावी पाण्यावर आधारित पिके घेता येत नाही. कोरडवाहू जमिनीत एकच व अत्यंत कमी प्रमाणात पीक घेता येते, त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते. त्यांच्या उपजिवीकेला स्थैर्य प्राप्त होत नाही. कृषि नियोजनाची ठोस यशस्विता होत नाही. राष्ट्राच्या व राज्याच्या विकासाच्या दृष्टीने पाणी महत्त्वपूर्ण मानले जाते. पाण्याच्या अनुपलब्धतेमुळे जमिनीची उत्पादकता कमी होते.

गरजेपेक्षा कमी पाऊस पडल्यास सरकारपासून व्यापाऱ्यापर्यंत व

शेतकऱ्यांपासून शेतमजुरांपर्यंत प्रत्येकाच्या अडचणीत वाढ होते. प्रतिवर्षी महाराष्ट्रात कोठेना कोठे दुष्काळ दिसतो. तेव्हा प्रामुख्याने भूमीपुत्राच्या व शेतकऱ्याच्या आशा आकांक्षाचा चुराडा होतो. भुमीपुत्राला पर्यायाने देशाला स्वाभिमानाने जगु द्यायचे असेल तर शेतजमीन ओली होणे आवश्यक आहे.

### कोरडवाहू शेती सुधारणेसाठी उपाय:

महाराष्ट्रात ८० टक्के कोरडवाहू शेतकरी भरडधान्य पिकवितो. तेव्हा सरकारने कृषी विद्यापीठामार्फत ज्वारी,बाजरी सारख्या पिकांच्या सुधारित बियाण्यांचा शोध घेणे आवश्यक ठरते. त्यांच्या शेतमालाला योग्य विपणन व्यवस्था आवश्यक आहे. शेतकऱ्यांना पाणी वापराबाबत आधुनिक माहिती व प्रशिक्षण दिले पाहिजे. सर्वसामान्य लहान शेतकऱ्याची शेती सुधारणा होईल अशा सरकारी कृषी योजनांची गरज आहे. पर्वतमय भागाच्या पायऱ्याजवळील भागात वाहणारे पाणी अडवून तलाव व जलाशय निर्माण करावे. अशा कोरडवाहू शेतीसाठी विद्युत दर माफक असावेत. शेतकऱ्यांना कृषी औजारांचा पुरवठा योग्य भाडे तत्वावर व्हावा, अशा अनेक सुचना जिरायती शेती विकासासाठी करता येते. कोरडवाहू क्षेत्रातील पडणारा पाऊस व उपलब्ध स्थानिक साधनांचे योग्य नियोजन केल्यास,शेती व पुरक उपक्रमास सहाय्य केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सातत्य राहील व त्यांना स्थैर्य प्राप्त होईल. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करुन जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी कोरडवाहू शेती विकास तात्पुरता न करता कायमस्वरुपी करणे व कोरडवाहू शेतीच्या उत्पादकतेत शाश्वतता आणणे गरजेचे आहे, हे काम विहीत कालावधीत अभियान स्वरुपात व सर्व समावेशक होणे महत्वाचे आहे.

### कोरडवाहू शेती अभियान:

१ जानेवारी २०१४ रोजी शाश्वत जिरायती शेतीसाठी महाराष्ट्र सरकारने कोरडवाहू शेती अभियान या नव्या योजनेला राज्य मंत्रीमंडळाने मंजुरी दिली. जिरायती शेतीच्या विकासासाठी पुढील पाच वर्षात २० हजार कोटी रुपये खर्च केले जातील. त्यापैकी २ हजार कोटी रुपयांची तरतुद यासाठी स्वतंत्रपणे करण्यात आली. सरकारच्या विविध योजनेतून मिळणारा निधी विचारात घेवून निधीचा वापर केला जाईल. केंद्र व राज्य शासनाच्या कोरडवाहू शेती संबंधातील कार्यक्रमांच्या समन्वयातून एकत्रीत कार्यक्रम घेतला जाईल.

### कोरडवाहू शेती अभियानाचे उद्देश:

१) कोरडवाहू शेतीची उत्पादकता वाढवणे, प्रति क्विंटल उत्पादन खर्च कमी करणे व उत्पन्न वाढवून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे.

२) मुलस्थानी मृद जलसंधारणासह साखळी बंधारे,शेततळी या माध्यमातून संरक्षित सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे.

३) सूक्ष्म सिंचनाचा वापर करुन सिंचनाची कार्यक्षमता वाढविणे.

४) यांत्रिकीकरणाद्वारे उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकता वाढविणे.

५) शेतमालास योग्य भाव मिळवण्यासाठी नियंत्रीत शेती, प्राथमिक कृषि प्रक्रिया व पणन सुविधा निर्माण करणे.

६) खासगी क्षेत्राच्या सहभागातून सार्वजनिक-खासगी भागीदारी करुन कोरडवाहू शेतीतील धोके कमी करण्याचा व्यापक कार्यक्रम हाती

घेणे.

७) पीक विमा योजनेचे बळकटीकरण करुन शेतकऱ्याच्या उत्पन्नाला व्यापक संरक्षण देणे.

८) कोरडवाहू तंत्रज्ञानाचा पीक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करणे.

९) प्रशिक्षण, शेतीशाळा, अभ्यास दौरे यांच्या माध्यमातून मनुष्यबळाचे सबलीकरण करणे.

महाराष्ट्र राज्यातील हमखास सिंचन क्षेत्राखाली न येणारे क्षेत्र हे या अभियानाचे कार्यक्षेत्र आहे. महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांतील ३५१ तालुक्यांपैकी ३४७ तालुक्यांमध्ये प्रत्येकी एका गावाची निवड करण्यात येणार आहे. एका गावात एका वर्षात किमान १ कोटी खर्च करणे अपेक्षित आहे. यावर्षी महाराष्ट्रात अवर्षण प्रवण क्षेत्रातील १५१ तालुक्यांतील गावांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी सुरु होणार आहे. या अभियानाचा लाभ सर्वच शेतकऱ्यांना मिळणार नाही. लाभार्थींमध्ये अल्प व अत्यल्प भूधारक, महिला व मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. जे शेतकरी, शेतकरी गटामध्ये सहभागी होऊन गटाधारीत उपक्रम राबवण्यास तयार असतील, जे शेतकरी मूलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करतील, जे शेतकरी सुक्ष्म सिंचन पद्धती अवलंबण्यास तयार असतील अशा शेतकऱ्यांना कोरडवाहू शेती अभियानाचा लाभ मिळणार आहे.

**अभियानांतर्गत घटक:**

अभियानाचे विविध घटक व त्यांचे अनुदान निधीसंबंधी मर्यादा सांगण्यात आल्या.

१) मनुष्यबळ विकास : यामध्ये कर्मचारी प्रशिक्षण, २० शेतकऱ्यांचा एक गट याप्रमाणे एका गावातून कमाल २५ गटांचे संघटन, त्या गटांच्या प्रमुखांना प्रशिक्षण, शेतीचे उच्च तंत्रज्ञान देवून शेतीची उत्पादकता व उत्पादन वाढीसाठी माहिती देणाऱ्या *शेतकरी शेती शाळा* प्रत्येक हंगामात ५० शेतकऱ्यांना ५ दिवसांचा राज्यांतर्गत शेतकरी अभ्यास दौरा यांचा समावेश मनुष्यबळ विकास घटकात होतो.त्यावर १०० टक्के अनुदान असेल.

२) संरक्षित सिंचन सुविधा: जलस्त्रोत बळकट करणे, पावसाचे पाणी अडवणे, भूगर्भातील पाण्याचे पुर्नभरण करणे, खरीप व रब्बी पिकांना संरक्षित सिंचन सुविधा देणे व धरणात माती वाहून येवू नये यासाठी *साखळी पद्धतीने सिमेंट नाला बांध* गावामध्ये घेतले जातील त्यास १०० टक्के अनुदान राहील. संरक्षित पाणी उपलब्ध असूनही साधना अभावी उत्पादन कमी होत असेल तेथे ८०० मी.पर्यंत पाईप पुरवठा करण्यासाठी ५० टक्के अनुदान किंवा १०,००० रु.पर्यंत (जास्तीत जास्त) अनुदान दिले जाईल. तसेच विद्युत किंवा डिझेल इंजिन (५ एच.पी.) पुरवण्यासाठी ५० टक्के अनुदान किंवा महत्तम रु.१०,००० देण्यांत येतील. पाण्याचा स्त्रोत निर्माण करणे, साठवलेले पाणी झिरपून वाया जावू नये व पाणी टंचाईच्या काळात साचलेल्या पाण्याचा उपयोग होण्यासाठी शेततळी केले जातील. त्याच्या खोदकामासाठी १०० टक्के अनुदान किंवा जास्तीत जास्त ८०,००० रु. दिले जाईल. शेततळ्याच्या प्लॅस्टीक अस्तरीकरणासाठी ५० टक्के अनुदान होते आता त्यात २५ टक्के अतिरिक्त अनुदान वाढवून दिले जाईल. दुष्काळी भाग व

खारपाणपट्टी क्षेत्रामध्ये प्रामुख्याने अस्तरीकरणाचा कार्यक्रम घेण्यात येईल. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करुन अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी सुक्ष्मसिंचन या घटकाचा समावेश केला.

ठिबक सिंचनासाठी अल्प भूधारकास ६० टक्के तर बहु भूधारकास ५० टक्के अनुदान किंवा २०,००० रु.पर्यंत अनुदान देण्यांत येईल. तर तुषार सिंचनासाठी ५० टक्के अनुदान किंवा ७,००० रु. पर्यंत अनुदान असेल.

३) मूलस्थानी जलसंधारण व यांत्रिकीकरण कार्यक्रम: जलसंधारणासाठी ५० टक्के अनुदान किंवा २ लाख रु.पर्यंत अनुदान असेल तर ट्रॅक्टर किंवा पॉवर टिलरसाठी अनुदान मर्यादा ९०,००० रु. असेल.

४) कोरडवाहू पिकांच्या सुधारित बियाण्यांची प्रात्यक्षिके व मृदा तपासणी: खरीप हंगामात भात, बाजरी व तूर आंतरपीक, सोयाबीन व तूर आंतरपीक, कापूस, मूग, उडीद, भुईमूग, मका, खरीप ज्वारी तर रब्बी हंगामात रब्बी ज्वारी, हरभरा, गहू अशा पिकांच्या सुधारित बियाण्यांचा वापर करुन पीक प्रात्यक्षिके घेतली जातील व उत्पादन वाढीचे मूल्यमापन केले जाईल. पिकांना खते देताना मातीतील अन्नांशाचे प्रमाण तपासणे फायद्याचे ठरेल. यासाठी मृदा परिक्षणाच्या प्रती नमुन्याला रु.३०० चे अनुदान असेल.

५) नियंत्रित शेती: बिगर हंगामी पिक घेणे, उच्च प्रतीचे फुलांचे उत्पादन घेणे, उती संवर्धनाद्वारे तयार केलेल्या रोपांची वाढ करणे, रोपवाटीका तयार करणे यासाठी हरित गृहांची उभारणी केली जाईल. हरित गृहे उभारण्यासाठी प्रती स्क्वे.मी. रु.७५९ किंवा ५० टक्के अनुदान असेल. नैसर्गिक वायु विजनावर आधारित बिगर हंगामी पीक व उच्च मूल्यांचा भाजीपाला, फुलांचे उत्पादन घेण्यासाठी शेडनेट हाऊस (राऊंड पाईप)ला प्रती स्क्वे.मी.ला रु.३६३ किंवा ५० टक्के अनुदान दिले जाईल.

६) प्राथमिक शेती प्रक्रिया व पणन:उत्पादित शेतमालास अधिक भाव मिळावा म्हणून प्राथमिक प्रक्रियेसाठी यंत्रसामुग्रीचा पुरवठा केला जाईल. डाळ गिरणीसाठी ५० टक्के अनुदान किंवा जास्तीत जास्त ३५,००० रु. अनुदान दिले जाईल. ज्वारी, बाजरी, नाचणी पिकांच्या मूल्य वृद्धीसाठी भरडधान्य प्रक्रिया यंत्र पुरवताना १०० टक्के अनुदान किंवा ४,००,००० रु. अनुदान मर्यादा असेल. फळबाग, भाजीपाला इ. उत्पादीत मालाचा दर्जा टिकविणे व सुरक्षित वाहतुकीसाठी प्रती शेतकरी गटाला प्लॅस्टीक क्रेट ५० टक्के अनुदानावर किंवा रु. १०० या मर्यादेपर्यंत अनुदान दिले जाईल. शेतावरच शेतमाल साफसफाई, प्रतवारी व पॅकींग करुन तात्पुरती साठवणूक करणे, नाशवंत मालाचे आयुष्य व दर्जा वाढविणे, कच्च्यामालावर प्रक्रीया करुन त्याची गुणवत्ता वाढविणे, मध्यस्थांची संख्या कमी करुन उत्पादकाला वाजवी भाव व ग्राहकाला योग्य दरात मिळावा यासाठी पॅक हाऊसची उभारणी होईल त्यासाठी ५० टक्के अनुदान किंवा १,५०,००० रु. अनुदान मर्यादा राहील. शेतमालाची

ग्राहकांना थेट विक्री व्हावी, त्याची त्वरित वाहतुक व्हावी म्हणून शेतकरी गटांना वाहन खरेदीसाठी ५० टक्के अनुदान किंवा जास्तीत जास्त २,००,००० रु.देण्यात येतील.

ठिबक सिंचनासाठी अल्प भूधारकास ६० टक्के तर बहु भूधारकास ५० टक्के अनुदान किंवा २०,००० रु. पर्यंत अनुदान देण्यात येईल. तर तुषार सिंचनासाठी ५० टक्के अनुदान किंवा ७,००० रु. पर्यंत अनुदान असेल.

३) मूलस्थानी जलसंधारण व यांत्रिकीकरण कार्यक्रमः जलसंधारणासाठी ५० टक्के अनुदान किंवा २ लाख रु.पर्यंत अनुदान असेल तर ट्रॅक्टर किंवा पॉवर टिलरसाठी अनुदान मर्यादा ९०,००० रु. असेल.

४) कोरडवाहू पीकांच्या सुधारीत बियाण्यांची प्रात्यक्षिके व मृदा तपासणीः खरीप हंगामात भात, बाजरी व तूर आंतरपीक,सोयाबीन व तूर आंतरपीक, कापुस, मुग, उडीद, भुईमूग, मका, खरीप ज्वारी तर रब्बी हंगामात रब्बी ज्वारी,हरभरा,गहू अशा पिकांच्या सुधारित बियाण्यांचा वापर करुन पीक प्रात्यक्षिके घेतली जातील व उत्पादन वाढीचे मूल्यमापन केले जाईल. पिकांना खते देताना मातीतील अन्नांशाचे प्रमाण तपासणे फायद्याचे ठरेल. यासाठी मृदा परिक्षणाच्या प्रती नमुन्याला रु.३०० चे अनुदान असेल.

५) नियंत्रित शेतीः बिगर हंगामी पीक घेणे, उच्च प्रतीचे फुलांचे उत्पादन घेणे, उती संवर्धनाद्वारे तयार केलेल्या रोपांची वाढ करणे, रोपवाटिका तयार करणे यासाठी हरित गृहांची उभारणी केली जाईल. हरित गृहे उभारण्यासाठी प्रती स्क्वे.मी. रु.७५९ किंवा ५० टक्के अनुदान असेल. नैसर्गिक वायू विजनावर आधारीत बिगर हंगामी पीक व उच्च मूल्यांचा भाजीपाला, फुलांचे उत्पादन घेण्यासाठी शेडनेट हाऊस (राऊंड पाईप)ला प्रती स्क्वे.मी.ला रु.३६३ किंवा ५० टक्के अनुदान दिले जाईल.

६) प्राथमिक शेती प्रक्रिया व पणनः उत्पादित शेतमालास अधिक भाव मिळावा म्हणून प्राथमिक प्रक्रियेसाठी यंत्रसामुग्रीचा पुरवठा केला जाईल. डाळ गिरणीसाठी ५० टक्के अनुदान किंवा जास्तीत जास्त ३५,००० रु. अनुदान दिले जाईल. ज्वारी, बाजरी, नाचणी पिकांच्या मूल्य वृद्धीसाठी भरड धान्य प्रक्रिया यंत्र पुरवताना १०० टक्के अनुदान किंवा ४,००,००० रु. अनुदान मर्यादा असेल. फळबाग, भाजीपाला इ. उत्पादीत मालाचा दर्जा टिकविणे व सुरक्षित वाहतुकीसाठी प्रती शेतकरी गटाला प्लॅस्टीक क्रेट ५० टक्के अनुदानावर किंवा रु. १०० या मर्यादेपर्यंत अनुदान दिले जाईल. शेतावरच शेतमाल साफसफाई, प्रतवारी व पॅकींग करुन तात्पुरती साठवणूक करणे, नाशवंत मालाचे आयुष्य व दर्जा वाढविणे, कच्च्या मालावर प्रक्रीया करुन त्याची गुणवत्ता वाढविणे, मध्यस्थांची संख्या कमी करुन उत्पादकाला वाजवी भाव व ग्राहकाला योग्य दरात मिळावा यासाठी पॅक हाऊसची उभारणी होईल त्यासाठी ५० टक्के अनुदान किंवा १,५०,००० रु. अनुदान मर्यादा राहील. शेतमालाची ग्राहकांना थेट विक्री व्हावी, त्याची त्वरित वाहतुक व्हावी म्हणून शेतकरी गटांना वाहन खरेदीसाठी ५० टक्के अनुदान किंवा जास्तीत जास्त २,००,००० रु.देण्यात येतील.

७) प्रशासकीय व संकीर्णः अभियानाचा २ टक्के निधी हा अभियान व्यवस्थापनावर केला जाईल.

कृषी संस्कृतीची पाळेमुळे खोलवर रुजली तरी महाराष्ट्रातील भौगालिक परिस्थिती, पर्जन्यमानातील असमानता, जल संचयासाठीचे नैसर्गिक अडथळे यामुळे कृषी उत्पादनावर मर्यादा पडते हे वास्तव आहे. पण त्यावर मात करण्याचा प्रयत्न करणारी कोरडवाहू शेती अभियानाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. त्याची प्रामाणिक अंमलबजावणी झाल्यास आणि सरकारच्या या अभियानाला कोरडवाहू शेतकऱ्याने योग्य प्रतिसाद दिल्यास अशाश्वत कोरडवाहू शेती ही शाश्वत ठरेल. याप्रसंगी वसंतराव नाईक यांचे पुढील शब्द प्रेरणादायी ठरतील, *नाल्या-ओढ्याचे पाणी आणून जमीन भिजवा, ते न जमले तर डोक्यावर पाणी आणून जमीन भिजवा, ओंजळीने पाणी आणा, ते ही न जमले तर घाम गाळून जमीन भिजवा, पण जमीन ओली करा.*

**संदर्भ सूची:**


१) संचालक (वि.व.प्र.) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणेद्वारा २०१३-१४ मध्ये कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रमाची सुधारीत मार्गदर्शक सुचना दि.९.१०.२०१३.

२) पवार, संपतराव (२००९) *कोरडवाहू शेती नियोजनानेच दुर्दशा टाळता येईल*, दै. लोकसत्ता, विशेष, दि.२८.८.२००९.

३) पाटील, सुभाष (२०१३) *कृषी विकास आव्हानांचे पीक*, अर्थपूर्ण, पुणे, जून २०१३.

४) लोकराज्य, अंक फेब्रु.२०१४, मे २०१२, जून २०१२, फेब्रु.२००५.

5) *www.andolan-npm.in*

6) *http://anandnagri.com*

7) *http://www.marathwadaneta.com/marathwada/aurangabad*

८) युनिक बुलेटिन, मार्च २०१४.

# महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग

**रामकृष्ण टाले**, खापरखेडा
प्राचार्य, बॅरि. शेषराव वानखेडे कला-
वाणिज्य महाविद्यालय, जिल्हा नागपूर.
भ्रमणध्वनी: ९४२३४०८१६९

**मनिष काशिनाथ कायरकर**, बल्लारपूर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला वाणिज्य महिला महाविद्यालय, जिल्हा चंद्रपूर.
भ्रमणध्वनी : ९४२३४१७२२

अतिशय वेगाने विकास करणारा आणि भरपूर उत्पन्न मिळवून देणारा जगातील एक मोठा उद्योग म्हणून पर्यटन उद्योग समोर आला असून कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात कृषी आणि उद्योग क्षेत्रापेक्षा अधिक योगदान देण्याचे सामर्थ्य या उद्योगात असल्याचे अनेक अध्ययनावरून दिसून आले आहे. कोणत्याही प्रकारच्या उत्पादनाची निर्यात न करता देशाला विदेशी चलन मिळवून देणारा पर्यटन हा जगातला एकमात्र उद्योग ठरला असून विकसनशील देशांच्या विदेशी चलन प्राप्ती आणि शोधनशेषातील असंतुलन यासारख्या समस्यांच्या निराकरणात पर्यटन उद्योगाची भूमिका ही महत्त्वाची व निर्णायक ठरणारी असल्याचे दिसून येते.

**पर्यटन व पर्यटक :**

अन्य आर्थिक क्रियांप्रमाणे पर्यटन ही सुध्दा एक आर्थिक क्रिया असून ती मागणी निर्माण करते किंवा विविध प्रकारच्या उद्योगांकरिता बाजारपेठ उपलब्ध करून देते. प्राचीन काळापासूनच मानवाला प्रवासाची म्हणजेच पर्यटनाची आवड असल्याने माहिती मिळविण्यासाठी आणि आनंद लुटण्यासाठी तो सर्वत्र प्रवास करीत असल्याचे दिसून येते. जागतिक पर्यटन संघटनेनुसार "जेव्हा लोक २४ तासांपेक्षा अधिक मात्र एक वर्षापेक्षा कमी कालावधीकरिता आपल्या निवासस्थानाच्या बाहेर असतात तेव्हा या प्रकारच्या क्रियेचा पर्यटनात समावेश केला जातो."

पर्यटन उद्योगातला एक महत्त्वाचा घटक म्हणजे पर्यटक होय. बुरकार्टच्या

मते, "पर्यटन उद्योगाचे अस्तित्व आणि उत्पन्न हे पर्यटकांद्वारे केल्या जाणाऱ्या खर्चावर अवलंबून आहे." नेगी यांच्या मते "आनंद घेण्यासाठी विविध प्रकारच्या दृश्यांचे अवलोकन करीत प्रवास करणारी व्यक्ती ही पर्यटक होय." आपल्या निवासी देशात विविध उद्देशाने भ्रमण करणाऱ्या व्यक्तीला स्वदेशी किंवा अंतर्गत पर्यटक म्हटल्या जाते. आपल्या निवासी देशाच्या सीमा ओलांडून दुसऱ्या देशात पर्यटन प्रवास करणाऱ्या पर्यटकाला विदेशी पर्यटक समजले जाते.

**पर्यटन उद्योगः**

आर्थिक दृष्टिकोनातून पर्यटनाच्या उद्देशांचा विचार केला तर आपल्याला असे दिसेल की, पर्यटन उत्पादनाची निर्मिती करणे, त्या उत्पादनाच्या उपभोगाकरिता बाजारपेठेची निर्मिती करणे आणि या माध्यमातून पर्यटन उत्पादनांना पर्यटकांपर्यंत पोहचविणे तसेच कोणत्याही वस्तूची निर्यात न करता विदेशी चलन प्राप्त करण्याबरोबर लोकांना विविध प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध करून देणे आदी आर्थिक उद्देश पर्यटन उद्योगाचे दिसून येतात. पर्यटन उद्योगाची निश्चित आणि काटेकोर अशी परिभाषा करणे फार कठीण जाते कारण पर्यटन उद्योग हा प्रमाणित औद्योगिक वर्गीकरणांतर्गत (Standard Industrial Classification) एका विशिष्ट शीर्षकांतर्गत येणारा उद्योग नाही. पर्यटन हा एक विशिष्ट प्रकारचा उद्योग नसला तरी आर्थिकदृष्ट्या विचार करता पर्यटनातून मागणी निर्माण केली जाऊ शकते म्हणून पर्यटनाशी संबंधित सर्व क्रिया पर्यटन उद्योगांतर्गत येतात. लॉयड (Lloyd) यांच्या निरिक्षणाप्रमाणे "पर्यटन उद्योग हा सजातीय असणाऱ्या सेवा आणि उद्योगांचा समूह आहे." पर्यटन उद्योगाची परिभाषा करताना बहुतांशी परिभाषांमध्ये पर्यटनाशी संबंधित विविध उद्योगातील सेवांवर जसे - परिवहन, हॉटेल, खानावळ, किरकोळ विक्री, मनोरंजन आदी सेवांवर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून येते. यंग यांच्या मते "पर्यटन हा सजातीय उद्योगांचा समूह असून यात विविध प्रकारच्या अशा अनेक व्यापार व उद्योगांचा समावेश होतो की, ज्यांचे सामान्य कार्य हे पर्यटकांच्या विविध प्रकारच्या गरजांची पूर्तता करणे हे असते. परिवहन, निवास, भोजन, मनोरंजन, मध्यस्थांच्या सेवा, पर्यटन माहिती केंद्र, पर्यटन संघटना आणि सरकारी विभाग आदी पर्यटन उद्योगाचे घटक आहेत.

**पर्यटन उत्पादनः**

पर्यटन उत्पादनांमध्ये नैसर्गिक सृष्टिसौंदर्याची स्थळे, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्मारके, वास्तुशिल्पे, अवशेष तसेच लोककला, मूर्ती व हस्तकलेच्या वस्तू, पर्यटकांना आकर्षित करणारी मनोरंजनाची केंद्रे, सेवासुविधा, प्राणी व वनस्पती यासारखे प्राकृतिक घटक, हवामान, दळणवळण आदी गोष्टींचा यात समावेश होतो.

**महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगः**

महाराष्ट्र हे देशातील व्यापारिक व औद्योगिकदृष्ट्या प्रगत असे राज्य असून पर्यटनांतर्गत विदेशी पर्यटकांच्या सर्वाधिक पसंतीचे राज्य म्हणून पुढे आले आहे. ३.०८ चौ.कि.मी. क्षेत्रफळ असणाऱ्या या राज्याची २०११ च्या जनगणनेप्रमाणे ११.२४ कोटी इतकी लोकसंख्या आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राचा लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्रफळाच्या बाबतीत देशात दुसरा क्रमांक लागतो. गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, गोवा आणि कनार्टक या राज्यांच्या

सीमांनी राज्याची भौगोलिक सीमा निश्चित झाली आहे.

नैसर्गिक सौंदर्याची लयलूट असलेल्या या राज्याला जवळपास ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. सह्याद्रीसारख्या उंच पर्वतरांगा या राज्यात असून या पर्वतरांगामधून गोदावरी, नर्मदा आणि कृष्णेसह अनेक नद्या उगम पावतात. एकूणच पर्यटनाच्या दृष्टीने राज्याला वैभवशाली वारसा लाभला असून पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या अनेक ऐतिहासिक वास्तू आणि प्राचीन स्मारके राज्यात आहेत. इतकेच नाही तर महाबळेश्वर, चिखलदरा, माथेरान यासारखी थंड हवेची ठिकाणे आहेत. तसेच अनेक ठिकाणी नैसर्गिक धबधबे असून राज्यातील व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये स्वदेशी पर्यटकांबरोबरच विदेशी पर्यटकांचे आकर्षण आहे. महाराष्ट्रात जवळपास ४६९ किल्ले आणि ९०० लेण्या असून शिर्डी, शेगाव, पंढरपूर, गणपतीपुळे यासारखी प्रसिध्द धार्मिक स्थळेसुध्दा आहेत. निसर्ग पर्यटन, धार्मिक पर्यटन याबरोबरच वैद्यकीय आणि कृषी पर्यटनाच्या फार मोठ्या संधी राज्यात आहेत. राज्यात रेल्वे, रस्ते आणि दळणवळण सेवांचा बऱ्याच प्रमाणात विकास झाल्यामुळे राज्यात पर्यटन उद्योगाच्या विकासाला पोषक असे वातावरण निर्माण झाले आहे. या सुविधांचा पर्यटन उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने उपयोग करून घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज आहे.

भारतातील पर्यटन क्षेत्राच्या विकासाचा विचार करता काही राज्यांनी फार मोठ्या प्रमाणात आपल्या राज्यातील पर्यटन क्षेत्राचा व पर्यायाने पर्यटन उद्योगाचा विकास घडवून आणला आहे. त्या तुलनेत महाराष्ट्र काही अंशी मागे असला तरी महाराष्ट्रात पर्यटन उद्योगाच्या विकासाच्यादृष्टीने काहीच प्रयत्न झाले नाही असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्राला लाभलेल्या ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसाचा राज्यातील पर्यटन विकासाकरिता उपयोग करून घेता यावा यासाठी १९६९ मध्ये राज्यात 'पर्यटन संचालनालय' स्थापन करण्यात आले. अर्थातच राज्यातील पर्यटन क्षेत्राचा विकास घडवून आणणे हे या संचालनालयाचे मुख्य उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. पुढे या संचालनालयाकडून राज्यातील पर्यटन विकासाबाबतच्या ध्येयधोरणांची योग्य अंमलबजावणी होणे कठीण जात असल्याचे लक्षात येताच तसेच व्यापारिकदृष्ट्या पर्यटनाचा व्यवस्थित विकास करण्यासाठी कंपनी कायदा १९५६ अंतर्गत महाराष्ट्र सरकारने १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची (Maharashtra Tourism Development Corporation) स्थापना केली, या महामंडळाला भाग भांडवलाच्या रूपात राज्य सरकारकडून वित्तीय सहाय्यता प्राप्त होते. राज्यातील पर्यटन विकासाची जबाबदारी या महामंडळाकडे सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती आणि औरंगाबाद तसेच दिल्ली येथे महामंडळाची विभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली असून पर्यटन क्षेत्राचा शोध घेऊन त्याचा विकास करणे तसेच त्यासंबंधी मार्गदर्शनाचे काम या कार्यालयाकडे सोपविण्यात आले आहे. एकूणच महाराष्ट्रातील पर्यटन विकासाची जबाबदारी समर्थपणे सांभाळण्याचे काम *MTDC* करीत आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत पर्यटन क्षेत्राचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने ९ मार्च १९९९ च्या शासन

निर्णयान्वये राज्यात पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिला. राज्यातील पर्यटन उद्योगाच्या विकासाकरिता राज्य सरकारने 'पर्यटन नीती' पर्यटन प्रोत्साहन योजनांच्या स्वरूपात सादर केल्या असून त्यामध्ये राज्यातील पर्यटन उद्योगाच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आर्थिक तरतूदी केलेल्या आहेत. राज्यातील सिंधूदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला तर औरंगाबादला राज्याची 'पर्यटन राजधानी' म्हणून जाहीर करण्यात आले आहे. इतकेच नाही तर राज्यातील पर्यटनाचा वेगाने विकास व्हावा यासाठी २०११-२०१२ हे वर्ष 'पर्यटन वर्ष' म्हणून राज्य शासनाद्वारा घोषित करण्यात आले होते. एकूणच राज्यातील पर्यटन उद्योगाच्या विकासाकरिता महाराष्ट्र सरकार सर्वोतोपरी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत अध्ययनात महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाचे स्वरूप समजून घेत असतांना राज्याला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या, राज्याच्या स्थूल अंतर्गत उत्पन्नात पर्यटन उद्योगाचा वाटा, पर्यटन उद्योगापासून मिळणारा महसूल, रोजगार आणि त्यातील गुंतवणूक तसेच निवासव्यवस्था या काही मुद्दयांचा विचार करणे इथे क्रमप्राप्त वाटते.

## पर्यटकांची संख्या:

पर्यटक हा पर्यटन उद्योगासाठी ग्राहक असल्यामुळे पर्यटन उत्पादनाच्या मागणीच्या दृष्टीने पर्यटकांची संख्या ही महत्त्वाची ठरते. कोणत्याही राज्यातील पर्यटन विकास हा त्या राज्यात किती पर्यटक येतात यावर अवलंबून असतो. उत्पादने ही कितीतही दर्जेदार असली तरी जोपर्यंत ती उपभोगली जात नाही तोपर्यंत त्याला काही अर्थ नसतो. हॉटेल्स्, भोजनालये, परिवहन सेवा यासारख्या पर्यटन उत्पादनाची मागणी, महसूल प्राप्ती, रोजगार निर्मिती आदिंवर पर्यटकांच्या संख्येचा परिणाम होतो. या दृष्टीने पर्यटकांच्या संख्येला किती महत्त्व आहे हे लक्षात येईल. एकूणच पर्यटकांची संख्या पर्यटन उद्योगाच्या विकासाची दिशा निर्धारित करीत असते, असे म्हणता येईल.

सर्वाधिक विदेशी पर्यटक भेट देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा लौकिक आहे. कोणत्याही राज्याच्या दृष्टीने विदेशी पर्यटकांची संख्या ही अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते. कारण विदेशी पर्यटक हा अधिक खर्च करीत असतो आणि त्याचा फायदा हा राज्यातील पर्यटन उद्योगाला होतो. भारत सरकारच्या पर्यटन अहवालाप्रमाणे सन २०१२ मध्ये भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांपैकी जवळपास २४.७ टक्के म्हणजेच ५.१ मिलीयन विदेशी पर्यटकांनी महाराष्ट्राला भेट दिली होती. या वर्षात विदेशी पर्यटक येण्याच्या संदर्भात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक राहिला.

महाराष्ट्राला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या अभ्यासली असता असे दिसून आले की, सन २००० मध्ये एकूण ९.३७ दशलक्ष पर्यटकांनी महाराष्ट्राला भेट दिली होती. यामध्ये ८.३ दशलक्ष स्वदेशी पर्यटक होते तर १.१ दशलक्ष हे विदेशी पर्यटक होते. राज्यातील भेट देणाऱ्या एकूण पर्यटकांमध्ये विदेशी पर्यटकांचे प्रमाण ११.४७ टक्के इतके होते. या वर्षात भारतातील विविध राज्यांना भेट देणाऱ्या एकूण स्वदेशी पर्यटकांपैकी ६.०७ टक्के स्वदेशी पर्यटकांनी महाराष्ट्राला भेट दिली होती. तर विदेशी पर्यटकांच्या बाबतीत राज्याची टक्केवारी ही २३.१७ टक्के अशी होती म्हणजेच या वर्षात स्वदेशी पर्यटकांसंदर्भात देशात महाराष्ट्राचा ७ वा आणि विदेशी पर्यटकांच्या

संदर्भात देशात दुसरा क्रमांक होता. सन २००५ मध्ये महाराष्ट्राला भेट देणाऱ्या एकूण १५.७७ दशलक्ष पर्यटकामध्ये ९.१९ टक्के म्हणजे १.४५ दशलक्ष हे विदेशी पर्यटक होते. सन २०१० मध्ये महाराष्ट्राला भेट देणाऱ्या पर्यटकांची एकूण संख्या ही ५३.५५ दशलक्ष इतकी होती. ज्यामध्ये विदेशी पर्यटकांचे प्रमाण हे ९.४९ टक्के (५ दशलक्ष) तर स्वदेशी पर्यटकांचे प्रमाण हे ९०.५१ टक्के (४८.५ दशलक्ष) होते. सन २०१२ मध्ये एकूण ७१.४५ दशलक्ष पर्यटकांनी महाराष्ट्राच्या विविध पर्यटन स्थळांना भेट दिली त्यामध्ये ७.७२ टक्के (५.१दशलक्ष) विदेशी पर्यटक तर ९२.२८ टक्के (६६.३३ दशलक्ष) स्वदेशी पर्यटक होते. एकूणच महाराष्ट्राला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या सतत वाढत असल्याचे यावरून दिसून येते. सन २०११ च्या आकडेवारीप्रमाणे सुध्दा महाराष्ट्राचा विदेशी पर्यटकांच्या आगमनासंदर्भात पहिला क्रमांक होता. एकूणच विदेशी पर्यटकांच्या आगमना संदर्भात महाराष्ट्राचे स्थान सातत्यपूर्णरितीने वरच्याच क्रमांकावर असल्याचे यासंदर्भातील आकडेवारीवरून दिसून येते. थोडक्यात पर्यटकांच्या संख्येच्या दृष्टीने महाराष्ट्रात पर्यटन उद्योगाच्या विकासाला पोषक असे वातावरण असून या वातावरणाचा योग्य उपयोग करून घेण्याची गरज आहे.

### महसूल प्राप्तीः

कोणत्याही राज्याला जास्तीत जास्त महसूल मिळवून देण्याचे सामर्थ्य पर्यटन उद्योगात असलेले दिसून येते. जर राज्यात पर्यटन उद्योगाचा योग्य प्रकारे विकास झाला तर राज्याच्या महसूली उत्पन्नात महत्त्वपूर्ण वाटा पर्यटन उद्योगाचा असू शकतो. पर्यटन उद्योग हा सेवा उद्योग असल्यामुळे सरकार विविध प्रकारच्या पर्यटन सेवांवर कर आकारून हा महसूल प्राप्त करीत असते. हॉटेल्स्, भोजनालये, परिवहन सेवा, मनोरंजनाची साधने आदींवर सेवाकर आकारून सरकार आपल्या महसूली उत्पन्नात वाढ करू शकते.

महाराष्ट्राच्या महसुली उत्पन्नात पर्यटन उद्योगांचा वाटा सध्यातरी नाममात्र वाटावा असाच आहे. या संदर्भातील उपलब्ध आकडेवारी अभ्यासली असता असे दिसून आले की, सन २०००-२००१ मध्ये राज्याचे एकूण महसुली उत्पन्न हे २९५६६.९२ कोटी रुपये होते. यामध्ये पर्यटन उद्योगांपासून मिळालेला महसूल हा ०.०१ कोटी रुपये इतका होता. याचाच अर्थ या वर्षात राज्याच्या एकूण महसुली उत्पन्नात पर्यटन क्षेत्राचा वाटा हा अत्यल्प म्हणजेच ०.००००३ टक्के होता. या नंतरच्या पुढील तीन वर्षापर्यंत हीच स्थिती कायम होती. सन २००४-२००५ या वर्षात पर्यटन क्षेत्राचे महसुली उत्पन्न हे ०.५७ कोटी रुपये इतके होते. अर्थातच या वर्षात राज्याच्या महसुली उत्पन्नातील पर्यटन उद्योगाच्या वाट्याची टक्केवारी वाढलेली होती. म्हणजेच ०.००१४ टक्के इतका पर्यटन उद्योगाचा राज्याच्या महसूली उत्पन्नात वाटा होता.

सन २००६-०७ आणि २००७-०८ या दोन वर्षामध्ये मात्र राज्याच्या महसूली उत्पन्नात पर्यटन उद्योगाच्या योगदानात बऱ्यापैकी वाढ झाल्याचे दिसून येते. या दोन वर्षामध्ये पर्यटन उद्योगातील उत्पन्न हे अनुक्रमे १.८६ आणि २.३७ कोटी रुपये इतके होते. म्हणजेच राज्याच्या महसूली उत्पन्नात या क्षेत्राचा वाटा हा ०.००३० टक्के होता. नंतरच्या वर्षामध्ये मात्र पुन्हा पर्यटन महसूली उत्पन्न घटल्याचे दिसून येते. सन २००९-२०१०

मध्ये ०.२९ कोटी रुपये (०.०००३३ टक्के), २०१०-११ मध्ये २.६१ कोटी रुपये (०.००२४ टक्के) तर २०११-१२ मध्ये ३.४९ कोटी रुपये (०.००२८ टक्के) महसुली उत्पन्न होते. एकूणच राज्याच्या महसूली उत्पन्नात पर्यटनापासून मिळणाऱ्या महसूलाच्या प्रमाणात चढउतार दिसून येत असले तरी मागील तीन वर्षात अल्पप्रमाणात का असेना पर्यटन उद्योगापासूनच्या महसूली उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते. अर्थातच ही आकडेवारी महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाच्या विकासाची दिशा निर्देशित करते.

**स्थूल राज्य घरगुती उत्पादनात *(GSDP)* पर्यटन उद्योगाचे योगदानः**

पर्यटन उद्योग ही वर्तमान काळात एक महत्त्वपूर्ण आर्थिक क्रिया म्हणून विकसित झाल्यामुळे कोणत्याही राज्याच्या उत्पन्नात महत्त्वाचा वाटा उचलण्याचे सामर्थ्य या उद्योगात असलेले दिसून येते. महाराष्ट्राचा स्थूल राज्य उत्पन्नात *(GSDP)* राज्यातील पर्यटन उद्योगाच्या योगदानाचा अभ्यास करीत असतांना यासंदर्भात स्वतंत्र अशी आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे परिवहन, व्यापार, हॉटेल आणि रेस्टॉरंट आदींच्या उत्पन्नाचा पर्यटन उद्योगातील उत्पन्नाच्यासंदर्भात विचार केलेला आहे.

महाराष्ट्र राज्याचा 'आर्थिक पाहणी अहवाल २०१२-१३' मध्ये प्रकाशित राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नाची आकडेवारी अभ्यासली असता तसे निदर्शनास आले की, सन २००४-२००५ मध्ये राज्याचे स्थूल राज्य उत्पादन हे ४१५४८० कोटी रुपये (२०१२-१३ च्या किंमतीच्या आधारे) होते तर पर्यटन उद्योगाचे उत्पन्न ८९००३ कोटी रुपये एवढे होते म्हणजेच राज्याच्या *GSDP* मध्ये पर्यटन उद्योगाचा वाटा हा २१.४ टक्के इतका होता. सन २००६-०७ मध्ये पर्यटन उद्योगाचे उत्पन्न वाढले असले तरी *GSDP* मधील पर्यटन उद्योगाचा वाटा हा घसरून २०.९ टक्के इतका झाला होता. पुढील वर्षामध्ये ही स्थिती कायम असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. सन २००९-२०१० व २०१० -११ मध्ये राज्याचा *GSDP* हा अनुक्रमे ८५५७५१ आणि १०३५०८५ कोटी रुपये इतका होता तर पर्यटन उद्योगाचे उत्पन्न हे अनुक्रमे १७४९६५ व २०९६१३ कोटी रुपये असे होते.म्हणजेच राज्याच्या *GSDP* मध्ये पर्यटन उद्योगाचा वाटा हा अनुक्रमे २०.४ व २०.२ टक्के असा होता. सन २०११-१२ मध्ये राज्याच्या *GSDP* हा ११९९५४७ कोटी रुपये होता तर पर्यटन उद्योगातील उत्पन्न २३७४२३ कोटी रुपये होते. अर्थात या वर्षात प्रथमच पर्यटन उद्योगाचा राज्याच्या *GSDP* मधील वाटा हा २० टक्क्यांपेक्षा कमी (१९.८) होता.

थोडक्यात, सन २००४ ते २०१२ या काळात पर्यटन उद्योगाचे राज्याच्या *GSDP* मधील योगदान हे साधारणपणे २० ते २१ टक्के असेच राहिले आहे. एकूणच राज्याच्या *GSDP* मध्ये पर्यटन क्षेत्रातील उद्योगांचा महत्त्वपूर्ण वाटा असलेला दिसून येतो.

**रोजगार निर्मितीः**

रोजगार निर्मितीच्यादृष्टीने पर्यटन उद्योगाला अनन्यसाधारण महत्त्व असून पर्यटन क्षेत्रातील रोजगार-गुंतवणूक अनुपात हा इतर उद्योगांच्या तुलनेत बराच अधिक असल्याचे दिसून आले आहे. हॉटेल, परिवहन सेवा, भोजनालय आदींच्या माध्यमाने असंख्य लोकांना प्रत्यक्ष

रोजगार तर मिळतोच शिवाय अप्रत्यक्षपणे सुध्दा मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. विशेषतः औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या भागात उद्योगांच्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात असे अनेक अध्ययनावरून दिसून आले आहे.

महाराष्ट्रात पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या रोजगाराबाबत निश्चित व स्वतंत्र अशी आकडेवारी उपलब्ध नाही. महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार १९९९-२००० मध्ये राज्याच्या एकूण रोजगारीत हॉटेल, रेस्टॉरंट, परिवहन या पर्यटन उद्योगाच्या घटकांच्या माध्यमातून मिळालेल्या रोजगारीचे प्रमाण १३.९ टक्के होते. सन २००४-०५ मध्ये राज्याच्या एकूण रोजगारीत या उद्योगांचे प्रमाण अनुक्रमे १६.२ टक्के होते. तर सन २००७-०८ मध्ये या उद्योगांच्या माध्यमातून १४.५ टक्के लोकांना रोजगार मिळाला होता. अर्थातच ही प्रत्यक्ष रोजगारीची आकडेवारी होती अप्रत्यक्षपणे मिळणाऱ्या रोजगारीचे प्रमाण यापेक्षा बरेच अधिक असण्याची शक्यता आहे.

भारत सरकारच्या पर्यटन विभागांतर्गत प्रसिध्द झालेल्या मार्केट प्लस रिपोर्टप्रमाणे हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालय, धाबा, कॅफे हाऊस आदिंच्या माध्यमातून सन २००२ मध्ये महाराष्ट्रात एकूण २७०१९५ लोकांना प्रत्यक्षपणे रोजगार मिळाला होता. यामध्ये ४१२७१ लोकांना हॉटेलमध्ये १६५७३३ लोकांना रेस्टॉरंटच्या माध्यमातून, २३४१२ लोकांना भोजनालयाच्या माध्यमातून तर ३६०१९ लोकांना फास्ट फुड व्यवसायाच्या माध्यमातून आणि ३७६० लोकांना कॅफे सेन्टरच्या माध्यमातून रोजगार मिळाल्याचे दिसून आले. या सर्व उद्योगव्यवसायांच्या माध्यमातून सन २०१० पर्यंत ३४४६९९ लोकांना तर सन २०२० पर्यंत ४२५००२ लोकांना प्रत्यक्षपणे रोजगार मिळण्याचा अंदाज या अध्ययनात वर्तविण्यात आला आहे. यामध्ये सर्वाधिक रोजगार हा रेस्टॉरंटच्या माध्यमातून अपेक्षित आहे तर त्याखालोखाल हॉटेल उद्योगाच्या माध्यमातून रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे. पर्यटन अहवालाप्रमाणे सन २०१२ अखेर हॉटेल व्यवसायातून एकूण ६३२८२ लोकांना प्रत्यक्षपणे रोजगार मिळाला होता. त्यामध्ये ३७७६९ श्रमिक तात्पुरते तर २५५१३ श्रमिक कायम स्वरूपी होते. यातील ९ टक्के श्रमिक व्यवस्थापन कार्यात, ६४ टक्के अन्न व पेय तर हाऊसकिपींग म्हणून २१ टक्के व ६ टक्के इतर प्रकारच्या कार्यात कार्यरत होते.

राज्याच्या पर्यटन विभागांतर्गत मिळालेल्या प्रत्यक्ष रोजगारीची आकडेवारी अभ्यासली असता असे दिसून आले की, सन २००० मध्ये एकूण ५३७ श्रमिकांना या विभागात प्रत्यक्ष रोजगार मिळालेला होता तर २००४ मध्ये ४६७ श्रमिक या विभागात कार्यरत होते अर्थातच ही आकडेवारी पूर्वीच्या तुलनेत घटलेली दिसून येते याचे कारण म्हणजे कार्यरत श्रमिकांची सेवानिवृत्ती आणि नवीन भरतीचा अभाव होय. अर्थात ब्रेड अॅन्ड ब्रेकफास्ट या योजनेच्या माध्यमातून रोजगारीचा आकडा वाढवण्याची शक्यता वर्तविली गेली आहे.

**भांडवल गुंतवणूक :**

कोणत्याही उद्योगाच्या विकासाच्यादृष्टीने त्या उद्योगातील भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण महत्त्वाचे असते. भांडवल हे उत्पादनाचे महत्त्वाचे अंग असून अर्थव्यवस्था एकदा का रुळावर आली

म्हणजे उद्योग व्यवसायांची भरभराट होऊन उत्पन्न पातळी वाढायला लागली की, त्या क्षेत्रात खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक प्रेरित होते. यालाच अर्थशास्त्रज्ञ 'त्वरक परिणाम' संबोधतात. एखाद्या क्षेत्रातील पर्यटन स्थळांचा अधिक विकास झाला आणि 'पर्यटन उत्पन्न गुणकाचे' (Tourism Income Multiplier) मूल्य वाढले की पर्यटन आणि इतर संबंधित क्षेत्रातील गुंतवणूक वाढण्याची अपेक्षा करता येते. एस. मेंडलिक यांच्या मते, पर्यटनातील एकूण गुंतवणूकीच्या १० टक्के भांडवल अशा पध्दतीने व निश्चित वस्तुच्या स्वरूपात गुंतविले जाते की, त्यामुळे अन्य कोणत्याही उद्योगाच्या तुलनेत पर्यटन उद्योगातून भांडवल परत मिळण्याची शक्यता ही अधिक असते.

महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगातील गुंतवणूकीच्या संदर्भात विचार करताना पंचवार्षिक योजनांमधील तरतूद, राज्याच्या अर्थसंकल्पातील तरतूद आणि थेट विदेशी गुंतवणूक या घटकांच्या आधारे झालेल्या खर्चाचा व गुंतवणूकीचा विचार केलेला आहे. राज्यातील पर्यटनाच्या विकासाकरिता नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये १७५.३४ कोटी रुपयांची तर दहाव्या योजनेमध्ये (२००२-२००७) ११७.३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. अकराव्या योजनेत (२००७-२०१२) २३ प्रकल्पांकरिता १६२.९६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. तर बाराव्या योजनेत (२०१२-२०१७) डिसेंबर २०१३ पर्यंत ११ प्रकल्पांकरिता १०२.२६ कोटी रुपयांची गुंतवणूक मंजूर करण्यात आली आहे.

राज्यातील पर्यटनाच्या विकासाची जबाबदारी ही महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली असून हे महामंडळ राज्यातील पर्यटनाच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. सन २००५-०६ मध्ये *MIDC* ने ८ पर्यटन प्रकल्प हाती घेतलेले होते. ज्यापैकी ४ प्रकल्पांचे काम पूर्ण झाले होते. या प्रकल्पांकरिता २०.३१ कोटी रुपये इतका अनुमानित खर्च होता. त्यापैकी प्रत्यक्षात १२.६९ कोटी रुपये खर्च झालेले होते. सन २००६-०७ या वर्षामध्ये १४ प्रकल्पांकरिता २८.६९ कोटी रुपये एवढा प्रस्तावित खर्च होता. यापैकी प्रत्यक्षात १८.८३ कोटी रुपये खर्च झाले होते. म्हणजेच एकूण निधीपैकी ६५.६३ टक्के निधीचा वापर झाला होता. अर्थातच या काळातील एकूण १४ प्रकल्पांपैकी ६ प्रकल्पांचे काम पूर्ण झाले होते. सन २००७-०८ मध्ये २२.७९ कोटी रुपये प्रस्तावित खर्चापैकी २.२७ कोटी रुपयांचा म्हणजे केवळ १०.४० टक्के निधीचा आत्तापर्यंत वापर झाल्याचे दिसून येते. सन २००८-०९ मध्ये २ प्रकल्पांच्या प्रस्तावित खर्चाच्या ४०.९४ कोटी रूपयांपैकी ०.०८ कोटी रुपयांचा प्रत्यक्ष खर्च झालेला होता. म्हणजेच केवळ ०.०२ टक्के इतकाच निधी आत्तापर्यंत उपयोगात आणल्या गेल्याचे निदर्शनास येते. अर्थातच यावरून या प्रकल्पाच्या कामाची गती अतिशय कमी असल्याचे निदर्शनास येते. सन २००९-२०१० मध्ये केवळ एका प्रकल्पाचा प्रस्तावित खर्च हा ४.८६ कोटी रुपये होता आणि यापैकी प्रत्यक्षात ३.८८ कोटी रुपये खर्च झालेले होते म्हणजेच एकूण जवळपास ८० टक्के निधीचा आत्तापर्यंत वापर झालेला दिसून येतो. सन २०१०-११ या कालावधीकरिता ८ प्रकल्पांकरिता प्रस्तावित ६.०८ कोटी रुपयांपैकी ३३.२२ टक्के रक्कम आत्तापर्यंत उपयोग झाल्याचे दिसून येते.

तर २०११-२०१२ या वर्षाकरिता ३० प्रकल्पांकरिता ८५४.९८ कोटी रुपयांच्या प्रस्तावित गुंतवणूकपैकी आत्तापर्यंत प्राप्त झालेल्या ५७३.९८ कोटी रुपयांमधून १५९.३ कोटी रुपयांची प्रत्यक्ष गुंतवणूक झाली होती. म्हणजेच एकूण मंजूर गुंतवणूक निधीपैकी केवळ १८.६ टक्के गुंतवणूक झाली होती. एकूणच MTDC च्या माध्यमातून विविध प्रकल्पांमध्ये प्रस्तावित ९७८.६५ कोटी रुपयांच्या गुंतवणूकीपैकी आत्तापर्यंत जवळपास १९९.०७ कोटी रुपयांची प्रत्यक्ष गुंतवणूक (२०.३४ टक्के) या क्षेत्रात झाल्याचे दिसून येते. याआधारे असे निदर्शनास येते की, प्रकल्पांच्या निर्मितीचे कार्य हे बरेचसे धिम्या गतीने चाललेले आहेत.

राज्यातील पर्यटन क्षेत्राच्या विकासाकरिता राज्याच्या अर्थसंकल्पातील केलेल्या आर्थिक तरतुदींचा विचार करता असे दिसून आले की, सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात २८३.३ कोटी रुपयांची तर २०११-१२ च्या अर्थसंकल्पात ५१०.५ कोटी रुपयांची आणि २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात २२८ कोटी रुपयांची तरतूद महाराष्ट्र सरकारने पर्यटन उद्योगांच्या विकासाकरिता केलेली होती.

राज्याच्या पर्यटन उद्योगात विदेशी गुंतवणूक झाल्याचे दिसून आले. यासंदर्भात उपलब्ध आकडेवारी अभ्यासली असता असे दिसून आले की, सन १९९१ ते २०१२ या कालावधीत राज्यातील हॉटेल व पर्यटन उद्योगातील ९५ प्रकल्पांमध्ये एकूण ६३२६ कोटी रुपयांची थेट विदेशी गुंतवणूक (FDI) झाल्याचे दिसून आले. राज्यातील विविध उद्योगातील थेट विदेशी गुंतवणूकीच्या तुलनेत या क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण हे ७.५ टक्के एवढे होते.

राज्यातील पर्यटन शाश्वत विकासाच्या संदर्भात केल्या गेलेल्या अध्ययनाच्या अहवालानुसार महाराष्ट्रात सन २००८-०९ या वर्षात पर्यटनाशी संबंधित विविध घटकांमध्ये एकूण ४५.१० कोटी रुपये गुंतवणूकीची अपेक्षा होती तर २००९-१० या वर्षामध्ये ३६.४० कोटी रुपये आणि २०१०-११ या वर्षामध्ये ३५.६० कोटी रुपये गुंतवणूकीचा अंदाज या अध्ययनात वर्तविण्यात आला होता.

एकंदरीत, या क्षेत्रात मोठ्या गुंतवणूकीची अपेक्षा असून या क्षेत्रातील गुंतवणूक-रोजगार अनुपात लक्षात घेता या गुंतवणूकीच्या माध्यमाने मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे रोजगार निर्माण होण्याचे भाकित वर्तविता येईल.

**हॉटेल व टुर ऑपरेटर्सची संख्या :**

हॉटेल व टुर ऑपरेटर्स हे पर्यटन उद्योगाचे अविभाज्य घटक आहेत. राज्यातील पर्यटन उद्योगाचे स्वरूप समजून घेतांना हॉटेल आणि टुर ऑपरेटर्स या विषयीच्या संख्यात्मक माहितीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

एका अध्ययनाप्रमाणे राज्यात २०१२ पर्यंत पंचतारांकित हॉटेलसह विविध प्रकारच्या हॉटेलची एकूण संख्या ३४९१ अशी होती. ज्या अंतर्गत जवळपास ७२१३२ खोल्या निवासाकरिता राज्यात उपलब्ध होत्या. ३४९१ निवासी हॉटेल्स् मध्ये ३०१ पंचतारांकित, १४ अपार्टमेन्ट, २८७२ गैरतारांकित, १२ युथ हॉटेल्स्, ४१ धर्मशाळा, मुसाफिरखाना, सराई आदी तर ४ गुरूद्वारा व मंदिरे आणि ३२१ बेड व ब्रेकफास्ट युनिट व १६ मोटल्स् होते. महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणीनुसार सन २००२ मध्ये विविध प्रकारच्या हॉटेल्सच्या

माध्यमातून ५१८९३ खोल्या पर्यटकांच्या निवासाकरिता उपलब्ध होत्या. अर्थातच देशातील एकूण निवासी खोल्याच्या प्रमाणात राज्यातील उपलब्धतेची टक्केवारी ही ४.४३ टक्के अशी होती. सन २०१० मध्ये ही निवासी खोल्यांची संख्या १०७९५२ इतकी होती म्हणजेच देशातील या संदर्भातील आकडेवारी लक्षात घेता राज्याचे प्रमाण ३.७५ टक्के होते तर या पाहणीनुसारच सन २०२० मध्ये १६९७४४ निवासी खोल्या पर्यटकांकरिता उपलब्ध होण्याचा अनुमान आहे. १९९३ च्या रोजगार कमेटीच्या मते, हॉटेलच्या एका कक्षाच्या माध्यमातून सरासरी २.५ लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. या संदर्भाने विचार करता या उद्योगातून फार मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होण्याची शक्यता आहे.

भारत सरकारच्या पर्यटन विभागाची मान्यता मिळालेल्या टुर ऑपरेटर्स, ट्रॅव्हल एजन्सी आणि टुरिस्ट ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स यांची संख्या सन २००३ मध्ये ८१ होती. सन २००७ मध्ये १३३ इतकी होती तर सन २०१० मध्ये १८४ कंपन्यांना पर्यटन विभागाने मान्यता दिली होती. सन २०१२ पर्यंतची आकडेवारी बघता राज्यात एकूण १०४९ इतकी टुर ऑपरेटर्स, ट्रॅव्हल एजन्सी व टुरिस्ट ट्रान्सपोर्टर्स आदिंची संख्या होती. देशातील या संदर्भातील आकडेवारीची तुलना करता राज्यातील या घटकांचे प्रमाण १३.२१ टक्के होते. यामध्ये ५७८ ट्रॅव्हल एजन्सी, ३२५ टुर ऑपरेटर्स, १११ टुरिस्ट ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स होते तर अंतर्गत टुर ऑपरेटर्सची संख्या ही ३० होती आणि साहसिक टुर ऑपरेटर्सची संख्या ही ५ होती. थोडक्यात, राज्यातील टुर ऑपरेटर्स, ट्रॅव्हल एजन्सी आदिंच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याने राज्यातील पर्यटन विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे.

एकूणच, या सर्व विवेचनाचा सारांश लक्षात घेता आणि भारतातील राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांशी तुलना करता महाराष्ट्रात पर्यटन उद्योगाच्या विकासाला अजूनही बराच वाव आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची:**


१) डॉ. कठारे अनिल, डॉ. साखरे विजया आणि डॉ. पाटील गौतम, २०११, *पुरातत्व विद्या-वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.१३२.

२) जोशी अतुल, जोशी महिमा और अमित कुमार, २०१०, *भारत में आधुनिक पर्यटन*, रावत पब्लिकेशन्स, जयपुर, पृ. ८

३) *योजना* मासीक सप्टेंबर २०११ पृ.२९.

४) Thripathi Madhusoodan & Dr. Nishant Singh, 2007, *Indian Tourism Industry, a blue print to success*, Radha Publications, New Delhi, p-39, 178

5) *Tourism Statistic of India* 2012-13.

6) *Economic Survey of Maharashtra* 2008-2009, 2011-2012, & 2012-13 www.maharashtra.gov.in

7) *Maharashtra's Budget*, www.travelbizmonitor.com

8) *Market Plus Report* 2004-05, www.icedibleindia.org

9) State Finance, *A Study of Budgets RBI Publication* www.rbi.org.

# ‘अर्थसंवाद’ चे लेखक व्हा

## जुलै-सप्टेंबर २०१४ अंकासाठी लेख पाठवा

*सारं जगच पैशामागं धावतय्..... अर्थव्यवस्थेचं यश -अपयश पैशाच्या मोजपट्टीनं मोजलं जातय्... अर्थव्यवस्थेच्या विकासदराचा आकडा कसा आहे? सिंगल आहे की डबल? हे कायमच महत्त्वाचं असतं. राष्ट्रीय उत्पन्न अन् राष्ट्रीय कर्ज खूप काही सांगून जातं... तसे आर्थिक विषय बरेच आहेत, अनेक वेळा मनाच्या पातळीवर लिहिण्याचा विचार झालेला.... आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... ‘अर्थसंवाद’ च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा टेबल घ्यावा. लेखातील टेबलचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठविणे अत्यावश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. **लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.**
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- **संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे:** कुरुलकर र. पु., २००६, *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल : एक दृष्टीक्षेप

**दिपक चौधरी, मुंबई,**
अभिनव महाविद्यालय,
भाईंदर,
भ्रमणध्वनी - ९०२८२७२८९७

**अशोक डी.खाचणे, जळगाव,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९४२१५२१४४१

प्रादेशिक असमतोलाची समस्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवर अशी सर्वदूर आढळून येते. अर्थशास्त्राच्या साहित्यात आर्थिक वृध्दी बरोबरच संतुलीत विकास व सामाजिक न्यायालाही समान महत्व दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य हे भारतातील सामाजिक, आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या प्रगतीशील राज्य म्हणून ओळखले जात असले तरी प्रगतीचे हे मापदंड सर्व जिल्ह्यांमध्ये समान दिसत नाहीत.

महाराष्ट्र भौगोलिक व लोकसंख्येच्या दृष्ट्या भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे राज्य आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १५% आहे. २००९-१० च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न रु.७४०२७ इतके होते. हे देशाच्या दरडोई उत्पन्नापेक्षा १.५९% नी जास्त होते. परंतु हे आकडे केवळ औद्योगीक व सेवा क्षेत्राच्या प्राबल्यामुळे अधिक दिसून येतात. महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या प्रगत असले तरी २००४-०५ मध्ये महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ३०.७ टक्के एवढे होते तर भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २७.५ टक्के एवढे होते. म्हणजेच राज्यातील दारिद्रय रेषेचे प्रमाण देशाच्या सरासरी पेक्षा ३.२% नी अधिक होते. एकूण गरीब लोकांच्या संख्येचा विचार करता महाराष्ट्र हे देशातील उत्तरप्रदेश व बिहारनंतर तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. (जी.ओ.एम.२००९) मानव विकास निर्देशांकाबाबत राज्य देशाच्या एकूण राज्यांच्या यादित ४ थ्या क्रमांकावर आहे. परंतु त्यातही विभागवार असमानता दिसून येते. २००२ च्या मानव विकास अहवालानुसार महाराष्ट्रातील नऊ जिल्हे मुंबई, पुणे, ठाणे, रायगड, सिंधुदूर्ग,

सातारा, सांगली, कोल्हापूर, नागपुर सोडता उर्वरित जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक देशाच्या सरासरी निर्देशांकापेक्षा कमी आहे. विदर्भ व मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न राज्याच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा कमी आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे या शहरांचे मिळून एकूण राज्याच्या उत्पन्नात ५६% एवढे योगदान आहे. बऱ्याचदा महाराष्ट्रावर अशी टिका केली जाते की, महाराष्ट्रातून मुंबई व पुणे विभाग वगळला तर महाराष्ट्राची अवस्था 'बिमारु' (BIMARU) राज्यांपेक्षा वाईट आहे. (Shahban 2006). एकीकडे जगभर सर्वसमावेशक विकासाच्या गप्पा चाललेल्या असतांना प्रगत राज्य म्हणून मिरवणाऱ्या महाराष्ट्रात मात्र विकासातील असमानता प्रकर्षाने जाणवते.

**प्रादेशिक असंतुलनासंदर्भात झालेले अभ्यास :**

महाराष्ट्राच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९६१-६६) सर्वप्रथम प्रादेशिक असंतुलनाचा विषय मांडला गेला. १९७५ मध्ये पुणे येथील गोखले इन्स्टीटयूट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इॅकॉनॉमिक्सचे प्रा.गोखले यांनी "Regional Planning For Marathwada" हा अभ्यासपूर्ण लेख प्रकाशित केला. त्यानंतरच्या काळात अनेक तज्ञांनी प्रादेशिक असंतुलनासंदर्भात लिखाण केले. १९८३ मध्ये व्ही.एम.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशीक असंतुलनाचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली गेली. दुर्दैवाने या समितीचा अहवाल तत्कालीन सरकारने स्विकारला नाही. परंतु या अहवालाच्या आधारावर नंतरच्या काळात शासनाने मागासलेल्या जिल्ह्यासाठी निधी वाढविला. महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाने बी.ए.कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली राज्याच्या मागासलेल्या भागांचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली ह्या समितीने बारा विविध निर्देशांकाच्या आधारे केलेल्या अध्ययनाअंती असे सांगितले की, महाराष्ट्रातील १७ मागासलेल्या जिल्ह्यांपैकी ६ जिल्हे मराठवाड्यातील, ८ जिल्हे विदर्भातील तर ३ जिल्हे इतर विभागातील होते.

१९९७ मध्ये भारत सरकारने ई.ए.एस.शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील १०० गरीब जिल्हे निवडण्यासाठी एक समिती नेमली. ह्या समितीच्या अहवालातून समोर आलेली माहिती महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यासाठी धक्कादायक होती. भारतातील १०० जिल्ह्यांपैकी १० जिल्हे महाराष्ट्रातील होते व त्यातही ७ जिल्हे मराठवाड्यातील तर ३ जिल्हे विदर्भातील होते. भारत सरकारने २००७ साली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली कृषी क्षेत्रात सर्वात मागासलेले १०० जिल्हे निवडण्यासाठी समिती नेमली. ह्या समितीच्या अहवालानुसार १०० जिल्ह्यांपैकी ११ जिल्हे महाराष्ट्रातील होते.

प्रस्तुत शोध निबंधाचे प्रमुख उद्दिष्टे महाराष्ट्रातील प्रादेशिक असंतुलनाचा अध्ययन करण्याचे असले तरी विषयाची व्याप्ती मोठी असल्याने वर निर्देशित केलेल्या निर्देशांकाच्या आधाराने जिल्हावार असमानतेचे विश्लेषण केले जाईल.

## महाराष्ट्रातील औद्योगिक विकास अध्ययन:

औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य म्हणून परिचित आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात सुतीकापड उद्योगापासून महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाला सुरुवात झाली. आज राज्यात अनेक प्रकारच्या उपभोग्य वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स,

सारणी क्र.१

विभागवार मोठ्या उद्योगांची संख्या व रोजगार निर्मिती

(संख्येमध्ये २०१०)

| विभाग | मोठे उद्योग | रोजगार |
|---|---|---|
| मुंबई | २११ | १७,५१६ |
| कोकण (मुंबई वगळून) | ७७७ | १,०८,०४२ |
| नाशिक | २५६ | ७६,३६१ |
| पुणे | ७६६ | २,४७,६२१ |
| औरंगाबाद | २६१ | ५७,५१० |
| अमरावती | ७० | १०,८१० |
| नागपूर | २७६ | ६३,६१७ |

स्रोत - *Industrial State Profile of Maharashtra, MSME Development Institute, Ministry of Micro, Small & Medium Enterprises, GOI*

कॉम्प्युटर हार्डवेअर व सॉफ्टवेअर इ.वस्तुंचे उत्पादन केले जाते. महाराष्ट्राचा देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनात १८% वाटा आहे. राज्याचे औद्योगिक क्षेत्र प्रामुख्याने मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे या शहरांभोवती केंद्रीत झालेले आहे. महाराष्ट्र हे औद्योगिक दृष्ट्या प्रगत असले तरी औद्योगिक विकास हा असंतुलीत आहे. त्यामुळे रोजगार निर्मिती, दरडोई उत्पन्न व परिणामत: मानव विकासावर देखील परिणाम होवून त्यात जिल्ह्यानुसार असमानता दिसून येते. २०१० पर्यंत देशात २७७ सार्वजनिक क्षेत्रातले उद्योग (पी.एस.यु.) अस्तित्वात होते. पैकी महाराष्ट्रात ३६ उद्योग होते. यात जिल्हावार विश्लेषण केले असता प्रचंड तफावत दिसून येते. ३६ उद्योगांपैकी मुंबई व नवी मुंबई मध्ये २९, पुणे येथे २, चंद्रपुर व अकोला येथे प्रत्येकी एक तर नागपुरला तीन उद्योग आहेत म्हणजेच मुंबई शहरातच सर्वात जास्त सार्वजनिक क्षेत्रातले उद्योग केंद्रीत झालेले दिसतात.

वरील तक्त्यात महाराष्ट्रातील मोठ्या उद्योगांची संख्या व रोजगार निर्मिती याची विभागवार आकडेवारी दिलेली आहे. सारणी क्र. १ वरुन असे स्पष्ट होते की, मुंबई व कोकण आणि पुणे विभागात सर्वात जास्त मोठे उद्योग केंद्रीत झालेले आहे व पर्यायाने या विभागांमध्ये रोजगारनिर्मिती देखील अधिक झालेली आहे. कोकण व मुंबई विभागात एकूण ९८८ मोठे उद्योग आहेत तर पुणे विभागात ७६६ उद्योग आहेत व अमरावती विभागात सर्वात कमी म्हणजे फक्त ७० उद्योग अस्तित्वात आहेत. उद्योगाच्या ह्या केंद्रीकरणाला अनेक राजकीय धोरणात्मक कारणे जबाबदार आहेत व त्यातूनच जिल्ह्यांच्या आर्थिक विकासात देखील असमानता निर्माण होते.

## महाराष्ट्रातील कृषी विकासाचे अध्ययन:

महाराष्ट्राची गणना भारतातल्या आर्थिक दृष्ट्या प्रगत राज्यांमध्ये होत असली तरी देखील

कृषी विकासाच्या बाबतीत मात्र महाराष्ट्र अप्रगत आहे. महाराष्ट्राची ५५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. भारताप्रमाणेच राज्याचा देखील कृषी विकासाचा दर वेगाने कमी होतांना दिसुन येतो. १९८४-८५ ते १९९५-९६ मध्ये सरासरी कृषी विकासाचा दर ६.६६ टक्के इतका होता. तर १९९५-९६ ते २००४-०५ या दशकामध्ये कृषी विकासाचा दर ०.१० टक्के एवढा कमी झाला. सध्या मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे वाढते प्रमाण हे महाराष्ट्रातील कृषी विकासातील असमानता सिध्द करते. महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांमधील ४५ तालुके अवर्षण प्रवण आहेत. तसेच राज्यात जवळपास १/३ पेक्षा जास्त भागात दरवर्षी दुष्काळ असतो (कुलकर्णी २०००). सिंचन प्रकल्पांवर राज्याने मोठ्या प्रमाणात खर्च करुन देखील राज्यातील एकूण पिकांखालील क्षेत्रांपैकी फक्त १८ टक्के क्षेत्र सिंचनाखाली आणले गेले. देशाचे मात्र हेच प्रमाण ४५% एवढे आहे. सिंचन प्रकल्पांचा प्रमाणातही विभागवार भिन्नता आढळून येते. पाण्याच्या अभावाने राज्यातील खत वापराचे प्रमाण देशाच्या तुलनेने कमी आहे. कृषी आदानांचे (सिंचन, खते, उच्च जातिचे बीज) वापराचे प्रमाण प्रदेशवार भिन्न असल्याकारणाने कृषी विकासाचा दरामध्ये तफावत दिसून येते म्हणूनच कोल्हापूर, पुणे, नागपूर ह्या विभागांच्या तुलनेत कोकण, नाशिक, लातूर, अमरावती ह्या विभागांचा कृषी विकास अत्यंत कमी आहे.

## महाराष्ट्रातील मानव विकासाचे अध्ययन:

मानवी विकास निर्देशांक (एच.डी.आय.) हा आधुनिक अर्थशास्त्रातील आर्थिक विकासाचा मापदंड मानला जातो. मानव विकास निर्देशांक (एच.डी.आय.) मोजण्यासाठी लोकांची सरासरी आर्युमान पातळी (Life expectancy), ज्ञान (Knowledge) व राहणीमानाचा दर्जा (Standard of living) ह्या तीन मुलभूत घटकांचा वापर केला जातो.

महाराष्ट्रातील मानव विकासात सर्वात प्रगत जिल्हा मुंबई व मुंबई उपनगर असुन त्यांचा माविनि (एच.डी.आय.) १.०० इतका आहे. तर सर्वात कमी मानव विकास निर्देशांक नंदुरबार जिल्ह्याचा आहे. मराठवाडा विभागात फक्त औरंगाबाद सोडल्यास सर्व जिल्ह्यांचा माविनि (एच.डी.आय.) ०.५० पेक्षा कमी आहे. २००२ च्या महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक अहवालानुसार महाराष्ट्रांतील ३५ जिल्ह्यांपैकी २२ जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक ०.५० पेक्षा कमी आहे. त्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खान्देश व कोकणातील काही जिल्ह्यांचा समावेश होतो. विकासातील हे असंतुलन दांडेकर समितीनेही दर्शविले होते व अनुशेष भरुन काढण्याच्या सुचना केल्या होत्या.

## महाराष्ट्रातील दारिद्र्याचे अध्ययन :

दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्राची गणना श्रीमंत राज्यांमध्ये केली जाते. एकीकडे उत्तम विकासाचा दर असुन देखील आर्थिक पहाणी २००७-०८ नुसार राज्यातील ३१.७ दशलक्ष किंवा ३०.७ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे. नियोजन आयोगाच्या आकडेवारीनुसार १९९३-९४ मध्ये महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेचे प्रमाण ३६.९ टक्के होते ते २००४-०५ मध्ये ३०.७ इतके कमी झाले परंतु ह्याच कालखंडात दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या मात्र १.२ दशलक्ष इतकी वाढली.

सारणी क्र.२
जिल्हावार दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटूंबाचे प्रमाण

| अ.क्र. | जिल्हा | दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटूंबाचे प्रमाण | अ.क्र. | जिल्हा | दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटूंबाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | नंदूरबार | ७२ | १८ | नागपूर | ३७.०३ |
| २ | गोंदिया | ५७.२९ | १९ | औरंगाबाद | ३५.४६ |
| ३ | गडचिरोली | ५४.६९ | २० | रत्नागीरी | ३४.६७ |
| ४ | धुळे | ५३.६५ | २१ | हिंगोली | ३४.५३ |
| ५ | भंडारा | ५१.२० | २२ | नांदेड | ३३.६६ |
| ६ | अमरावती | ४९.५७ | २३ | परभणी | ३३.२६ |
| ७ | चंद्रपुर | ४७.६६ | २४ | उस्मानाबाद | ३२.८२ |
| ८ | अकोला | ४७.४७ | २५ | रायगड | ३०.२१ |
| ९ | वाशिम | ४७.३३ | २६ | लातूर | २९.८१ |
| १० | यवतमाळ | ४६.०० | २७ | सोलापूर | २९.३१ |
| ११ | ठाणे | ४५.०० | २८ | बीड | २६.८४ |
| १२ | बुलढाणा | ४४.४७ | २९ | पुणे | २४.९० |
| १३ | जळगांव | ४३.६२ | ३० | अहमदनगर | २३.८४ |
| १४ | वर्धा | ४१.०० | ३१ | कोल्हापूर | १७.५७ |
| १५ | नाशिक | ४०.५८ | ३२ | सांगली | १६.५९ |
| १६ | सिंधूदुर्ग | ३९.०८ | ३३ | सातारा | १५.९७ |
| १७ | जालना | ३८.०५ | | | |

स्रोत - *District - Socio economic Reviews, Govt. of Maharashtra (2009-10)*

*टिप - मुंबई शहर व मुंबई उपनगर (संपूर्ण शहरी जिल्हे) वगळण्यात आले आहेत.*

वरील सारणीनुसार नंदुरबार जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे प्रमाण (७२%) असुन त्यापाठोपाठ गोंदिया (५७.२९%) गडचिरोली (५४.६९%), धुळे (५३.६५%), भंडारा (५१.२०%) तर दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे सर्वात कमी प्रमाण कोल्हापूर (१७.५७%), सांगली (१६.५९%) तर सातारा (१५.९७%) एवढे आहे. वरील आकडेवारी दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाच्या प्रमाणातील प्रचंड असमानता दर्शविते.

## समारोप:

औद्योगिकरणावरील भर व कृषी क्षेत्राकडील दुर्लक्ष या कारणाने महाराष्ट्रात प्रचंड असमानता निर्माण झालेली आहे. त्यातुन अनेक समस्यांना राज्याला सामोरे जावे लागत आहे. उदा.शहरीकरण, स्थलांतर, बेरोजगारी,

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, स्वतंत्र विदर्भाची मागणी इ.मागासलेल्या विभागांना विकासाच्या प्रवाहात सामावून घेण्यासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली गेली. परंतु वित्तीय स्त्रोतांच्या अभावाने वैधानिक मंडळांनी देखील भरीव कामगिरी केली नाही. महाराष्ट्रातील असमानतेची दरी कमी करण्यासाठी धोरणात्मक पातळीवर मोठे बदल करायला हवे. त्यात पुढील काही बदल सुचविता येतील.

१) सिंचनाच्या सुविधा सर्व जिल्ह्यांमध्ये समप्रमाणात उपलब्ध कराव्यात.

२) औद्योगिकरणाचे विकेंद्रीकरण करुन ग्रामिण किंवा मागासलेल्या भागांमध्ये उद्योगांच्या स्थलांतरावर भर द्यावा.

३) आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी इ.सुविधा मुबलक व समप्रमाणात उपलब्ध असाव्यात.

४) ग्रामीण विकासाचे उद्दीष्ट ठेवून जिल्हावार नियोजन करायला हवे.

५) मागासलेल्या विभागांच्या विकासासाठी विशेष वित्तीय तरतुद करायला हवी.

## संदर्भ सूची:


1) R.P.Kurulkar, *"The Problem of Regional Disparities in Maharashtra State and the Role of Regional Development Board"*, Journal of Indian School of Political Economy.

2) GoI (2011-12) - *Industrial State Profile of Maharashtra*, MSME Development Institute.

3) GoM(2002)- Human Development Report Maharashtra

4) GoM (2012) - *Economy Survey Report*

5) GoM (2012) - *Maharashtra Development Report*

6) S.S.Kalamkar (2011) - *Issues in Agriculture Development in Maharashtra*, Journal of Indian Economic Association.

7) S.N.Tripathy (2011) - *The National livelihood Mission in Maharashtra : A strategy for Generating Employment and Alleviation of Poverty, Journal of Indian Economic Association.*

8) डॉ.मंगला जंगले (२००८) - *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रशांत प्रकाशन.

# महाराष्ट्रातील नागरीकरण: स्वरुप व कारणे

धनाजी बाबुराव इंगवले, तिसंगी,
म.ह.शिंदे महाविद्यालय,
ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर
भ्रमणध्वनी ९९२३५५८६६९
Email: idhanaji@gmail.com.

शेकडो वर्षापूर्वी कौटिल्याने नागरी जीवनाचे समर्थन केल्याचे दिसून येते. आजही महाराष्ट्रात नागरीकरणाची पातळी वाढत आहे. नागरीकरण ही एक प्रक्रिया असून, त्याचा समाजाच्या विकासासाठी परस्परसंबंध असतो. शहरी विभागात अधिक उत्पादकतेमुळे आर्थिक, औद्योगिक, व्यापारी व सेवा व्यवहाराचे केंद्रिकरण झाल्याने रोजगार संधी जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातून नागरी भागाकडे श्रमिकांचे स्थलांतर होऊ लागते व नागरीकरणाचा दर वाढण्यास सुरूवात होते.

अलिकडे औद्योगिक क्रांती नंतर जगातील अनेक देशामध्ये नवीन शहराचा विकास झाला. ज्या ठिकाणी औद्योगिक वस्तुसाठी कच्चा माल मिळतो त्यांच्या जवळपास त्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग व्यवसाय निर्माण झाले. अशा उद्योगामध्ये काम करण्यासाठी आजूबाजूच्या ग्रामीण भागातून लोक शहरांकडे स्थलांतरीत झाले. त्यामुळे शहराचा उदय व विकास होत गेला.

नागरीकरणामुळे पायाभूत सुविधांमध्ये वाढ होऊन बाजारपेठा विस्तारतात, तांत्रिक क्षेत्रात बदल होऊन कृषी क्षेत्रावर त्यांचा अनुकूल परिणाम होतो व आर्थिक विकासाची गती वाढते.

प्रस्तुत लेखांतर्गत महाराष्ट्रातील नागरीकरणाला विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

### नागरीकरणाची संकल्पना :

नागरीकरण म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशतील लोकसंख्येतील दरात झालेली वाढ असे सर्वसाधारणपण म्हटले जाते. नागरीकरण ही एक गुंतागुंतीची आणि बहुसमावेशक प्रक्रिया आहे.

नागरीकरणाची संकल्पना समजण्यासाठी नागरीकरणाची अनेक तज्ज्ञांनी दिलेल्या व्याख्या अभ्यासणे अधिक उचित होईल, त्या पुढीलप्रमाणे

भारतात १९७१ च्या जनगणनेनुसार नागरीकरणाचे ठरवून दिलेले निकष पुढीलप्रमाणे आहेत. अ) ज्या वस्तीमध्ये महानगरपालिका, नगरपालिका कॅन्टोनमेंटस, बोर्डस स्थापन झाले आहेत. अशा की शासनाने नगर म्हणून मान्य केल्या आहेत. ब) पाच हजार पेक्षा जास्त लोकसंख्या दर चौरस कि.मी. ५०० पेक्षा अधिक लोकसंख्येचे घनत्व आणि बिगर कृषी व्यवसायात ७५% पेक्षा अधिक लोकसंख्या कार्यरत असलेल्या वस्त्या म्हणजे नागरी क्षेत्र होय.

नेल्स अँडरसन यांच्या मते, "ज्या ठिकाणी उद्योगशीलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवन पध्दती नवीन तयार होते. त्यास नागरीकरण असे म्हणतात."

डॉ. माजिद हुसेन यांच्या मते, "नागरीकरण म्हणजे नगरे आणि शहरामध्ये लोकसंख्येचे केंद्रीकरण घडून येणे होय."

आशिष बोस, "नागरीकरणाची प्रक्रिया ही स्थलांतरणाची प्रक्रिया होय."

अशा पध्दतीने नागरीकरणाचा अभ्यस करणाऱ्या अनेक तज्ज्ञांनी नागरीकरणाच्या वेगवेगळ्या व्याख्या मांडल्या आहेत. त्याचप्रमाणे नागरीकरण मोजण्याच्या अनेक पध्दती आहेत.

**महाराष्ट्रातील नागरीकरण :**

महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० रोजी झाली. तरीही भारतातील नागरीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य सातत्याने प्रथमपासूनच आघाडीवर असल्याचे दिसून येते. देशातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी १५१ टक्के लोकसंख्या एकट्या महाराष्ट्रात आहे. १९०१ मध्ये महाराष्ट्रातील नागरीकरणाचे हे प्रमाणे १६.५% इतके होते. ते १९९१ मध्ये ३८% झाले. म्हणजे महाराष्ट्रात दर ३ व्यक्तीमागे एक व्यक्ती शहरात राहते. (Census of India-1991)

महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळीची तुलना भारतातील नागरीकरणाच्या पातळीशी तक्ता क्र.१ मध्ये केली आहे.

२०११ मध्ये भारतातील नागरी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण जास्त आढळते. तर एकूण लोकसंख्येशी असणारे नागरी लोकसंख्येचे प्रमाण

तक्ता क्र. १

भारत व महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळी

| अ.क्र. | घटक | महाराष्ट्र | भारत | (२०११ च्या जनगणनेनुसार) महाराष्ट्राचे भारताबरोबर टक्के |
|---|---|---|---|---|
| १) | लोकसंख्या (लक्ष) | ११२३७३ | १२१०१९३ | ९.३ |
| २) | नागरी लोकसंख्या (लक्ष) | ५०८२८ | ३७७१०६ | १३.५ |
| ३) | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाणे(टक्केवारी) | ४५.२ | ३१.२ | - |

*संदर्भ - महाराष्ट्राची अर्थिक पाहणी २०१२-१३*

तक्ता क्र. २

महाराष्ट्रातील नागरीकरणाची प्रवृत्ती (१९६१-२०१२)

| अ.क्र. | घटक | १९६१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | एकूण लोकसंख्या कोटीत | ३.९५ | ७.८९ | ९.६९ | ११.२ | ११.२ |
| २) | नागरी लोकसंख्या कोटीत | १.१२ | ३.०५ | ४.११ | ५.०८ | ५.०८ |
| ३) | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रतिशत प्रमाण | २८.२ | ३८.६९ | ४२.४३ | ४५.२ | ४५.२ |
| ४) | शहराची संख्या | २६६ | ३३६ | ३७८ | ५३५ | ५३५ |

*संदर्भ - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-१३*

महाराष्ट्रातील प्रमाण (४५.२ टक्के)भारतातील प्रमाणापेक्षा (३१.२ टक्के) कमी आढळते. याचा अर्थ महाराष्ट्रातील नागरीकरणाचा वेग भारताच्या नागरीकरणापेक्षा जास्त आहे असे दिसून येते. तर २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील सर्वात जास्त नागरीकरण झालेले घटक राज्य तामिळनाडू होते. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे घटक राज्य महाराष्ट्र आहे. यावरून महाराष्ट्राचा ग्रामीण चेहरा बदलत असून नागरीकरणात वाढ होत आहे, हे निदर्शनास येते.

तक्ता क्र.२ मध्ये असे निदर्शनास येते की, सन १९६१ मध्ये, महाराष्ट्रातील २८.२ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव करीत होती. त्यामध्ये वेगाने वाढ होऊन हेच प्रमाण सन २०१२ मध्ये ४५.२ टक्क्यापर्यंत वाढले आहे. याच काळात महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्या १.१२ कोटीवरून ५.०८ कोटीपर्यंत वाढून राज्यातील शहराची संख्या २६६ वरून ५३५ एवढी झालेली निदर्शनास येते. याचा अर्थ महाराष्ट्रात नागरीकरण वेगाने होत आहे. त्यामुळे मोठ्या शहराची संख्या राज्यात वेगाने वाढत असल्याने शहरातील गर्दीचा प्रश्न वाढून, शहरातील मूलभूत सोयी सुविधांवर ताण निर्माण झाला आहे.

तसेच सन १९६१ ते १९९१ या काळात राज्यात नागरीकरणाच्या वाढीचा वेग जास्त (२८.२ टक्क्यावरून ३८.६९ टक्क्यापर्यंत) आढळतो तर नंतर तो २००१ आणि २०१२ मध्ये कमी आढळतो म्हणजेच अनुक्रमे नागरीकरणाचा वाढीव दर ४२.४३ टक्क्यावरून ४५.२ टक्के झाल्याचे दिसून येते.

### महाराष्ट्रातील नागरीकरणाची कारणे:

सध्या जगामध्ये, भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्येही नागरीकरणाचा वेग वाढलेला निदर्शनात येतो. ग्रामीण भागातील लोकसंख्येचे शहराकडे होणारे स्थलांतर वाढत चाललेले आहे. याची काही वास्तव कारणे पुढीलप्रमाणे -

१) लोकसंख्या वाढ :- महाराष्ट्राची लोकसंख्या १९६७ मध्ये ३.९६ कोटी होती. ती २०१२ मध्ये ११.२ कोटी झाली. यामुळे अनेक ग्रामीण केंद्राचे नागरी केंद्रामध्ये रुपांतर होत आहे. तर ग्रामीण लोकसंख्या रोजगारासाठी शहराकडे स्थलांतरीत झाल्याने नागरीकरण वाढत आहे.

२) नवीन आर्थिक धोरण :-१९९१ मध्ये नवीन

आर्थिक धोरणांचा स्वीकार केल्यामुळे, ग्रामीण व निमशहरी भागातील लोकसंख्या मोठ्या शहराकडे स्थलांतरीत होऊन नागरीकरणाचा वेग वाढल्याने शहरी लोकसंख्या वाढली.

३) व्यापार :- व्यापाराच्या वाढत्या उलाढालीमुळे शहराची प्रगती होत असल्याने ग्रामीण लोक तिथे स्थलांतरीत होऊन नागरी केंद्रांचा विकास होत आहे.

४) वाहतूक व दळणवळण सोयीत वाढ :- नवीन रेल्वेमार्ग, हवाई वाहतूक, रस्ते मार्ग इत्यादीमध्ये वाढ होत गेल्याने नागरीकरणात वाढ होते.

५) धार्मिक महत्व :- एखाद्या धार्मिक स्थलामुळे, हॉटेल, दुकाने, लॉज, व्यापार, व्यवसाय यामुळे शहरीकरणास चालना मिळते.

६) शैक्षणिक सुविधा व सेवा क्षेत्राचा वाढता विस्तार :- सध्या उच्च शिक्षणासाठी व नोकरीसाठीच्या पूरक शिक्षणासाठी ग्रामीण भागातून अनेक युवक युवती शहराकडे स्थलांतरीत होत असल्याने, शहरी लोकसंख्या वेगाने वाढत आहे. तसेच सेवाक्षेत्राच्या वाढीमुळे, नोकरी करण्याच्या उद्देशाने नागरीकरण होत आहे.

७) खनिज धातूची उपलब्धता :- ज्या भागामध्ये विविध खनिजे मिळतात. अशा प्रदेशामध्ये रोजगार मिळविण्यासाठी अनेकजण आल्याने नागरीकरण घडलेले आहे.

८) शहरी जीवनाचे वाढते आकर्षण :- शहरी जीवनाचे वाढते आकर्षण हे ग्रामीण जनतेला असल्याने तसेच शहरी भागातील अनेक सुविधा, हॉस्पीटल, मनोरंजन, जाती विरहीत समाज, दिखाऊपणा, चंगळवादी समाज यामुळे ग्रमीण लोक शहरीभागाकडे आकर्षित होत असल्याने नागरीकरण वाढते.

९) कृषी विकासाचा घटता दर :- सध्या देशात कृषी विकासाचा दर घटत आहे. तर इतर क्षेत्राच्या विकासाचा दर कृषी विकासापेक्षा जास्त असल्याने, शेतीतील अनेक लोक नोकरीच्या निमित्ताने शहराकडे स्थलांतरीत होत आहेत.

वरील कारणामुळे आज महाराष्ट्रामध्ये शहरी नागरीकरणाचा वेग वाढत असल्याचे निदर्शनास येते.

### वाढत्या नागरीकरणाचे परिणाम:

महाराष्ट्रातील नागरीकरणाचे काही अनुकूल परिणाम तर काही प्रतिकूल परिणाम ही भोगावे लागत आहेत. नागरीकरण हे जसे आर्थिक व सामाजिक विकासाचे लक्षण असले तरी शहरात अनेक समस्या आढळून येतात. शहरामध्ये एका बाजूला अनुकूल परिणामाचा स्वर्ग असतो. तर दुसऱ्या बाजूला प्रतिकूल परिणामाचा नरक असतो. शहराचे व्यवस्थापन दिवसेंदिवस किचकट व अवघड बनत आहे. नागरीकरणाचे अनुकूल परिणाम पुढीलप्रमाणे

अ) अनुकूल परिणाम :-

१) नागरीकरणामुळे औदयोगिकरणात वाढ होऊन आर्थिक विकास होतो.

२) नागरीकरणामुळे शहरांचा विकास होण्यास मदत होत असते.

३) यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन लोकांचे रहाणीमान उंचावण्यास मदत होते.

४) शहरी करणामुळे स्थलांतर होऊन, लोकांना शहरात विविध प्रकारच्या मूलभूत सोईचा

विकास करण्यात आला आहे.

५) नागरीकरणामुळे विविध प्रकारच्या वित्तीय संस्था व सेवांची निर्मितीस मदत होते.

ब) नागरीकरणाचे प्रतिकूल परिणाम :

१) लोकसंख्येच्या घनतेत वाढ.

२) वाढती लोकसंख्या.

३) जागेची टंचाई व वाढत्या किंमती.

४) उपनगरचा विस्तार व उपनगरातील वाढत्या समस्या.

५) वाहतूक व दळणवळणाच्या समस्या.

६) वाढती गुन्हेगारी.

७) कायदा व सुव्यवस्थेवर वाढता दबाव.

८) सार्वजनिक सोयींचा अभाव.

९) ई-कचऱ्याची वाढती समस्या.

१०) वाढती महागाई.

११) सामाजिक बंधुत्व, नैतिकता या मुल्यांची घसरण.

१२) वाढती झोपडपट्टी.

१३) शैक्षणिक समस्या.

१४) वाढते हवा, जल, ध्वनी प्रदुषण

१५) नागरीकरण वाढल्यामुळे महाराष्ट्रातील कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रमाणात घट झालेली दिसून येते. त्यांचा प्रतिकूल परिणाम शेतीच्या विकासावर होत आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्रातील नागरीकरणाचे काही अनुकूल परिणाम व प्रतिकूल परिणाम दिसून येतात. यातील अनेक समस्या या मानवनिर्मित असल्याने मानवाने निसर्गाशी सुसंगत प्रयत्न केल्यास नागरीकरणाचे प्रतिकूल परिणाम दूर करता येतील.

**नागरीकरणाचे प्रतिकूल परिणाम दूर करण्याच्या उपाय योजना:**

१) सार्वजनिक सेवांचे विकेंद्रीकरण करणे.

२) शहराकडे होणारे स्थलांतर थांबविणे.

३) दळणवळण साधनांचे नियंत्रण करणे.

४) उपनगरांच्या औद्योगिकरणास चालना देणे.

५) निवासाची सुविधा करणे.

६) नवीन शहरांचे नियोजन करणे.

७) झोपडपट्टी सुधार योजना कार्यक्रम राबविणे.

८) ग्रामीण व शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

९) कृषी विकासावर भर देणे.

१०) औद्योगिकरणाच्या विकेंद्रीकरणावर भर देणे.

**संदर्भ सूची:**


१) घट डी.जी. *"नागरीकरण : प्रक्रिया, समस्या आणि उपाय एक सैध्दान्तिक दृष्टीकोन"*. ३१ वे राष्ट्रीय अधिवेशन, मराठी अर्थशास्त्र परिषद, बार्शी पृ. १४६.

२) पाटील सुभाष, *"महाराष्ट्रातील नागरीकरण: एक दृष्टीक्षेप"*,योजना,सप्टेंबर २००१,पृ.५.

३) साळुखे रा.सु. व गावडे ग.बा., *"महाराष्ट्रातील नागरीकरण प्रवृत्ती, कारणे, परिणाम आणि आव्हाने"*, अर्थसंवाद एप्रिल-जून २००८/ खंड ३२, अंक १ पृ.४७.

४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-१३

५) *www.mahades.maharashtra.gov.in/ publication.do.pub catld=ESM*

# महाराष्ट्रातील महिला नागरी सहकारी बँका : वास्तव व अपेक्षा

**श्रीमती बी. डी. पाटील, ओझर (मिग),**
अर्थशास्त्र विभाग, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
ता.निफाड, जि.नाशिक.
भ्रमणध्वनी : ८६००९००३३४

सहकारी चळवळीचा उदय १९ व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्लंडमध्ये रॉबर्ट ओवन मुळे झाला. इंग्लंडची औद्योगिक क्रांती सहकारी चळवळीचे खरे उगमस्थान आहे. खऱ्या अर्थाने भारतामध्ये सहकारी चळवळ १९०४ मध्ये सुरु झाली. पण सहकारी चळवळीचा खरा विकास स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच झाला. भांडवलदार व जमीनदारांच्या अमानुष छळामुळे अर्थव्यवस्था स्वावलंबी बनविण्यासाठी सहकारी संस्था, सहकारी बँकांचा उदय झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सहकारी चळवळीला शासनाने प्रोत्साहन दिल्यामुळे विकासाचा वेग वाढला, पंचवार्षिक योजनांमधून सहकाराला महत्त्वाचे स्थान दिले गेले. 'सहकार' म्हणजे 'परस्परांच्या मदतीने, परस्परांच्या हितासाठी लोकांनीच निर्माण केलेली ऐच्छिक लोकशाही संघटना होय.' सहकारी चळवळीमुळे लोकांना एकात्मता, बंधुभाव सामुहिक जीवन जगण्याची पद्धत व स्वावलंबन इत्यादींचे महत्त्व समजले. "विना सहकार नाही उद्धार" या उक्तीप्रमाणे सहकाराचे महत्त्व सर्वांना पटले. "एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ" हे सहकाराचे ब्रीदवाक्य आहे. सहकार ही समान निष्ठा असणाऱ्या समाजाने आपल्याच कल्याणासाठी निर्माण करावयाची एक आदर्श समाजव्यवस्था आहे.

भारतातील सहकारी चळवळीला योग्य दिशा लावण्यात महाराष्ट्राचा फार मोठा हिस्सा आहे. महाराष्ट्र राज्याची भूमी ही सहकारी चळवळीला प्रथमपासूनच पोषक राहिली आहे. सहकारी चळवळ हे महाराष्ट्राचे भूषण आहे. सहकारी चळवळीच्या उगमास जी विविध कारणे कारणीभूत झाली आहेत त्यामध्ये, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सावकाराविरूद्ध केलेले बंड हे एक प्रमुख कारण आहे. प्रारंभापासूनच महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला सरकारी नेतृत्वाइतकेच समाजसुधारक, प्रगतीशील उद्योगपती व व्यापारी वर्गाचे नेतृत्व लाभले. त्यामुळेच

महाराष्ट्रात सहकारी चळवळ आघाडीवर आहे. सहकार चळवळीत आज महाराष्ट्र देशातील सर्व राज्यांमध्ये अग्रेसर आहे. एकट्या महाराष्ट्रात २२४३०६ सहकारी संस्था आहेत. लोकशाहीच्या परिपूर्ततेसाठी देशाला सहकारी अर्थव्यवस्थेची जरूरी आहे. हे देशाचा आर्थिक विकासाचा विचार करणाऱ्या सर्वच तज्ञांना मान्य झालेले आहे.

नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत पाहिले असता असे लक्षात येते की, देशातील एकूण नागरी सहकारी बँकांपैकी (१६५४), ७६% नागरी सहकारी बँका ह्या केवळ महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू व कर्नाटक ह्या चार राज्यातच आहेत. भारताच्या एकूण ६०४ जिल्ह्यांपैकी फक्त ३३३ जिल्ह्यांमध्ये नागरी बँका असून २७१ जिल्ह्यांमध्ये अद्यापपर्यंत तेथे नागरी सहकारी बँका नावालाही नाहीत. भारताचा सर्वांगीण आर्थिक विकास करण्यासाठी ह्या २७१ जिल्ह्यांमध्ये नागरी सहकारी बँका सुरू होणे अगत्याचे आहे.

सहकारी चळवळ ही सर्वांसाठी खुली आहे. खुले सभासदत्व व लोकशाही कारभार हे सहकाराचे मुलभूत तत्व असले तरी, देशातील ५०% महिलांचा सहभाग सहकारी चळवळीत असला पाहिजे असे आज सर्व राजकारणी व समाजधुरीनांना पटले आहे. पण तरीदेखील सहकारी चळवळीत महिलांचा सहभाग अत्यल्पच आहे. यात अमूलाग्र बदल होण्याची गरज आहे. महिलांच्या स्वतंत्र सहकारी संस्था, महिला सहकारी बँका मोठ्या प्रमाणात प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक राज्यात आवर्जुन झाल्या पाहिजेत. महिला बँकांच्या माध्यमातून, महिलांच्या अन्य सहकारी संस्थांना आर्थिक साहाय्य देता येवू शकेल. महिलांच्या विविध उद्योग-व्यवसायांना आर्थिक मदत व प्रोत्साहन देता येईल म्हणून महिला बँकेची संकल्पना बाळसे धरू लागली. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, सावित्रीबाई फुले, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, महर्षि कर्वे यांच्यामुळे स्त्री जागृती झाली. सहकार क्षेत्रात महिला आरक्षण आले. त्यामुळे प्रत्येक सहकारी संस्थेत महिलांचा सहभाग वाढला आहे.

हे जरी वास्तव असले तरी, महिलांच्या, महिलांनी व महिलांकरिता चालविलेल्या सक्रिय व उद्दिष्टपूर्ती करून यशस्वीपणे वाटचाल करणाऱ्या संस्था मात्र अत्यल्प आहेत, हे खेदाने मान्य करावे लागते. का, कुणास ठाऊक सहकारी चळवळीत महिलांचा सहभाग कमी आहे. सामाजिक विषमतेचे टोक असणाऱ्या स्त्रीचा सहकार चळवळीत सहभाग वाढवायचा असेल तर सुजाण, सुशिक्षित व प्रगत महिलांनीच जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. मनुष्याच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सहकारी चळवळीने भरीव प्रगती केली आहे. त्याचप्रमाणे महिलांनी सुद्धा या सहकार चळवळीत अधिक उत्साहाने, मनापासून व आम्हीसुद्धा पुरुषांपेक्षा कुठेच कमी नाहीत हे दाखवून देण्याच्या जिद्दीने सहकारी चळवळीत झोकून देण्याची व सहकारी चळवळीला वैभव प्राप्त करून देण्याची गरज आहे. बचत, काटकसर व स्वावलंबन ही सहकाराची मूलतत्वे महिलांच्या कर्तृत्वाला चालना देणारी आहेत.

वास्तविक, आज महिला कुठल्याच आघाडीवर मागे नाहीत, हातातील मोजक्याच पैशात संसाराचा गाडा ओढण्याची जबाबदारी असू दे की, भारतासारख्या अतिविशाल, विविधतेने नटलेल्या, विविध धर्म, पंथ, जात व भाषा बोलणाऱ्या अशा देशाच्या पंतप्रधानपदाची

अवघड सूत्रे सांभाळण्याची जबाबदारी असू दे. महिला कुठल्याच बाबतीत मागे नाहीत हेच वेळोवेळी दिसून आले आहे. मग सहकारातच अल्प सहभाग का? सहकारी संस्था ह्या लोकशाही मूल्यांचे, समानतेचे व सुसंस्काराचे आधारावर कामकाज करतात. म्हणून आजच्या या गतिमान युगात महिला केवळ स्वावलंबी असून भागणार नाही तर महिलांनी आपल्या बरोबर आपल्या कुटुबांचा, समाजाचा, राज्याचा व राष्ट्राचा विकास साधण्याची गरज आहे. म्हणून महिला सहकारी संस्थांची उभारणी ही काळाची गरज झाली आहे. शासनाची ध्येय-धोरणे पुरकच आहेत. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी वेगवेगळे आयोग नेमून, महिलांना राखीव प्रतिनिधीत्व दिले आहे. सहकारी क्षेत्रामध्ये महिलांना प्राधान्य देण्याचे शासनाचे धोरण कौतुकास्पद आहे. त्याचा सर्वांगीण फायदा महिलांच्या विकासासाठी करून देण्याचे कार्य समाजातल्या सुशिक्षित महिलांनी व राजकारणात असलेल्या महिला प्रतिनिधिंनी करणे गरजेचे आहे. शासनाने महिलांसाठी अनेक योजना, सवलती, उपक्रम अमलात आणले आहेत. पण या सर्व गोष्टींचा महिलांनी म्हणावा तसा उपयोग करून घेतला नाही. महिलांनी केवळ प्रपंचात अडकून न पडता पुरुषांबरोबर, खांद्याला खांदा लावून सार्वजनिक, राजकिय, सहकार जीवनात सहभागी होवून, आपल्याबरोबर देशाच्या विकासात हातभार लावावा असे मला वाटते. त्यासाठी बँकिंग हे नामी क्षेत्र आहे.

सध्याची नागरी सहकारी बँकिंग चळवळ ही पूर्णतः पुरुषप्रधान चळवळ राहिलेली आहे. नागरी बँकांच्या सभासदांमध्ये महिलांना मुक्तद्वार आहे. शासनाच्या धोरणामुळे नागरी बँकांच्या संचालक मंडळात, महिला संचालकांचा अंतर्भाव होवू लागला आहे. तसेच सेवक व अधिकारी वर्गातही महिलांनी आपल्या कर्तृत्वाने स्थान मिळविले आहे. म्हणजे नागरी सहकारी बँकांच्या व्यवस्थापनाच्या तिन्ही स्तरावर सर्वसाधारण सभा, (सभासद) संचालक मंडळ आणि सेवक यात महिलांचा प्रवेश झालेला दिसत आहे. तथापि, महिलांच्या व महिलांनी सुरू केलेल्या संस्था आणि महिलांच्या, महिलांनी व महिलांच्या विकासासाठी स्थापन केलेल्या महिला बँका या त्या तुलनेत अत्यल्प आहेत. महिलांचे प्रश्न, अडचणी, समस्या ह्या महिलाच अधिक डोळसपणे जाणून घेवून त्यांचे निवारण, सोडवणूक करण्यात अधिक उपयोगी पडू शकतील हे महिलांनीच जाणून घेणे गरजेचे आहे. सहकार खाते किंवा रिझर्व्ह बँक यांचे महिला बँक धोरणही फार जाचक नाही.

महिलांची, महिलांनी व महिलांसाठी स्थापन केलेली महिला बँक ही त्या काळात एक आगळी-वेगळी कल्पना होती. खरे तर प्रत्येक घराघरात काटकसर करते, घर खर्चाचे असलेल्या पैशात नियोजन करते आणि हातात असलेल्या पैशाची व खर्चाची योग्य तोंडमिळवणी करते. ती तर गृहलक्ष्मीच असते ना× अगदी डबीपासून ते वर्षभराच्या धान्यापर्यंत योग्य नियोजन करून गृहिणी रोजच्या-रोज खर्चात काटकसर करून बचत करते व आपल्या भविष्यात येणाऱ्या अडी-अडचणींवर मात करते. हाच महिलांचा प्रामाणिकपणा, शिस्त, काटकसरवृत्ती महिला बँकांच्या माध्यमातून अधिक उपयुक्त ठरेल याची महिलांना जाणीव झाली व त्यातूनच स्वतंत्र

महिला बँकांची एका मागोमाग एक निर्मिती होऊ लागली.

स्वतंत्र महिला सहकारी बँकांची स्थापना जरी अलिकडच्या काळात झाली असली तरी, खऱ्या अर्थाने महिलांना बँक व्यवसायात आणण्याचे श्रेय व्यापारी बँकांनाच द्यावे लागते. कारण, सन १९५२ मध्ये त्यातूनच 'दि.पंड्यान बँक लि.' मदुराई (सध्या कॅनरा बँकेत विलीन) या बँकेने मदुराई येथे एक महिला शाखा सुरू केली. त्यानंतर बंगलोर येथे सन १९६२ मध्ये सिंडीकेट बँकेने एक शाखा उघडून तेथे सर्व कर्मचारी महिला नेमून कामकाज चालविले होते. त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. प्रारंभी या बँकेतील महिला कर्मचारी घरोघरी जावून महिलांना बचतीचे महत्त्व पटवून देत असत. बँकांमध्ये महिला कर्मचारी नेमून ग्राहक व ठेवीदार यांना सेवा दिल्यास त्याचा बँक व्यवसायावर चांगला परिणाम होतो याचा अनुभव इंग्लंडमधील 'मर्कलेज् बँकेला' आला होता. त्याच्याच आधारे ही कल्पना भारतात आली.

महिलांना समान नागरी हक्क देणारे जरी अनेक कायदे असले तरी, त्या समाजातील अनेक क्षेत्रात आजही मागे आहेत. तथापि, महाराष्ट्र राज्य याबाबतीत अपवाद मानले पाहिजे. कारण, महिला सहकारी बँकेचा उदय महाराष्ट्रातच झाला. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीत पुरुषांबरोबर काही महिलाही अनेक वर्षांपासून कार्यरत होत्या. महिला बँकेची स्थापना करण्याचा पहिला प्रयत्न सांगली येथे डॉ.शालीनीताई पाटील यांनी कै.वसंतदादा पाटील यांच्या प्रेरणेने, 'श्री.लक्ष्मी महिला सहकारी बँके'ची स्थापना करून केला. या बँकेची स्थापना २१ डिसेंबर १९७१ रोजी झाली. तथापि, त्या आधी म्हणजे ऑक्टोबर १९७१मध्ये श्रीमती सरोजिनी खंजिरे यांच्या नेतृत्वाखाली इचलकरंजी येथे महिला बँकेचे काम सुरू झाले होते. त्यानंतर मुंबई, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, जळगांव, नगर, नाशिक येथे महिला बँका स्थापन झाल्या. महाराष्ट्रात आज अखेर ३५ महिला सहकारी बँका असून, त्यांनी आता चांगलेच मूळ धरले आहे. महिला बँकांची कार्यक्षमता व आवश्यकता रिझर्व्ह बँकेलाही आता पटली असून महिला बँकांची स्थापना गुजराथ, कर्नाटक, आंध्र, गोवा, मणिपूर, मध्यप्रदेश इत्यादी राज्यात झाली आहे. भविष्यकाळात भारताच्या उर्वरित राज्यातही महिला बँकांची स्थापना होईल यात शंका नाही.

महाराष्ट्रात सध्या एकूण ३५ महिला सहकारी बँका आहेत. अर्थात त्यांच्या शाखांची संख्या (१२१) ही निश्चितच मोठी आहे. महाराष्ट्रात एकूण नागरी सहकारी बँका ५३९ आहेत. त्यात ३५ महिला सहकारी बँका म्हणजे तशी महिला बँकांची संख्या नगण्यच आहे. परंतु महिला बँकांमुळे महिलांना बँकिंग व्यवहार, बँकेचे कर्ज, बचतीचे महत्त्व, बचतीचे विविध पर्याय, व्यवस्थापनातील सहभाग, या व इतर अनेक विषयांची माहिती महिलांना होवू लागली, ही निश्चितच जमेची बाजू आहे. महिला या बँकांच्या भागधारक बनल्या, सभासद झाल्या, संचालक झाल्या, बँकांचे संचालन करू लागल्या. याबाबतीत महिला बँकांची उपयुक्तता फारच मोलाची आहे.

महाराष्ट्रातील महिला बँकांनी आपल्या कामकाजाची, अर्थकारणाची, बँकिंगची भावी दिशा अत्यंत विचारपूर्वक ठरविणे आणि त्याची

अंमलबजावणी करणे ही या पुढील काळाची गरज ठरणार आहे. महिलांच्या उपक्रमांना विशेष उत्तेजन व प्राधान्य देण्याचे धोरण केंद्र शासनाने जरूर जाहीर केलेले आहे. परंतु महिला बँकांचा विकास आणि याद्वारे सर्वसामान्य महिलांचा सर्वांगिण विकास, उत्कर्ष करण्याची निश्चित दिशा अद्यापही शासनाने ठरविलेली नाही. त्याचबरोबर रिझर्व्ह बँकेनेही त्या अनुषंगाने सखोल अभ्यास करून महिला बँकांना काही खास सवलती दिलेल्या नाहीत. त्यामुळे इतर सर्वसाधारण नागरी सहकारी बँकांना असणारे नियम, अटी आणि निकष महिला बँकांनाही लागू ठेवण्याचे धोरण यापुढेही असेच चालू राहिल्यास महिला बँकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल असे मला वाटते. त्यासाठी शासन व रिझर्व्ह बँकेने याबाबत तातडीने लक्ष घालून, महिला बँकांच्या अडचणींचा विचार करून काही विशेष सवलती महिला बँकांना द्याव्यात असे एक अभ्यासक या नात्याने मला प्रामाणिकपणे वाटते.

त्याचबरोबर महिला बँकांच्या व्यवस्थापनाने देखील अत्यंत जागरूक राहून, शासन व रिझर्व्ह बँक यांच्या नियमांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करणे, भावनेचा प्रश्न न करता बँकेचा निधी योग्य कारणासाठी वापरण्याचा कटाक्ष पाळणे, कर्जवाटप करताना त्याच्या परतफेडीच्या हमीची खात्री करणे, ग्राहकाला तत्पर सेवा पुरविणे, बँकेत विश्वस्ताच्या नात्याने कामकाज, कार्यवाही करणे, सेवाभावी, सामुहिक नेतृत्व उभे करणे, अशा अनेक बाबींची प्रयत्नपूर्वक जोपासना करून प्रत्येक महिला बँकेने ग्राहकांचा व लोकांचा विश्वास वृद्धींगत करणे आवश्यक आहे. एकंदरीत महिला बँकांचा अभ्यास केल्यावरून असे दिसून येते की, महिला सहकारी बँका इतर नागरी सहकारी बँकांप्रमाणेच अर्थव्यवस्थेत आपल्या कार्याची छाप निश्चितपणे पाडू शकतात. या महिला बँका म्हणून त्यांच्याकडे आता साशंक दृष्टीने पाहण्याची गरज राहिलेली नाही. एकूण लोकसंख्येत महिलांचा हिस्सा निम्मा असल्यामुळे महिलांच्या आर्थिक विकासासाठी महिलांनीच झटले पाहिजे. या दृष्टीने महिला बँकांचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

**संदर्भ सूची:**


१) Chandorkar Leela, *'Women in Co-operative field'*
२) देशपांडे रंजना, *'महिला बँकांपुढील आव्हाने / नवी क्षितीजे'*
३) गुंडे वसुंधरा, *'सहकारी चळवळ व महिला'*
४) जाधव लतादेवी, *'महिला नागरी सहकारी बँका : भावी दिशा'*
५) पाटील प्रतिभाताई, *'महाराष्ट्रातील महिला नागरिक सहकारी बँकांचा आढावा'*
६) कोळी पुष्पांजली, *'महिला नागरी सहकारी बँकांचा विकास समस्या आणि भविष्यकाळ'*
७) कुंदेन ह.ना., *'महिला नागरी सहकारी बँका- एक विवेचन'*
८) Sumitra Gowaikar, *'Women Co-operatives and Women in Co-operatives'*
९) Asha Verulkar, *'Mahila Banks'*

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विविध पैलू


**नलिनी पाचर्णे, पुणे,**

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे-७.

भ्रमणध्वनी: ९४२२०८२०८२


*'बहू असोत संपन्न सुंदर की महा,*
*प्रिय अमुचा एक महाराष्ट्र प्र(देश) हा'*

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेले महाराष्ट्र राज्य स्थापनेचा 'सुवर्ण महोत्सव' साजरा करीत आहे. १९६० नंतरच्या प्रदीर्घ काळात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत अनेक रचनात्मक बदल घडून आले. भारतातील महाराष्ट्राचे स्थान एक प्रगत राज्य म्हणून नेहमीच अग्रेसर आणि वैशिष्ट्यपूर्ण राहीले आहे. जागतिकीकरणानंतर महाराष्ट्र राज्यासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती, ग्रामीण विकासातील सहकार चळवळीचे योगदान, समृध्द नैसर्गिक आणि जैविक विविधता, मनुष्यबळ, पायाभूत सुविधा इ. राज्याची बलस्थाने राज्याच्या प्रगतीसाठीची शक्तीस्थाने ठरली आहेत.

देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखला जाणारा महाराष्ट्र आज अनेक आघाड्यांवर संकटांशी सामना करतो आहे. उदा. मुंबई-पुणे-नाशिक या सुवर्ण त्रिकोणाबाहेर राज्यात म्हणावी तशी उद्योगांची प्रगती झालेली नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, असमाधानकारक मानवविकास निर्देशांक, वित्तीय शिस्त चिंताजनक, कायदा व सूव्यवस्थेतील अडथळे, स्थलांतरीतांचे प्रश्न, नागरिकरण व वाढत्या बकाल वस्त्या, जमीन अधिग्रहणाचे प्रश्न, सुस्त नोकरशाही, घटते स्त्री-पुरूष प्रमाण, स्त्रीयांवरील वाढते अत्याचार, कूपोषणाचा प्रश्न, निकृष्ट सामाजिक विकास इ. समस्या बिकट आहेत. महाराष्ट्रातील हे प्रश्न सामान्य जनतेच्या केवळ जिव्हाळ्याचे नाहीत तर जगण्याचे प्रश्न आहेत. महाराष्ट्रापुढील आव्हाने आणि ही आव्हाने पेलण्यासाठी राज्य सरकारच्या धोरणात्मक उपाययोजना यांचा आढावा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या पुढील पैलूंच्या आधारे करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेला आहे.

## १. नैसर्गिक समृध्दी, जैविक विविधता:

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी होवून स्वतंत्र मराठी भाषिक

राज्य अस्तित्वात आले. त्यासाठी अनेकांनी हौतात्म्य पत्करले. राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,६९० चौ.कि.मी. आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०७ कोटी होती, त्यापैकी ११.२४ कोटी लोकसंख्या (९.२९%) महाराष्ट्रात राहते. देशात लोकसंख्येबाबत उत्तरप्रदेशनंतर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात ३६ जिल्हे आणि एकूण ३५७ तालुके आहेत. राज्य नैसर्गिक सौंदर्य आणि जैविक विविधतेबाबत समृध्द आहे. उदा. राज्यातील मोठ्या महात्त्वाच्या नद्या, पर्वतरांगा, शिखरे, घाट, पठारी प्रदेश, जंगले, राष्ट्रीय उद्याने, इ. चा उल्लेख करावा लागतो. तसेच महाराष्ट्रात अजंठा-वेरुळ सारखी जगप्रसिध्द लेणी धार्मिक स्थळे, थंड हवेची ठिकाणे, शिल्पस्थाने, किल्ले, ऐतिहासिक स्थळे आहेत. महाराष्ट्राकडे देशातील भूभागापैकी १०% भूभाग आहे. ७२० कि.मी. चा समुद्रकिनारा राज्याला लाभला आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात राज्याचा वाटा १९% होता, सेवाक्षेत्राचा वाटा ६१% आणि उद्योगांचा वाटा १०.८% (महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०१२) शेतीचा वाटा १५.६% होता. सर्वाधिक वीजनिर्मिती क्षमता महाराष्ट्रात आहे. ८१३४५ किलो वॅट (२००९-१०).

### २. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य:

महाराष्ट्राने देशाची आर्थिक राजधानी म्हणून दर्जा प्राप्त केला आहे. साखर उद्योग, कापड उद्योग, अभियांत्रिकी, इ. चे राज्याच्या विकासातील योगदान मोठे आहे. देशातील मनोरंजन व्यवसायाची (बॉलिवूड) राजधानी म्हणून राज्याने ओळख संपादन केली आहे. आधुनिकीकरण व दळणवळण क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. औद्योगिक क्षेत्रात २५० वसाहती असून ३ आंतरराष्ट्रीय विमानतळे, ६००० कि.मी. रेल्वेमार्ग, २,४६,००० कि.मी. रस्ते, आंतरराष्ट्रीय बंदरे, ४० लहान बंदरे उपलब्ध आहेत. देशातील माहिती तंत्रज्ञान कंपन्यापैकी २५% कंपन्या महाराष्ट्रात आहेत. सॉफ्टवेअर निर्यातीत महाराष्ट्र देशाच्या विकासाचे इंजिन आहे. एकूण इंटरनेट वापरापैकी ३२% वापर महाराष्ट्रात होतो. ३५% संगणक बाजारपेठा महाराष्ट्रात आहेत. राज्यात ब्रॉडबँड वापरणाऱ्यांची संख्या ११.६८ लाख आहे.

### ३. महाराष्ट्रातील कृषि क्षेत्र:

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे. १९६० ते २०११ या काळात राज्याच्या उत्पन्नात शेतीचा वाटा ४२% वरून १२.८% पर्यंत बदलला, उद्योगक्षेत्राचा वाटा ३०.२% व सेवाक्षेत्राचा वाटा ५७% पर्यंत वाढल्याचे आढळून आले. राज्यातील ५५% लोकसंख्या रोजगारासाठी शेतीक्षेत्रात गुंतलेली आहेत. (जनगणना अहवाल -२०११) पंजाब, हरियाणा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश इ. राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील शेतीव्यवसाय मागासलेला आहे. याचे मुख्य कारण महाराष्ट्रातील मोठे कोरडवाहु क्षेत्र (८१%) हे आहे. राज्यातील प्रतिकूल भौगोलिक क्षेत्र, जलव्यवस्थापनाचा अभाव, इ. मुळे कृषिवृध्दी दर कमी राहीला.

महाराष्ट्र कृषिविकासात असमतोल आढळतो. पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भ, मराठवाड्यातील अपुऱ्या जलसिंचन सोयींमुळे कृषिविकास कमी झालेला आढळतो. शेतीविकासासाठी महाराष्ट्र सरकारने अनेक योजना कार्यान्वित केल्या. जलसिंचन खते बी-बियाणे, यंत्राचा वापर, पतपुरवठा सोयी इ. चा समावेश

होतो. देशातील धान्य, पिके व नगदी पिकांचे उत्पादन वाढले. तसेच फळउत्पादनक्रांती, दुग्धव्यवसाय इ. मुळे ग्रामीण विकासाला मदत झाली. विजेचा प्रश्न, मजुरांची टंचाई, कंत्राटी शेती, विक्री सोयींची कमतरता, शेतमाल बेकिफायतशिर भाव, आदानांच्या वाढत्या किंमती इ. मुळे राज्यातील शेतकरी त्रस्त आहेत. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. हे थांबवण्यासाठी गरज आहे. शाश्वत शेती विकासाचे दृष्टीने समावेशक उपाययोजनांची परिणामकारक अंमलबजावणी आवश्यक आहे.

**४.सहकारी चळवळीबाबत आघाडी:**

महाराष्ट्र हे सहकारी चळवळीबाबत आघाडीचे राज्य असून शेतकरी व शेतीसाठी सहकारी संस्थांनी मोठे योगदान दिले आहे. सह. बँका, खरेदी विक्री संघ, दुध संघ, गृहनिर्माण संस्था, सुतगिरण्या, वाहतुक संस्था, सह. साखर कारखाने, ग्राहक संघ इ. मुळे राज्यातील शहरी व ग्रामीण विकासाला मदत झाली. राज्यातील साखर कारखान्यांनी मुख्य उत्पादनाबरोबर उपउत्पादने (अल्कोहोल, मद्यार्क, कागद इ.) करून त्यांच्या कार्यक्षेत्रात शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडली (प्रवरानगर, वारणानगर इ.). २०१०-११ मध्ये राज्यात सर्व सह. संस्थांची संख्या २,२४,३०६ होती. सभासद संख्या ५६० लाख होती त्यांचे खेळते भांडवल २,४८,३४१ कोटी रू. होते. राज्यातील सह. चळवळ विकासाला पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, स्व. रत्नाप्पा कुंभार, कै. यशवंतराव चव्हाण, सहकारमहर्षि भाऊसाहेब हिरे, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते, सहकारमहर्षी अण्णासाहेब पी.के.पाटील, तात्यासाहेब कोरे, डॉ. डी. आर. गाडगीळ, माजी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार इ. चे महत्त्वाचे योगदान आहे.

जागतिकीकरणामुळे सहकारी चळवळीपुढे आव्हाने निर्माण झाली आहे. नवीन आर्थिक धोरणात खाजगी क्षेत्राला महत्व आल्यामुळे सह. पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, दुधसंघ, कारखाने अडचणीत येत आहेत. सह. संस्थांमधील गैरव्यवहार, वाढती थकबाकी व तोटा, अकार्यक्षम व्यवस्थापन, राजकीय वर्चस्व, सेवाभावी नेतृत्वाचा अभाव इ. मुळे राज्यातील सहकारी चळवळ मोडकळीस येत असल्याची भिती व्यक्त केली जात आहे. 'सहकाराला पर्याय नाही' म्हणून सह. संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

**५. घटते स्त्री-पुरूष प्रमाण:**

पुरोगामी महाराष्ट्रात महिलांसाठी आरक्षण आणि महिलांचे सक्षमीकरण याबाबत जोरदार चर्चा आणि काही अंशी प्रयत्न होत असताना दुसरीकडे राज्यातील एकूण लोकसंख्येतील स्त्री-पुरूष प्रमाण (लिंग गुणोत्तर) लक्षणीयरित्या कमी होत असल्याचे दिसते. १९९१ मध्ये ० ते ६ वयोगटात एक हजार मुलांमागे ९४६ मुली होत्या. २००१ मध्ये हे प्रमाण ८८३ पर्यंत घटले. २००१ ते २०११ या काळात राज्यात ४ लाख ६८ हजार स्त्रीभ्रूणहत्या झाल्या हे विदारक सत्य आहे.

राज्यातील पश्चिम महाराष्ट्रातील सधन समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यांमध्ये पुणे(९०६), सातारा (८८४), कोल्हापूर (८४५), सोलापूर (८९७), सांगली (८५०), अहमदनगर(८३९). स्त्री-पुरूष प्रमाण २००१ च्या जनगणनेनुसार ८५० ते ८९१ या दरम्यान होते. २०११ च्या

०ते ६ वर्षे वयोगटातील लिंग गुणोत्तर

(१००० मुलांमागे मुलींचे प्रमाण)

| वर्ष | भारत | महाराष्ट्र |
|---|---|---|
| १९९१ | ९४६ | ९४६ |
| २००१ | ९२७ | ९१३ |
| २०११ | ९१४ | ८८३ |

*स्त्रोत - जनगणना अहवाल २०११*

जनगणनेनुसार मराठवाड्यातील हिंगोली, बीड(८००), विदर्भातील, जळगाव (८२९), औरंगाबाद (८४२), बुलढाणा इ. जिल्ह्यांत हे प्रमाण ८०० ते ८५० दरम्यान होते. राज्यातील आदिवासी जिल्हे गोंदिया, गडचिरोली, नंदूरबार जिल्ह्यात हे प्रमाण जास्त (९५० पेक्षा जास्त) आढळले. प्रसिध्द लोकसंख्याशास्त्रज्ञ डॉ. आशिष घोष यांनी याचे वर्णन 'जनतेचा (दांपत्यांचा) मुलग्यांचा हव्यास आणि डॉक्टरांचा पैशाचा हव्यास' असे केले आहे. वाढत्या स्त्रीभ्रूणहत्यांमुळे पुढील काळात - विवाहासाठी मुलींची कमतरता, महिलांवरील बलात्कारात वाढ, बहुपात्नित्व या समस्या गंभीर होतील. अशी भिती व्यक्त केली जाते. मुलीच्या जन्माचे स्वागत यासाठी समाजाच्या प्रबोधनासाठी प्रयत्न करावे लागतील.

### ६. वाढते नागरिकरण व बकाल वस्त्या:

राज्यातील वाढते औद्योगिकरण आणि सेवाक्षेत्राचा विकास यामुळे लोकसंख्येचे नागरिकरण अटळ आणि अपरिहार्य आहे. रोजगार, व्यवसाय, शिक्षण इ. कारणास्तव राज्यातील विविध प्रदेशातून (विदर्भ, मराठवाडा), तसेच इतर राज्यातून (कर्नाटक, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार इ.) लोकसंख्येचे स्थलांतर औद्योगिक शहरांकडे होवू लागले. १९६१ मध्ये राज्याच्या एकूण लोकसंख्येत शहरी लोकसंख्येचे प्रमाण २८.२२% होते. २००१ मध्ये हे प्रमाण ४२.४% तर २०११ च्या जनगणना अहवालानुसार हे प्रमाण ४५.२% पर्यंत वाढले. राज्यात ५ हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असणारी ३७८ शहरे असून या शहरांमध्ये ४,१०,१९,७३४ एवढी लोकसंख्या राहते. राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, कल्याण, डोंबिवली, नागपूर, इ. महानगरांमध्ये शहरी लोकसंख्येपैकी ५०% लोकसंख्या राहते.

राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षण अहवाल डिसेंबर २०१२ अखेर केलेल्या ६९ व्या पाहणी अहवालानुसार देशातील एकूण (३३ हजार ५१०) झोपडपट्ट्यांपैकी महाराष्ट्रात ६ हजार ७२३ (२३%) झोपडपट्ट्या आहेत. महाराष्ट्र याबाबत प्रथम क्रमांकावर आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी मुंबई (धारावी) येथे आहे. याबाबतचा दूसरा क्रमांक आंध्रप्रदेश (१३.५%) आणि तिसरा क्रमांक पश्चिम बंगाल (१२%) लागतो. झोपडपट्ट्यांमध्ये राहणारी ३८% कुटुंबे महाराष्ट्रात, १८% कुटुंबे आंध्रप्रदेशात आहेत. ४४% झोपडपट्ट्या खाजगी जमिनीवर तर ५६% सरकारी जमिनीवर आहेत. बकाल वस्त्यांमधील ६०% घरे पक्की आहेत.

### ७. पर्यावरणीय असमतोल:

केंद्रीय नियोजन मंडळ, माधव गोखले अभ्यास अहवाल इ. अनेकांच्या अभ्यास अहवालानुसार महाराष्ट्रात हवा, पाणी, जमीन, अन्न इ. चे होणारे प्रदूषण नैसर्गिक संपदा व जैविक विविधतेचा होणारा नाश, इ. बाबत धक्कादायक निष्कर्ष समोर आले आहेत. विकास प्रक्रियेत महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधन सामग्रीची हानी होत आहे. पाण्याचा अनियोजित

वापर, वाढते शहरीकरण, कचऱ्याची समस्या (वैद्यकीय, औद्योगिक, घरगुती) सांडपाणी विल्हेवाटीचे प्रश्न (उद्योग, सोसायट्या), वाहनांच्या संख्येतील वाढ, अपघातांचे वाढते प्रमाण, हरितवायू उत्सर्जन, पश्चिम महाराष्ट्रात ऊसपट्ट्यात निर्माण झालेला क्षारपड जमिनीचा प्रश्न, खनिजांचे अतिरिक्त उत्खनन, भूगर्भातील खालावलेली पाणी पातळी इ. पर्यावरणीय समस्या महाराष्ट्राच्या भविष्यातील प्रगतीवर अनिष्ट परिणाम करणाऱ्या आहेत.

पर्यावरणीय प्रदूषण नियंत्रणात्मक उपाययोजना करताना वित्तीय भांडवलाची कमतरता आढळते, नियोजनाचा अभाव दिसतो. समाजामध्ये याबाबत जाणिवा प्रगल्भ नाहीत. पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व जतन यासाठी शासनाबरोबरच स्वयंसेवी संस्था, युवक, महिला, शालेय विद्यार्थी, जेष्ठ नागरिक इ. सर्वांचा सहभाग असणारी चळवळ सक्रीय होणे आवश्यक आहे.

## ८. महाराष्ट्रातील आरोग्यव्यवस्था:

देशाची लोकसंख्या म्हणजे देशाचे मनुष्यबळ. गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरते. मनुष्यबळाचा विकास - आरोग्यव्यवस्था, शिक्षणाच्या सोयी, खरेदीशक्ती समता दर इ. आधारे घडून येतो. देशपातळीवर आरोग्यावरील सरकारी खर्च २००९ पर्यंत जीडीपीच्या २% ते ३% पर्यंत वाढवण्याचे सरकारने आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात हे प्रमाण जीडीपी (स्थूल देशांतर्गत उत्पादन) च्या १.१% ते १.४% एवढे कमी आहे. महाराष्ट्र सरकारचे आरोग्यबजेट २३०० कोटी रू. चे आहे. सार्वजनिक आरोग्य हे अतिदक्षता विभागात आहे अशी स्थिती आहे. जागतिकीकरणाच्या लाटेत राज्यात आरोग्य सेवांवरील शासकीय खर्च कमी होत आहे. राज्याची लोकसंख्या वाढते त्याप्रमाणात डॉक्टरर्सची संख्या, परिचारीका, हॉस्पिटल्स, औषधे, वैद्यकीय साहित्य इ. ची उपलब्धता वाढत नसल्याचे आढळते. याबाबत जागतिक आरोग्य संघटनेच्या सूचनांचे पालन होताना दिसत नाही. राज्यात पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे इ. बाबत शहरी व ग्रामीण भागात कमतरता आढळते.

## ९. शैक्षणिक प्रगती:

स्वातंत्र्यापूर्वी राज्यात शिक्षण प्रसाराची बीजे समाजसुधारकांनी रोवली परंतु साक्षरतेचा उच्च दर, मुलींचा शिक्षणाचा वाढता सहभाग, शैक्षणिक गळतीचे उच्च प्रमाण, उच्च शिक्षणापासून अनेक वंचित ही शिक्षणाची सद्यस्थिती आहे. महाराष्ट्राने स्थापनेपासून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर भर दिला आहे. १९६१ मध्ये राज्यात साक्षरतेचा दर ३५.०८% , २००१ मध्ये ७७.२७% तर २०११ च्या जनगणना अहवालानुसार ते प्रमाण ८२% आढळते. संख्यात्मकदृष्ट्या शैक्षणिक प्रगती उल्लेखनिय आहे. परंतु मराठवाड्यातील काही जिल्हे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आढळल्याने राज्यशासनाने १९९४ मध्ये जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम राबवला. आज समाजातील काही गट शिक्षणापासून वंचित आहेत. शैक्षणिक गळतीचे प्रमाण मोठे आहे. मुलींच्या शिक्षणातील सहभाग वाढत आहे. शिक्षणातील मुलींचा सहभाग वाढावा यासाठी शासनाने खास योजना राबवल्या त्याचे हे फलित आहे. ही खूप स्तूत्य व दीर्घकालीन हिताची गोष्ट आहे.

## १०. मानव विकास निर्देशांक:

मानव विकास अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे लोकांच्या आवडीनिवडीची व्याप्ती वाढवली जाते. तसेच जे चांगले ते प्राप्त करण्याचा वेग वाढवला जाते. त्यामध्ये दीर्घकालीन आरोग्यदायी जीवन, शिक्षण सुविधा, उच्च राहणीमान, राजकीय स्वातंत्र्य, स्वसन्मान, मानवी हक्क, समता, उच्च उत्पादकता, सबलीकरण, चिरंतन विकास इ. चा समावेश होतो. १९८१ मध्ये महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक ०.३६ होता. १९९१ मध्ये ०.४५ तर २००१ मध्ये ०.५१ पर्यंत वाढला. राज्यात सर्वाधिक एचडीआय कोकण विभागाचा ०.७२ तर सर्वात कमी औरंगाबाद विभागाचा ०.६१ होता.

**समारोप:**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतरच्या पन्नास वर्षाच्या काळात राज्याने विविध क्षेत्रात प्रगती केली. राज्य शासनाने शेती, उद्योग, समाजातील वंचित घटकांचा विकास इ. च्या विकासासाठी विविध योजना राबवल्या. देशातील प्रगत राज्य म्हणून ओळख असलेल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आव्हाने, उद्योग क्षेत्रातील मंदीचे सावट, स्त्रियांवरील अत्याचार, वाढती गुन्हेगारी, अपघात, कुपोषण, कृषि क्षेत्राची मंद प्रगती, शिक्षण व आरोग्याची चिंताजनक परीस्थिती, इ. मुळे राज्याच्या विकासामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणि संभाव्य सत्ताबदल विचारात घेता ही आव्हाने पेलण्याबाबत राज्यकर्ते, धोरणकर्ते, सामाजिक विचारवंत, समाज इ. ची भूमिका महत्वाची ठरणार आहे.

**संदर्भसूची:**


१. प्रकाश सावंत, *महाराष्ट्राचा भूगोल*, फडके प्रकाशन, कोल्हापूर - २००२, पृष्ठ १०३.

२. डॉ.अ.रा.सोळूंके, *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* कैलास प्रकाशन, औरंगाबाद - २००९.

३. प्रा. डॉ. ज.फा. पाटील, *सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदली अर्थव्यवस्था*, सकाळ प्रकाशन - २०१०

४. तुकाराम जाधव, *वार्षिक २०१२ महाराष्ट्र*, युनिक - ॲकॅडेमी २०१२, युनिक प्रकाशन.

५. डॉ. भोंग, डॉ. जंगले, *भारतीय अर्थव्यवस्था समस्या व भवितव्ये*, इंटरनॅशनल बुक हाऊस लि.,२०१४

६. रा. सु. साळूंके, गावंडे, *महाराष्ट्रातील नागरिकरण प्रवृत्ती, कारणे, परिणाम, आव्हाने*, अर्थसंवाद - जून २००८ - खंड ३२, अंक १.

७. दिलीप पाटील, *महाराष्ट्राच्या कृषि क्षेत्राचा विकास*,अर्थसंवाद -जून २००९- खंड ३३,अंक ९ पृष्ठ १८.

८. कांबळे अवघडे, *महाराष्ट्राचा सामाजिक विकास - वास्तव व विपरीत*, अर्थसंवाद- जुलै-सप्टें.२०१०,खंड३४,अंक २ पृ. १४४.

९. *मानव विकास अहवाल* - २०११.

१०. *महाराष्ट्र आर्थिक पाहणी* - २०१०.

११. विकास, रोजगार, गरीबी - योजना, अंक३, ऑक्टो. २०१३.

१२. दैनिक सकाळ ५.११.२००७ पान - ६, २९.०८.२००६ पान - ६, (सप्तरंग) १५.९.२००९ पान -३

१३. *योजना - पर्यावरण विशेषांक*, जून २०१३.

१४. Govt. of India, *"Maharashtra Development-2011"*.

१५. www.mahadesh.co.in

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था: विविध पैलू

दिलीप रामभाऊ जगताप, नंदुरबार,
गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालय,
भ्रमणध्वनी : ९८२३६९२३६०
E-mail : dilip.jagtap 60@gmail.com

**प्रस्तावना:**

भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्या या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या आपल्या राज्यास अरबी समुद्राचा ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण किनारा लाभला आहे. या किनाऱ्यावरच मुंबई येथे भारताचे प्रवेशव्दार ÷गेटवे ऑफ इंडिया' आहे. जेथून संपूर्ण भारताच्या विकासाचे द्वार खुले झालेले आहे. अनेक संतांच्या तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या वास्तव्याने हे राज्य पावन झालेले आहे. सन २०१० मध्ये महाराष्ट्र राज्याने सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले आहे. ज्याच्या नावातच ÷महानता' आहे आणि नावामध्येच ÷राष्ट्र' आहे. अशा राज्याच्या अर्थव्यवस्थेने देशात अग्रेसर राहण्याचा मान मिळवलेला आहे. शिवाय रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार अशा नवनवीन लोकोपयोगी योजनांचा प्रारंभ करुन देशात एक आदर्श निर्माण केलेला आहे. ५५ वर्षाच्या वाटचालीत आपल्या राज्याने देशातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक क्षेत्रात मोठी मजल मारलेली आहे.

क्रमांक १ चे किंवा २ चे औद्योगिक विकास व परकीय गुंतवणूक वाढलेले राज्य अशा वादात असलेल्या आपल्या राज्यासमोर अनेक समस्या आहेत. या समस्यांना तोड देत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था चौफेर प्रगती करीत आहे. अशा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विविध पैलू पुढीलप्रमाणे.

## महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विविध पैलू :

### १) औद्योगिक विकासात देशात अव्वल स्थान-

उद्यमशील राज्य म्हणून गेली १०० वर्षे महाराष्ट्राची ओळख देशासमोर आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक प्रमुख व अग्रेसर औद्योगिक अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. राज्याच्या नव्हे तर देशाच्या आर्थिक विकासामध्ये

बळकट औद्योगिक क्षेत्र महत्वाचा आधारस्तंभ आहे. देशाच्या एकूण उत्पादनात राज्याचा १५ टक्के इतका सर्वाधिक वाटा असुन १६ टक्के इतकी सर्वाधिक रोजगार निर्मिती झालेली आहे. केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने केलेल्या अंदाजित पहाणीनुसार महाराष्ट्रातील उद्योगांची संख्या ही देशाच्या उद्योग संख्येच्या १२.३ टक्के आहे. देशाच्या औद्योगिक क्षेत्राच्या तुलनेत स्थिर भांडवल १४.६ टक्के, खेळते भांडवल १६.४ टक्के, निव्वळ मूल्यवृध्दी २०.२८ टक्के, रोजगार निर्मिती ११.६ टक्के तर या क्षेत्रातील नफा २१.२ टक्के आहे. यावरुन राज्याचे देशातील महत्व पटते.

सन २००९-१० मध्ये भारतातील चालू कारखान्यांची संख्या १.५८,८७७ इतकी तर राज्यामध्ये १९.४५७ इतकी होती. म्हणजेच एकूण कारखान्यांमध्ये राज्याचा वाटा ८.१६ टक्के इतका जास्त आहे.

## २)राष्ट्रीय उत्पन्नात मोठा हिस्सा :

राष्ट्रीय उत्पन्न वाढलेले असणे हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. चालू किंमतीनुसार २०११ मध्ये देशाचे एकूण उत्पन्न रु.६३.२५.०३८ कोटी इतके होते. तर आपल्या राज्यांचे एकूण उत्पन्न रु.९.८२.४५२ कोटी इतके होते. यावरुन सिध्द होते की २०११ मध्ये देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात राज्याचा १५.६ टक्के एवढा मोठा वाटा होता. तर याच कालावधीत देशाचे वार्षिक प्रती व्यक्ती उत्पन्न रु. ५३.३५१ होते व आपल्या राज्याचे देशापेक्षा जास्त वार्षिक प्रतिव्यक्ती उत्पन्न म्हणजे रु. ८७,६८६ होते आणि यात दरवर्षी वाढ होत आहे. राज्याच्या सन २०१२-१३ च्या आर्थिक पाहणीनुसार दरडोई उत्पन्न रु. ९५.३३९ अपेक्षित होते. तर देशाचे रु. ६१ ५६४ अपेक्षित होते.

दरडोई वार्षिक उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्राचा गोवा (रु. १,९२,६५२). दिल्ली (रु.१,७५,८१२), सिक्किम (रु. १,२१,४४०), व हरियाणा (रु. १,०८,८५९) या चार राज्यानंतर पाचवा क्रमांक लागतो. परंतु ही राज्ये महाराष्ट्राच्या तुलनेत आकाराने लहान असुन त्यांची लोकसंख्या कमी आहे. म्हणून त्यांचे दरडोई उत्पन्न जास्त असल्याचे आढळते. थोडक्यात आपल्या राज्याचे सरासरी उत्पन्न देशापेक्षा जास्त आहे हे स्पष्ट होते.

## ३)चांगला मानव विकास निर्देशांक :

मानव विकासात साक्षरता, आयुर्मान व दरडोई उत्पन्न (रहाणीमान)या घटकांना महत्व असते. मानव विकास निर्देशांकावरुन कोणत्याही समाजात मानव विकासात किती प्रगती झाली आहे हे कळते. सन २००१ मध्ये मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत राज्याचा क्रमांक दुसरा होता. तर सन २०११ मध्ये राज्यांचा क्रमांक या बाबतीत घसरुन पाचवा झालेला आहे. परंतु भारताचा मानव विकास निर्देशांक ०.५५४ आहे. तर आपल्या राज्याचा ०.५७२ आहे. म्हणजेच देशाच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा आपल्या राज्यांचा HDI (Human Development Index) चांगला आहे.

देशात चांगल्या HDI च्या बाबतीत पहिला क्रमांक केरळ (०.७९०) राज्याचा, दुसरा दिल्लीचा (०.७५०) तिसरा हिमाचल प्रदेश (०.६५२) तर चौथा क्रमांक पंजाब (०.६०५) राज्याचा असुन त्यानंतर महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक आहे. आपल्या राज्याचा HDI ०.५७२ इतका आहे.

## ४)वृध्दीचा उच्च दर:

राज्याच्या अर्थव्यवस्थेचा वृध्दी दर

भारताच्या आर्थिक वृध्दी दरापेक्षा जास्त आहे. देशाचा वृध्दी दर ५.५ टक्क्यांचा आसपास असून आपल्या राज्याचा वृध्दीदर ७ टक्क्यांच्या आसपास आहे. १९८१ ते ९१ या दशकात वृध्दी दर सरासरी ६.२ टक्के इतका होता. २००८-०९ या वर्षात वृध्दीदर सर्वाधिक म्हणजे २२.५७ टक्के इतका होता. तर सन २०१०-११ या वर्षात वृध्दी दर ११.३ टक्के एवढा नोंदला गेला आहे. या वरुन स्पष्ट होते की, राज्याच्या अर्थव्यवस्थेचा वृध्दीदर चांगला आहे.

### ५)महासायबर राज्य :

राज्याच्या अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रगती वेगाने होत आहे. दुरध्वनी व भ्रमणध्वनीचा वापर राज्यातील ६१.१ टक्के कुटुंबे करीत आहेत. राज्यात दरलाख लोकसंखयेमागे ८४.४१४ भ्रमणध्वणीधारक आहेत. ब्रॉड बँन्डचा वापर २४.८२ लाख नागरिक करतात. संगणक व लॅपटॉपचा वापर ५.८ टक्के कुटुंबे व इंटरनेटचा वापर ७.५ टक्के कुटुंबे करतात.

माहिती व संवादांचे तंत्रज्ञान (ICT) राज्यात आघाडीवर आहे . या क्षेत्रातील निर्यात ९० टक्कयांनी वाढलेली आहे. राज्यातुन आऊट सोर्सिंग (Out Sourcing) करुन घेण्यास अनेक देश प्राधान्य देतात. राज्याच्या अर्थव्यवस्थेला माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाचा वाढता फायदा मिळत आहे. भविष्यात आपल्या राज्याला ज्ञान अर्थव्यवस्था (Knowldge Economy) हा दर्जा मिळू शकेल.

### ६)नागरिकरणात वेगाने वाढ :

आर्थिक विकासामध्ये वाढत्या नागरिकरणाचा मोठा हिस्सा असतो. वाढत्या नागरिकरणामुळे अर्थव्यवस्था विकसित होत जाते. महाराष्ट्राच्या नागरिकरणामध्ये वेगाने वाढ होतांना आढळून येते. सन १९८१ मध्ये राज्यातील नागरिकरणाचे प्रमाण ३५.३ टक्के होते. सन १९९१ मध्ये ३८.७ टक्के होते. २००१ मध्ये ते ४२.४ टक्के झाले. तर सन २०११ मध्ये ते ४५.२३ टक्के इतके वाढलेले आहे. १९८१ या वर्षात १ लाख व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणारी २९ शहरे राज्यात होती. २००१ मध्ये त्यांची संख्या वाढून ४० झालेली होती. मुंबई हे सर्वात मोठे शहर असुन ते देशाचे आर्थिक केंद्र आहे. राजधानी आहे. नागपुर, पुणे, नाशिक, जळगाव अशा अनेक शहरांच्या विकासात वाढ होत आहे.

### ७)कृषी क्षेत्राचा मोठा आकार :

राज्याच्या अर्थव्यवस्थेत उद्योग व सेवा क्षेत्राचे प्राबल्य निर्माण झालेले असले तरी कृषि व संलग्न क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील हिस्सा १२.४ टक्के आहे. राज्यातील एकुण रोजगारापैकी ५५ टक्के रोजगार कृषि क्षेत्र उपलब्ध करीत आहे.

देशातील लागवडी खालील एकुण क्षेत्र १९२१ लाख हेक्टर्स आहे. त्यापैकी महाराष्ट्राचे लागवडीखालील क्षेत्र २२६ लाख हेक्टर्स आहे. यावरुन स्पष्ट होते की सुमारे १२ टक्के लागवडीखालील क्षेत्र आपल्या राज्यात आहे. देशाच्या एकूण लागवडीपैकी सिंचित क्षेत्र ८६४ लाख हेक्टर्स (४५ टक्के ) तर राज्याचे ४० लाख हेक्टर्स (१८टक्के ) आहे.

सन २००९ -१० या वर्षात देशाचे दरडोई धान्याचे उत्पादन १८७ कि. ग्रॅ. तर राज्याचे ११४ कि.ग्रॅ. आहे. देशाचे प्रति शेतकरी निव्वळ पेरणी क्षेत्राची एकुण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी ४२.६

टक्के आहे. तर तीच टक्केवारी राज्याची ५६.५ टक्के आहे. खतांच्या वापराबाबत देशात दर हेक्टरी प्रमाण १३७.८ कि.ग्रॅ. आहे तर राज्यात हेच प्रमाण १३५.६ कि.ग्रॅ. म्हणजेच देशाबरोबर आहे.

### ८)रोजगार निर्मितीत अव्वल स्थान :

रोजगार संधी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत राज्याचा देशात अव्वल क्रमांक आहे. देशातील एकूण रोजगारामध्ये १५ टक्के रोजगार एकट्या महाराष्ट्रात आहे. शासकीय व खाजगी क्षेत्रात राज्यात दरवर्षी लाखोंनी रोजगार उपलब्ध होतात. महाराष्ट्रानंतर या बाबतीत कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांचा क्रमांक आहे. या राज्यात फक्त २० लाख रोजगार उपलब्ध होतात.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत सन २००७ मध्ये सार्वजनिक क्षेत्रात २१ लाख ८१ हजार तर खाजगी क्षेत्रात १५ लाख ६६ हजार असे एकूण ३७ लाख ४६ हजार रोजगार उपलब्ध झाले होते. २००८ मध्ये ३६ लाख ८२ हजार २००९ मध्ये ४१ लाख २२ हजार व २०१० मध्ये ४२ लाख ५५ हजार एकूण रोजगार निर्मिती झाली होती २०१० मधील एकूण रोजगारात सार्वजनिक क्षेत्रात २० लाख ७८ हजार व खाजगी क्षेत्रात २१ लाख ७७ हजार रोजगाराचा समावेश आहे.

### ९) थेट प्रत्यक्ष गुंतवणूकीत राज्याच्या अर्थव्यवस्थेचे अव्वल स्थान :

विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या बाबतीत महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने बाजी मारलेली आहे. परकीय गुंतवणूकीच्या बाबतीत भारता समवेत केवळ महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अनेक देशांच्या यादीत आहे. जगात या बाबतीत महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा ३७ वा क्रमांक आहे. जागतिक पातळीवर परकीय गुंतवणूकीच्या बाबतीत प्राधान्य असलेली महत्वाची एक डेस्टीनेशन म्हणून महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मान्यता पावलेली आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी -२०११-१२ च्या सांख्यिकी नुसार राज्यात ऑगस्ट १९९१ ते सप्टेंबर २०१० या कालावधीत ४१२१ प्रकल्प आले. जे याच कालावधीत भारतात आलेल्या एकूण प्रकल्पांच्या २०.७ टक्के होते. या प्रकल्पामध्ये एकूण थेट विदेशी गुंतवणूक (FDI) रु ८४.९५८ कोटींची होती. जी देशातील एकूण थेट विदेशी गुंतवणूकीच्या २२.४ टक्के इतकी जास्त होती. या गुंतवणूकीमुळे देशात ४१ लाख रोजगार निर्माण झाले.

### १०) देशाच्या निर्यातीत मोठा हिस्सा :

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतुन मुख्यत्वे सुती धागे, तयार कपडे, कापड, औषधे, औषधी द्रव्ये, अभियांत्रीकी वस्तू, संगणक, सॉफ्टवेअर, धातु व धातु उत्पादने, मोटारगाड्या, रिक्शा, रत्ने व आभुषणे प्लॉस्टीक व प्लॉस्टीकच्या वस्तु, फुले व फळे अशा विविध वस्तुची विविध देशांकडे निर्यात होते.

निर्यातवाढीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात मदत होते. वर्ष १९८० मध्ये राज्यातुन रु १६८० कोटी मूल्यांची निर्यात झाली होती. तर २०१०-११ मध्ये रु. ३,०८,५१५ कोटी व २०११-१२ मध्ये रु. ३.९४.००५ कोटी पर्यंत वाढलेली आहे. २०१२-१३ या वर्षात देशाची निर्यात रु. १४.५९.२८० कोटींची होती. देशातुन होणाऱ्या एकुण निर्यातीमध्ये २००७-०८ पासुन राज्याचा वाटा २७ टक्के एवढा जास्त राहिलेला आहे.

## ११) सर्वात जास्त आर्थिक क्षेत्र :

देशात येणाऱ्या एकूण विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी (SEZ) ४०टक्के सेझ एकट्या महाराष्ट्रात येणार आहे. ३० नोव्हेंबर २०११ पर्यंत राज्यात एकूण २३४ प्रस्ताव आलेले होते. त्यापैकी १२४ प्रस्ताव केंद्र सरकारकडुन मान्य झालेले आहेत. एकूण ६४ सेझ अधिसुचित झालेले आहेत. तर राज्यात १७ सेझ कार्यान्वित झालेले असून त्यामुळे राज्यात ८.५० लाख रोजगार निर्माण झालेले आहेत.

## १२) राज्याचा विदेशी कंपन्याबाबत देशात दुसरा क्रमांक :

देशात विदेशी कंपन्यांची संख्या मार्च २००८ पर्यंत २५९३ इतकी होती. कंपनी संबंधित मंत्रालयाच्या अहवाला नुसार विदेशी कंपन्या स्थापन होणाऱ्या बाबतीत दिल्लीचा प्रथम क्रमांक असुन दिल्लीत सर्वाधिक म्हणजे १४०५ विदेशी कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा व्दितीय क्रमांक असुन राज्यात ५५३ विदेशी कंपन्या स्थापन होवून कार्यरत सुध्दा आहेत. कर्नाटक राज्याचा तिसरा क्रमांक असुन तेथे २२२ विदेशी कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. विदेशी कंपन्या राज्याच्या आर्थिक विकासात हातभार लावतात.

## १३) विकसित अधिकोष व्यवस्था :

बँकिंग प्रणाली विकसित असेल तर अर्थव्यवस्था विकसित होत जाते. राज्यात सार्वजनिक खाजगी व सहकारी बँक शाखांचे विस्तीर्ण जाळे निर्माण झालेले आहे. हे अर्थिक विकासाचे लक्षण आहे. जानेवारी २०१२ पर्यंत देशात अनुसूचित (शेडयूल) बँकाच्या ९२.६९० शाखा कार्यरत होत्या तर राज्यात ८.७९१ शाखा कार्यरत होत्या. देशाच्या या बँकशाखांमध्ये राज्याचा वाटा ९.५ टक्के इतका जास्त आहे. २०१२-१३ मध्ये १३५३ शाखा आहेत. देशात दरलाख लोकसंख्येमागे ८ शाखा तर राज्यात ७.९ शाखा आहेत.म्हणजेच या बाबतीत राज्याने देशाशी बरोबरी केलेली आहे.

दरडोई ठेवी व पतपुरवठ्याच्या बाबतीतही राज्य देशाच्या पुढे आहे. दि.३१-०३-२०१२ पर्यंत देशाच्या दरडोई ठेवी रु.५१.१०६ होत्या. तर राज्याची दरडोई ठेव रु.१.३९.५७२ इतकी जास्त होती. देशाच्या दरडोई पतपुरवठा रु. ३९.९०९ व राज्याच्या रु.१.२१.५४३ होता. यावरुन राज्यात बँकिंग प्रणालीचा विकास झालेला आहे हे स्पष्ट होते.

### निष्कर्ष:

राज्याची अर्थव्यवस्था चौफेर विकास करीत असली तरी राज्यासमोर अनेक समस्या भेडसावत आहेत. परतावा न केलेले कर्ज व इतर दायित्वे राज्यावरील ऋणभार दर्शवतात. वर्ष २००६-०७ मध्ये राज्यावर रु. १ लाख ३३ हजार ७२२ कोटींचे कर्ज होते. या कर्जात प्रतिवर्षी ११.२ टक्के दराने वाढ होत आहे. २०१०-११ मध्ये हे कर्ज रु . २ लाख ३ हजार १७ कोटी इतके वाढलेले आहे. वाढलेले कर्ज आर्थिक विकासात खिळ निर्माण करते.

राज्यात प्रादेशिक विषमता निर्माण झालेली आढळते. औद्योगिक प्रगती राज्यात समान झालेली नाही ही प्रगती पश्चिम महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या त्रिकोणातच अधिक झालेली आहे. विदर्भ, मराठवाडा व खान्देश तुलनेने

अविकसित राहीलेले आहेत. राज्यातील एकूण कारखान्यांपैकी ७० टक्के कारखाने, एकूण रोजगारापैकी सुमारे ६२ टक्के रोजगार, उत्पादक भांडवलापैकी ६९ टक्के उत्पादक भांडवल व उत्पादनाच्या स्थुल मुल्यापैकी सुमारे ८२ टक्के हिस्सा बृहन्मुंबई, ठाणे व पुणे या तीन जिल्हयात आहे. या बाबी राज्याच्या विकासातील असमतोल दर्शवतात.

राज्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांची संख्या सरकारी आकडेवारी नुसार १३.७टक्के असल्याचे दर्शविते. परंतु प्रत्यक्षात राज्यातील ३० टक्के पेक्षा जास्त लोक अत्यंत हलाखीचे जीवन जगतांना आढळतात. ही ÷व्हायब्रंट' ÷ग्लोबल' व प्रगतीत अग्रेसर असणाऱ्या राज्य अर्थव्यवस्थेसाठी लाजीरवाणी बाब ठरते.

**संदर्भ :**


१) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई. *÷महाराष्ट्राची आर्थिक पाहणी'* (२०१२-१३).

२) दास्ताने संतोष, *÷महाराष्ट्र वार्षिक'* (२०१३), नितिन प्रकाशन, पुणे.

३) सनदी ए.बी. *÷द मेगा स्टेट'* महाराष्ट्र, सुधारीत बारावी आवृत्ती (२०१३), निराली प्रकाशन, पुणे.

४) कुरुलकर र.पु. *÷महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* (२००६), विद्या प्रकाशन, नागपुर.

५) जंगले मंगला, *÷महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* (२०१३), प्रशांत पब्लिकेशन्स्, जळगांव.

६) जगताप डी. आर व पवार सुमित्रा, *÷महाराष्ट्राची अर्थव्यवस्था'* (२०१४), अथर्व प्रकाशन, जळगांव.

७) *अर्थसंवाद*, विविध अंक, मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे.

८) *लोकराज्य*, विविध अंक महाराष्ट्र शासन, मुंबई.

९) *योजना* - विविध अंक, प्रसिध्दी विभाग, भारत सरकार, दिल्ली, मुंबई.

# महाराष्ट्रातील बँकिंग क्षेत्र-नागरी बँका: एक दृष्टिक्षेप

**गजानन भाकरे, कोल्हापूर,**
फेडरल बँक, कोल्हापूर शाखा,
मोबाईल-९८६०८५७२२८.

भारताच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वपूर्ण घटक म्हणून बँकांकडे पाहिले जाते. भारतात बँकिंगचा व्यवसाय नवा नाही. अगदी मनु स्मृतीमध्येही याबाबतचे दाखले आपणास मिळतात. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील बँकिंग व्यवसाय म्हणावा तसा नव्हता. संस्थात्मक बँकिंगची सुरवात इसवी सन १९७० मध्ये झाली असली तरी इसवी सन १८०८ मध्ये कलकत्ता येथे मे.फर्ग्युसन व मे. अलेक्झांडर या दोन संयुक्त भांडवली संस्थांनी भागीदारीत बँक ऑफ बेंगॉल स्थापन केली. पुढे हीच बँक सन १९२१ मध्ये इंपिरियल बँक ऑफ इंडिया म्हणून ओळखली जावू लागली व शेवटी सन १९५५ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया झाली.

सहकारी बँकिंगचा पाया मात्र शहरातील मध्यमवर्गीयांनी घातला. बडोदा येथील सयाजीराव गायकवाड महाराज विद्यालयातील काही प्राध्यापक मंडळींनी एकत्र येवून आपल्या आर्थिक गरजा भागविणेसाठी दि. ५ फेब्रूवारी १८८९ मध्ये कै. रघुनाथ लक्ष्मणराव कवठेकर यांच्या नेतृत्वाखाली अनोन्य सहाय्यकारी मंडळींची सहकारी बँक स्थापन केली. या आद्य नागरी सहकारी बँकेच्या स्थापनेला दि. ५ फेब्रूवारी २०१४ रोजी १२५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. पूर्वी सर्वसामान्य माणसाला बँकींगच्या सवयी, बचतीच्या सवयी किंवा आर्थिक गरजा भागविणेसाठी कोणतीही कायदेशीर यंत्रणा अस्तित्वात नव्हती. नागरी बँकिंग संस्था समाजाला वरदानच ठरल्या आहेत.

नागरी सहकारी बँकिंगच्या विकासाचे तीन प्रमुख टप्पे आहेत. देशातील व्यापारी बँका ज्या ज्या वेळी लयाला गेल्या नेमक्या त्याच काळात नागरी बँका उदयाला आल्या. या बँकांवर नियंत्रण केवळ सहकार खात्याचेच होते. १९६३ पासून नागरी बँकांना मर्यादित स्वरूपात बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट लागू झाला. त्यानंतर आजतागायत ५० वर्षे रिझर्व्ह बँक नागरी बँकांच्या तपासण्या करत आहेत. त्यांच्या माध्यमातून नागरी बँकांना आर्थिक शिस्त लागली आहे. रिझर्व्ह बँकेच्या दृष्टीकोनातून ठेवीदारांचे हित फार महत्वाचे आहे. ठेवीदारांनी बँकेत

गुंतवलेले सर्व पैसे व त्याचा परतावा म्हणजेच व्याज त्यांना मिळालेच पाहिजे यासाठी रिझर्व्ह बँक सहकारी बँकांचा कर्ज व्यवहार कसा आहे यावर कडक नियंत्रण ठेवते.

सन १९६५ साली देशात सुमारे ८०० पेक्षा अधिक नागरी बँका कार्यरत होत्या. त्यांचेकडील ठेवी व कर्जे मिळून २५० ते ३०० कोटींची उलाढाल होते. निव्वळ ५०० कोटीपेक्षा अधिक व्यवसाय असणाऱ्या बँकांची संख्या १०० पेक्षा अधिक होती. महाराष्ट्रातील विभागनिहाय नागरी सहकारी बँकांची स्थिती लक्षात घेतली असता आर्थिक सुधारणोत्तर काळात मुंबई विभागात नागरी सहकारी बँकांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते. मुंबई विभागात सन १९९१ साली नागरी बँकांची संख्या जवळपास ९२ इतकी होती ती संख्या घटून २००५ पर्यंत ७९ इतकी झाली. कोल्हापूर विभागात सरासरी सर्वात जास्त म्हणजे १२८ इतक्या नागरी सहकारी बँका आहेत. सन १९९१ च्या तुलनेत सन २००५ मध्ये महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या संख्येत बऱ्यापैकी वाढ झालेली आहे. कोल्हापूर विभागात सर्वात जास्त २० % नागरी सहकारी बँका आहेत. तर सर्वात कमी नागरी सहकारी बँका अमरावती विभागात आहेत. आर्थिक सुधारणा पूर्व काळात महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांचा आर्थिक दर्जा सुधारला आहे. नागरी सहकारी बँकांची संख्या १.७१ पटीने वाढली आहे.

## महाराष्ट्रातील सहकारी बँकांची आर्थिक स्थिती:

देशातील एकूण नागरी सहकारी बँकापैकी ३३% बँका महाराष्ट्रात आहेत. कर्नाटकमध्ये १६%, गुजरातमध्ये १५%, तामिळनाडूमध्ये ८% तर आंध्रप्रदेशात ७% बँका आहेत. देशाच्या उर्वरीत भागात २१% बँका आहेत. महाराष्ट्रातील १८६ नागरी सहकारी बँकांची आर्थिकस्थिती समाधानकारक नाही. यातील जवळपास १२ बँकानी आपले अस्तित्व वर्षभरात गमावले आहे. उरलेल्या १७४ बँकांची स्थिती अत्यवस्थ रूग्णांसारखी झाली आहे.

## नागरी सहकारी बँकासमोरील आव्हाने व उपाययोजना:

१. एन.पी.ए.चे वाढते प्रमाण - संचालक मंडळाचे कर्ज वाटपा बद्दलचे उदार धोरण, तसेच नियमबाह्य कर्ज वाटप यामुळे थकीत कर्जाच्या प्रमाणात वाढ होवून, बँकेच्या नफ्यावर परिणाम झालेला दिसून येतो. म्हणूनच एन.पी.ए.चे प्रमाण कमी होण्यासाठी बँकांनी थकबाकीच्या वसुलीस प्राधान्य दयावे.

२. दुहेरी नियंत्रण - सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँक, राज्यसहकार खाते, नाबार्ड यांचे नियंत्रण असल्यामुळे रिझर्व्ह बँकेला धोरण राबविताना मोठ्या अडचणी येतात. म्हणून सहकारी बँकांच्यावर रिझर्व्ह बँकेचे पूर्णत: नियंत्रण असेल तर बँकांचा गुणात्मक व संख्यात्मक आलेख उंचावण्यास मदत होईल. त्यामुळे बँकींग व्यवसायात निश्चितच पारदर्शकता येण्यास मदत होईल. रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असेल तर बँकांचे थकीत कर्जाचे प्रमाणही कमी होईल.

३. ग्राहक सेवा - ग्राहक हा देव मानून त्याच्या हिताचे रक्षण करणे हे प्रत्येक बँक कर्मचाऱ्याने कर्तव्य मानले तर, आज बँकाबँकांमध्ये जी स्पर्धा सुरू आहे त्या स्पर्धेत स्वत:च्या बँकेचे

अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी बँकानी ग्राहक सेवेला विशेष महत्त्व दिले पाहीजे, उत्तम दर्जाची ग्राहक सेवा, तसेच ग्राहकांच्या गरजेनुसार बॅकांनी सेवा दयावी. बँकेची श्रेणी सुधारण्यासाठी बँकांचे व्यवस्थापकीय अध्यक्ष व कर्मचारी वर्ग पुरेसा प्रशिक्षित असावा.

४. आधुनिक तंत्रज्ञान - उत्तम दर्जाची ग्राहक सेवा देताना बॅकांनी आधुनिकीकरणाचा अवलंब करणे क्रमप्राप्त ठरते. आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे देशातील सर्व कर्जदारांची माहिती एका क्लीकसरशी मिळण्याची सोय आहे. याचा फायदा बँकानीही आपल्या ग्राहकांना करून देणे गरजेचे आहे.

५. कर्ज वाटप - संचालकांचा मनमानी कारभार व थकीत कर्जे यामुळे बँकांच्या उत्पादन क्षमतेवर मोठा परिणाम होत असल्याने, बँकांची वर्गवारी खाली येवून जनमाणसातील बँकेची पत कमी होण्याचा धोका असतो. हा धोका टाळण्यासाठी स्वत:चे घर चालविल्याप्रमाणे बँक व्यवस्थापनाने बँकेचा कारभार चालवावा.

६. सभासदामध्ये जागृकता निर्माण करणे - काही वेळा राजकीय हस्तक्षेपामुळे काही मूठभर लोकांचेच वर्चस्व होत राहिल्याने सभासदांमध्ये नाराजी निर्माण होत राहते. याकरीता सभासदांमध्ये त्यांना त्यांचे हक्क व कर्तव्य याची जाणीव वेळोवळी करून देणे बँक संचालकांचे कर्तव्य ठरते.

७. खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे - बँकांनी आपला नफा वाढण्यासाठी अतिरिक्त खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे वाटते. प्रत्येक सहकारी संस्थेने उत्पन्नाचे विविध स्त्रोत शोधून खर्चात बचत केली तरच सभासदांच्या भांडवलावर योग्य परतावा देता येईल. यासाठी आवश्यक तरतूदी पोटनियमात आणणे आवश्यक आहे. निवडणूकीचा खर्च पुढील ५ वर्षात नावे टाकण्याची तरतूद हवी.

८. व्यावसायिक व्यवस्थापनेचा अवलंब - बँकींग व्यवसाय करताना कर्जे वाटप करून नफा मिळविणे ही व्यावसायिकता खूप महत्वपूर्ण असते. काही नागरी सहकारी बँकानी कर्जे अनुत्पादक होवू नयेत म्हणून चांगले कर्जदार मिळविण्याचा प्रयत्न केला नाही, तसेच कर्जदारांना चांगले कर्जदार घडविण्याची योग्य ती काळजी घेतली नाही, परिणामत: कर्ज वाटपात घट झाल्याचे निर्दशनास दिसून येते. काही बँका अजूनही कर्ज वाटप व वसूली याबाबतीत परंपरागत धोरण अवलंबत आहेत. वास्तविक कर्जदारास त्याच्या कर्जाचा हप्ता व व्याज आकारणी भरण्याची अंतिम मुदत असलेली स्मरण पत्रे प्रत्येक महिन्याला पाठविली पाहिजेत. व्यावसायिक व्यवस्थापनेचा अवलंब करताना दीर्घ मुदतीच्या ठेवी संकलनाकडेही बँकांनी विशेष लक्ष दिले पाहीजे. बँका अल्प मुदतीच्या ठेवींवरच संतुष्ट असल्याचे दिसून येते. परिणामी बँकांचा पत पुरवठ्याचा दर संथ गतीने कमी होतो. म्हणून बँकानी दीर्घ मुदतीच्या ठेवींना प्रोत्साहन देवून असंतुलन कमी करण्याचा प्रयत्न करावा. रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्र.यु बी डी/ सी.ओ.बी.पी.डी./पी सी बी ५१/ ०९.१८.२०१/२०१३-१४ दि.२५ मार्च

२०१४ नुसार कार्य क्षेत्राबाहेरील सभासद किंवा बिगर सभासदाकडून अशा ठेवी स्वीकारता येतात.

बँकींग विषयक सुधारणामध्ये थकीत कर्जे किंवा थकित मालमत्ता ह्याचे वर्गीकरण करून अनुत्पादक मालमत्तेचे निकष लागू करण्यात आल्याने सुरूवातीच्या काळात बँकाच्या उत्पन्नात घट झाली. परिणामी बँकाच्या कर्ज वाटपावर आणि व्यवसायावर त्याचे विपरीत परिणाम झाले. सहकारी बँकाच्या बाबतीत मात्र अशी थकीत कर्जे एखादया कंपनीला विकून एन पी ए चे प्रमाण कमी करण्याची सोय अजून ही उपलब्ध नसल्याने नागरी सहकारी बँकाच्या एन पी ए प्रमाण राष्ट्रीयीकृत व व्यापारी बँकांच्या प्रमाणापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. परंतु सहकारी बँकानी सुध्दा थकित कर्जे वसुली ऐवजी झालेल्या उत्पन्नातून किंवा नफ्यातून एन पी ए साठी तरतूद केल्यामुळे अनेक सहकारी बँकांच्या निव्वळ एन पी ए प्रमाण शून्य टक्के झाले आहे.

**बहुराज्यीय नागरी बँकाची एनपीए विक्री:**

नागरी सहकारी बँका आपल्या नॉन परफॉर्मन्स असेट किंवा निष्क्रीय मालमत्ता असेट रिकन्स्ट्रकशन कंपनी अथवा सिक्युरिटायझेशन कंपनी सारख्या संस्थांना विकून आपले एन पी ए कमी करू शकतात. अशा प्रकारची कार्यवाही व्यापारी बँका करीत असतात. त्यामुळे ताळेबंद स्वच्छ करण्यास मदत होते. (रिझर्व्ह बँकेकडील परिपत्रक क्र.यु बी डी बी पी डी, ८ पी सी बी ५३/१३/०५/०००/२०१३-१४ दि.२८ मार्च २०१४ नुसार २% रक्कम बुडीत कर्जासाठी बाजूला ठेवावी लागत असे. मात्र रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या नव्या तरतुदीनुसार आता बँकाना ५% रक्कम बाजूला ठेवावी लागणार आहे.)

नागरी बँकांच्या विकासाचा दुसरा टप्पा सन १९६५ ते १९९१ हा होता. या काळात नागरी बँकाना ठेव विम्याचे कवच मिळावे म्हणून रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण मान्य करण्यात आले. सहकार खात्याचे व्यवस्थापन व रिझर्व्ह बँकेचे बँकिंग व्यवहारावर नियंत्रण अशा दुहेरी प्रकारांत नागरी बँकाचे कामकाज सुरू झाले. सन १९९९ च्या मोठ्या व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयकरणानंतर व्यापारी बँकांच्या विस्ताराचे धोरण आखले गेले. त्याचबरोबर नागरी बँकांचे कामकाजात सुधारणा करण्याच्या हेतूने तत्कालीन कार्यकारी संचालक श्री.के.माधवदास यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या सर्वच्या सर्व २२० शिफारशी रिझर्व्ह बँक व शासन यांनी स्वीकारल्या. पारंपरिक कर्जव्यवहार, ताराणाकडून उत्पादक कारणाकडे वळविण्यात आला. व्यापारी बँका व नागरी बँका यांच्या कर्ज व ठेवींवरील व्याजदर जवळपास एक करण्याचा प्रयत्न करण्यात आला. व्यापारी बँकांच्या कार्यपध्दतीत थोडाफार फरक करून ते नियम नागरी बँकानांही लागू करण्यात आले. इ.सन १९९१ साली देशांत सुमारे १४०० नागरी बँका होत्या व त्यांची ठेवी कर्जे मिळून उलाढाल रू.१५,०००/- कोटींपर्यंत पोहोचली होती.

सन १९९१ मध्ये भारत सरकारने आर्थिक क्षेत्राची पुर्नरचना करण्याचे ठरवून अर्थव्यवस्था समाजवादी समाज रचनेकडून बाजारचलित करण्याचे ठरवले. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण धोरण म्हणून ठरवले. बेसिल समितीच्या शिफारशी नागरी बँकानाही लागू करण्यात आल्या. व्यापारी बँकामध्ये झालेल्या

पडझडीची भरपाईसरकारने भागभांडवलात भर टाकून केली. नागरी बँकास सुरवातीस याचा योग्य अंदाज आला नाही. पण अहमदाबादेतील माधवपुरा मर्कंटाईल बँकेमधील घोटाळ्यामुळे आपल्या अस्तित्वाचीच लढाई नागरी बँकांसमोर येवून ठाकली. त्याचवेळी रिझर्व्ह बँकेचा दृष्टीकोन अत्यंत अनाकलनीय असा होता. काही बँकांत घोटाळे झाले म्हणून त्याची शिक्षा सर्व नागरी बँकांना करण्याचा रिझर्व्ह बँकेने चंगच बांधला. प्रत्येक तपासणीत बँकांनी काढलेले एन.पी.ए.चे प्रमाण चुकीचे ठरवायचे व ते वाढवून नफा व भांडवल पर्याप्तता कमी करावयाची असे धोरण अवलंबले. यामुळे गेल्या २० वर्षात सुमारे ५०० पेक्षा अधिक बँकांना फटका बसून अस्तित्व गमावण्याची पाळी आली.

रिझर्व्ह बँकेचे धोरण गेल्या ५ वर्षात जरा मवाळ झाले. अमेरिकेतील सबप्राईम लेंडींग भस्मासूर याला कारणीभूत आहे. सन १९९८ नंतर रिझर्व्ह बँकेने एकाही नवीन नागरी बँक स्थापनेस परवानगी दिली नाही. सन १९९८ ते २००८ पर्यंत एकाही बँकेची नवीन शाखा झाली नाही. एकाही बँकेला शेड्यूल दर्जा दिला गेला नाही. या काळांत सर्वच बँका वाईट काम करत होत्या का? तर याचे उत्तर नाही असेच असेल. नेमक्या याच काळांत व्यापारी बँकांचा व्यवसाय ५ लाख कोटींवरून १३१ लाख कोटींवर गेला. शाखा ६०,००० च्या १,०२,००० इतक्या झाल्या. नव्याने ९५,००० ए.टी.एम. केंद्रे स्थापन झाली. नागरी बँकांच्या विस्तारास परवानगी नसल्याने बाजारातील त्यांचा वाटा ३ टक्केपर्यंत आला.

बँकांकडील तरलता ही बँकांच्या गुंतवणुकीतून दिसत असते. बँकिंग रेग्युलेशन कायदा १९४९ चे कलम १८ व २४ नुसार प्रत्येक बँकेला आपली गुंतवणूक करून तरलता प्राप्त करावी लागते. अलिकडे शासकीय प्रकल्पाचे रोखे अडचणीत आल्यामुळे त्याचा फटका काही नागरी बँकांना बसला आहे.

सध्या रिझर्व्ह बँकेने फक्त राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, विदेशी बँकांच्या शाखा, प्रादेशिक ग्रामीण बँका व शेड्यूल्ड नागरी बँका यांच्यासाठी मार्गदर्शक तत्वे जाहीर केलेली आहेत.

आनंदाची बाब म्हणजे आता रिझर्व्ह बँकेचे नागरी बँकांबाबतचे दृष्टिकोनात बऱ्यापैकी फरक पडत चालला आहे. मागील वर्षात या दृष्टीकोनातून अनेक धोरणात्मक परिपत्रके रिझर्व्ह बँकेने प्रसिध्द केली आहेत. चांगल्या व सक्षम बँकेचे निकष काय आहेत, पर्यवेक्षणीय कृती आराखड्याचे निकष, शाखा विस्ताराबाबतचे धोरण, रक्कम वर्ग करण्याच्या विविध योजनांचे सभासदत्व, तंत्रज्ञान आधुनिकीकरणाबाबतचा आग्रह व अंमलबजावणी ज्याद्वारे नागरी बँका मुख्य प्रवाहात रहाव्यात अशा अनेक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले असून त्यात बँकांकडून असलेल्या अपेक्षांचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे बँकांनी योग्य ती खबरदारी घेतली पाहीजे. आपल्या कामकाजात पारदर्शकता, व्यावसायिक व्यवस्थापनेच्या पध्दती, आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर व एकजूट ठेवली तरच आपण बँकेचा विकास घडवता येईल.

## संदर्भ सूची:

१. डॉ.गजानन भाकरे, *राज्यातील सहकारी बँकांची स्थिती-रिझर्व्ह बँकेचे पूर्णतः*

*नियंत्रण गरजेचे*, स्व.जमनालाल बजाज उपक्रम सन २०१०-११, पृ.१ ते ३.

२. अर्थमिमांसा, *महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव विशेषांक*, जानेवारी ते जून २०१० पृ.२८.

३. *बँकिंग अभिप्राय*, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँकस् असोसिएशन लि., पुणे, जानेवारी २०१४, पृ.३.

४. त्रैमासिक *अर्थसंवाद*, ऑक्टोंबर-डिसेंबर २०१३, पृ.१६८.

५. महाजन मुकुंद, *भारतीय बँक प्रणाली*, जून २००४, पृ.६५.

६. *महाराष्ट्रातील सहकार चळवळ एका दृष्टीक्षेपात*, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे चे प्रकाशन, पृ.५७.

७. कुरूलकर, *बँकिंगची तत्वे व बँकींग पध्दती* पृ.४५.

८. *रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक*, क्र. युबीडी, सीओ, बीपीडी, पीसीबी ५१/०९.१८.२०१/२०१३-१४ दि.२५ मार्च २०१४.

९. *रिझर्व्ह बँक परिपत्रक*, क्र.युबीडी, बीपीडी (पीसीबी) ५३/१३.०५.०००/२०१३-१४ दि.२८ मार्च २०१४.

१०. *अमृतवेल मनी प्लस*, एप्रिल २०१४, पृ.१.

---

**ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES**

***DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE***

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2013 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2014. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C., Jalgaon-425001.*
*(Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# महाराष्ट्रातील कृषी विकास: शासकीय धोरण

**वनिता चोरे, चांदूरबाजार,**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभागप्रमुख
कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, जि.अमरावती.
भ्रमणध्वनी : ९७३००६७४००

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेची कृषी अर्थव्यवस्था म्हणून सर्वत्र ओळख आहे. महाराष्ट्रातील ६२ प्रतिशत लोक शेती व त्यावर आधारित तत्सम उद्योग करून आपली उपजीविका करतात. बदलत्या परिस्थितीमध्ये देखील शेती हा मुख्य गाभा आहे. त्यामुळे शेतीक्षेत्राच्या विकासाशिवाय पर्याय नाही. कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतीच्या आधुनिकीकरणावर भर देऊन व्यापारी शेतीकडे वळावे लागेल. त्यादृष्टीने फळ शेती विकसित होत आहे. संस्थात्मक व तांत्रिक सुधारणांवर भर देण्यात आला. देशाचा कृषी विकास दर वाढविण्याच्या दृष्टीने राज्य व केंद्रीय स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. फळ उत्पादनाच्या विकासाकरिता फळबाग लागवड ते विक्री व्यवस्था या संदर्भातील धोरण सुधारणा, व्यापक, सर्वदूर अस्तित्वात न आल्यामुळे फळ उत्पादनाच्या विकासाकरिता शासकीय धोरणाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधामध्ये केला आहे.

**शेती उत्पादन व उत्पादकता :**

कोरडवाहू शेतीतील अन्नधान्याची उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी अशी महाराष्ट्र राज्याची स्थिती आहे. ÷÷लागवडी खालील निव्वळ क्षेत्राच्या बाबतीत महाराष्ट्राचा भारतात दुसरा क्रमांक आहे.महाराष्ट्रातील सर्व पिकांची हेक्टरी उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. येथील शेती मुख्यत: मोसमी पावसावर अवलंबून आहे. विदर्भ व मराठवाड्यातील फार मोठे क्षेत्र कमी पाऊस व पर्जन्यछायेच्या प्रदेशात आहे. एकूण लागवडीच्या क्षेत्रापैकी फक्त १३ प्रतिशत क्षेत्र ओलिताखाली होते. आज ते १६ प्रतिशत पर्यंत वाढले आहे. त्यामुळे शेती उत्पादकतेत घट होत आहे. हरितक्रांतीच्या पर्वामध्ये महाराष्ट्रात कुंठीतावस्था

दिसते. एकूण उत्पादन व हेक्टरी उत्पादकता यात राज्यात दरवर्षी मोठा, चढ उतार दिसून येतो. शेतीमध्ये संस्थात्मक व तांत्रिक सुधारणा करून ५० वर्षामध्ये उत्पादन वाढीसाठी प्रयत्न केले जात आहे. प्रत्यक्षात मात्र यामुळे शेतीची उत्पादकता वाढलेली नाही. राज्यातील हवामान, जमिनीचा कस, पावसाची शक्यता हे सर्व विचारात घेऊन अधिक उत्पादनासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

### कृषी विकासाची व्यूहरचना :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतीमध्ये उत्पादन वाढविणे आणि पर्यायाने उत्पादकतेत वाढ करणे यादृष्टीने ÷भूमीसुधारणा' शेती विषयक नवीन व्यूहरचना ÷हरितक्रांती', कोरडवाहू शेतीचा विकास,नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. याचाच एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून १) पशुपालन व दुग्ध उत्पादन २) मत्स्यपालन ३) फलोत्पादन या योजनांना महत्त्व आहे. नवीन व्यूहरचनेमध्ये फळउत्पादनावर भर दिल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात व आर्थिक स्थितीत बदल होऊ शकतो. गेल्या दोन दशकांपासून फळ उत्पादनाची शेतीविकासाची व्यूहरचना अंमलात आणल्याचे दिसून येते.

अकराव्या योजनेत कृषी विकासाच्या व्यूहरचनेत ज्या उत्पादनाचे मूल्य अधिक आहे. अशा फळे, फुले इ. उत्पादनावर भर देण्याचे उद्दिष्ट आहे. दिवसेंदिवस पावसाचा अनियमितपणा वाढत आहे. खरीप पिकांना पावसावर अवलंबून रहावे लागते. आज ठिबक सिंचन पद्धतीचा सर्वत्र वापर होत आहे. देशात कमी पावसाच्या भागात फळ शेती यशस्वी होत आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्र राज्यही फळशेतीला महत्त्व देत आहे.

### फळ उत्पादन धोरण :

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून आजपर्यंत फळउत्पादनाची महाराष्ट्रातील स्थिती थोडक्यात स्पष्ट करीत आहे. फळ उत्पादनाकडे निश्चित व शाश्वत उत्पादन देणारे क्षेत्र म्हणून पाहिले जात आहे. महाराष्ट्रामध्ये फळबाग लागवडीला चालना देण्यासाठी फलोत्पादन विभागाची स्थापना केली.

महाराष्ट्रामध्ये प्रत्यक्ष ६० प्रतिशत शेतकऱ्यांपैकी किती शेतकरी उपलब्ध धारण क्षेत्रामध्ये फळबाग लागवड करतात ? या धोरणाचा लाभ छोट्या शेतकऱ्यांना व्हावा या अनुषंगाने सद्यस्थितीत शासन अनेक योजना राबवीत आहे. १९५१-५२ ते १९६७-६८ या काळात शेती आणि पशुपालनाचा सरासरी वार्षिक दर ०.८९ प्रतिशत पर्यंत कमी होत गेला. मागील दोन दशकाचा विचार करता विशेषत: महाराष्ट्रातील चित्र विदारक दिसते. कृषी विकासदर ०.१० प्रतिशत इतका कमी झाला. महाराष्ट्रामध्ये फळ शेती करणारा वर्ग सधन होत आहे तर कोरडवाहू शेती करणारा वर्ग आत्महत्येकडे वळत आहे. महाराष्ट्रामध्ये ८३.७ प्रतिशत कोरडवाहू शेती करणारा वर्ग असून १६.३ प्रतिशत ओलिताखालील क्षेत्र आहे. यादृष्टीने कोरडवाहू शेतीखालील क्षेत्रावर फळपिक लागवड करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या धोरणावर भर देण्याची आवश्यकता आहे.

### शासकीय धोरण :

कृषिक्षेत्राचा विकास इतर क्षेत्राच्या विकासाप्रमाणेच केंद्र व राज्य शासनाच्या धोरणावर म्हणजेच शासकीय धोरणावर अवलंबून आहे. इ.स.१९५२ मध्ये प्रा. टिनबर्जन यांनी

शासकीय धोरणाचे महत्त्व पुढीलप्रमाणे विशद केले. ÷÷आर्थिक धोरण वा नीती म्हणजे शासकीय धोरण, हे धोरण सामान्यांची काळजी घेणे, त्यांचे हितसंबंध जोपासणे या अनुषंगाने असते.''शास्त्रीय भाषेत अशा धोरणाचा, उद्देश ÷सामान्य उपयोगिता फलनाचे महत्तमीकरण' हा असतो.

कृषीविषयक शासकीय धोरण म्हटले की, ते समष्टीपातळीवर संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी राबविण्यात येते. सामान्यांच्या आवश्यकतेनुसार विविध उत्पादनातील वाढीला अनुसरून विविध अभियान स्वतंत्रपणे व्यष्टी पातळीवर राबविण्यात येते. लोकांच्या मागणीनुसार ज्या सुधारणा धोरणांमध्ये केल्या जातात. त्या व्यष्टी पातळीवरील असतात. फळ उत्पादनाबाबतचे शासकीय धोरण शेतीच्या एका प्रश्नाच्या संदर्भातील व्यष्टी धोरण आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कृषी विकासामध्ये नियोजनासारख्या मार्गाचा स्वीकार करून कृषी विकासासाठी गुंतवणूक केली आहे. कृषी विकासाचे प्रामुख्याने दोन टप्पे पाडता येतात.

अ) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५१ ते १९९०-९१ पर्यंतचा पहिला टप्पा.

ब) १९९०-९१ नंतरच्या आर्थिक सुधारणाचा दुसरा टप्पा होय.

**नवीन शासकीय धोरणाची आवश्यकता :**

इ.स. १९९१ मध्ये शासनाने जे नवीन आर्थिक धोरण राबविण्यास सुरुवात केली त्यामध्ये कृषी विषयक सुधारणा जवळपास नगण्य आहेत. कर, खाजगीकरण, उदारीकरण यावर जास्त भर दिला. इ.स. २००४ मध्ये संपुआ सरकारने ÷राष्ट्रीय कृषी आयोगाची' डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती केली गेली. आयोगाने पाच सुत्री कार्यक्रम लागू करण्याची शिफारस केली आहे. ती पाच सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत. १) भूमी स्वास्थ्य सुधार कार्यक्रम २) जलसंवर्धन योजना ३) ऋण सुधार योजना ४) कृषी विज्ञान केंद्राद्वारे पीक उत्पादन, संशोधन आणि कृषी विविधीकरण, ५) किंमत फैलाव शक्य होईल तितका कमी करणे.

**फळ उत्पादन शासकीय धोरणातील बदल :**

राष्ट्रीय कृषी धोरण २००० मध्ये फळ उत्पादकांना केंद्रस्थानी ठेवून तंत्रज्ञानावर आधारित धोरण विकसित करण्यासाठी आधारभूत संरचना, संसाधने, ग्रामीण संस्था, बाजारपेठेचा विस्तार, करार शेती, उत्पादक बाजारपेठ कायदा, विक्री साखळी या संदर्भातील फळ उत्पादनाची गुणवत्ता, दर्जा, स्पर्धा, उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने नवीन धोरण निर्धारित करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने कृषी समस्यांचे निर्धारण करण्याकरिता केंद्र शासनाच्या धर्तीवर १६ कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. तसेच केंद्र सरकारने कृषी विकास योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या, राष्ट्रीय अन्नसुरक्षा मिशन (NFSM) आणि राष्ट्रीय फलोत्पादन योजना (NHM) यासारख्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना. महाराष्ट्र शासनही राबवीत आहे. कृषी विस्तार कार्यक्रमाअंतर्गत निर्धारित केलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याकरिता कृषी विकास आराखड्यांतर्गत केंद्र व राज्यशासन पुरस्कृत चार प्रमुख कार्यक्रमाअंतर्गत शेतकऱ्यांसाठी शासकीय अर्थसहाय्य व अन्य विविध योजनांमध्ये ३०१ योजना समाविष्ट आहेत.

कृषी विस्तार कार्यक्रमातंर्गत केंद्र पुरस्कृत विकास कार्यक्रमातंर्गत महाराष्ट्र कृषी आणि

फलोत्पादन माहिती व तंत्रज्ञान अभियान २००८-०९ पासून राबविले आहे. योजनानिहाय व घटकनिहाय कार्यक्रमांमध्ये माहिती, कृषी तंत्रज्ञान प्रसाराकरिता राज्यांतर्गत व राज्याबाहेर शेतकऱ्यांचे अभ्यास दौरे, मृदा सर्व्हेक्षण व मृदा चाचणी सुविधा, कृषी विभागामार्फत देण्यात येणारे पुरस्कार, कृषी यांत्रिकीकरण, कृषिक्षेत्रातील स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, शेतकरी मासिक योजना, कृषिमाल निर्यातीकरिता फायटो सॅनिटरी प्रमाणपत्र देण्याची सुविधा, स्वयंरोजगार निर्मिती प्रकल्प योजना, फळ, फुले, भाजीपाला, विक्रीकरिता बाजार सहाय्य योजना.

**रोजगार हमी योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील फलोत्पादन विकास योजना :**

महाराष्ट्रात पूर्वीपासून फळझाडांची लागवड केली जाते. फळबाग लागवडीस चालना देण्यासाठी राज्य शासनाने १९८१ साली फलोत्पादन विभागाची स्थापना केली. इ.स. १९९०-९१ मध्ये रोजगार हमी योजना व राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सुरू केले आहे. इ.स. १९९०-९१ पर्यंत फक्त २.४२ लाख हेक्टर क्षेत्र फळ उत्पादनाखाली होते ते १४.९९ लाख हेक्टर पर्यंत पोहोचले. यापैकी जवळपास ३,३१,००० हजार हेक्टर लागवड ही पडीक व ओसाड जमिनीवर करण्यात आली आहे. राज्यातील २९.००० हजार गावांमध्ये ही योजना पोहोचलेली आहे.

महाराष्ट्रामधील ६ महसूल विभागामध्ये सर्वात जास्त फळपिकांखालील क्षेत्र २०.३ प्रतिशत (१२०० हेक्टर) कोकण विभागात तर नाशिक व औरंगाबाद विभागात अनुक्रमे १९.७८ व १९.६१ प्रतिशत आहे. सर्वात कमी फळपिकांखालील क्षेत्र नागपूर महसूल विभागात महाराष्ट्राच्या एकूण फळपिकांखालील क्षेत्राच्या ९.४२ प्रतिशत आहे. महाराष्ट्रात फळांच्या क्षेत्रानुसार सर्वात जास्त आंब्याचे क्षेत्र वाढले आहे. या खालोखाल संत्री, केळी, काजू यांचा क्रमांक लागतो.

फळबाग क्षेत्र विस्ताराबरोबरच राज्यात फलोत्पादन पिकांच्या दर्जेदार उत्पादनाची विक्री प्रक्रिया उभी करणे, शेतकऱ्यांचा आर्थिक उत्कर्ष, उत्पादकापासून उपभोक्त्यापर्यंत फळपिकांच्या मालाची योग्य साखळी निर्माण करणे आणि त्यामध्ये उत्पादक शेतकरी, काढणी नंतरचे व्यवस्थापन करणारी यंत्रणा, प्रक्रिया उद्योजक, विक्री व्यवस्था यांच्या विकासासाठी या अभियानात पुढील योजनांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

१) आदर्श रोपवाटिका स्थापना, २) रोहयो अंतर्गत फळबाग क्षेत्र विस्तार, ३) जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन व उत्पादकता, ४) मधुमक्षिका पालन, ५) फळउत्पादन पीक प्रात्यक्षिके, ६) पॅक हाऊस उभारणी, ७) वातानुकूलित वाहन सुविधा, ८) कृषी तंत्रज्ञान प्रसार केंद्राची स्थापना, ९) करार पद्धतीच्या शेतीस चालना देणे, १०) पणन सुविधा उभारणे यासाठी प्रत्येक योजनेला शासनाकडून विशेष अर्थसहाय्य प्राप्त होते. अनुदान योजना आहे. मनुष्यबळ विकास कार्यक्रमाद्वारे शेतकरी, अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. फळझाडे लागवड कार्यक्रमातंर्गत लाभार्थी निवड व अर्हता निर्धारित केली आहे. त्यासाठी काही निकष आहे. लाभधारक फळउत्पादकांना ४ हेक्टर पर्यंत योजनेचा लाभ घेता येतो. फळ महोत्सव आयोजित केल्यास अनुदान देण्यात येते.

फळउत्पादना संदर्भात पतधोरण व परतफेड पद्धतीचा विचार केला आहे. पतविषयक जे इतर पिकांकरिता सामान्य धोरण आहे तेच फळपिकांनाही लागू आहे. पतधोरणाच्या संदर्भात अनेक समित्यांनी, अर्थशास्त्रज्ञांनी कृषिक्षेत्राकरिता दीर्घकालीन वित्तीय मदतीची गरज आहे हे स्पष्ट केले. दांतवाला समितीने मूल्यधोरणानुसार वित्तीय मदतीची आवश्यकता आहे हे सुचविले तसेच ÷राष्ट्रीय कृषी आयोग' ने कृषी विकासासाठी अल्पकालीन, मध्यम व दीर्घकालीन कर्जाची आवश्यकता आहे हे स्पष्ट केले. विविध कारणांसाठी फळउत्पादकाला कर्ज उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

**शासकीय धोरणाचा आढावा :**

वर्तमान काळाच्या संदर्भात देशासमोर बरीच आव्हाने उभी ठाकली आहेत. ही आव्हाने लक्षात घेता गरिबी निर्मूलनाकरिता शेतीक्षेत्र एक शक्तीशाली साधन म्हणून जागतिक अधिकोषाने अहवाल प्रसिद्ध केला आहे. या संदर्भात मा. यशवंतराव चव्हाण यांनी दिलेले कृषीधोरणाचे तत्त्वज्ञान मार्गदर्शन ठरते.

शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेल्या जमिनीतून अधिकाधिक उत्पादन कसे घ्यायचे याकरिता एक उपाय म्हणून फळशेतीकडे लक्ष पुरवून व्यापारी शेतीच्या अनुषंगाने कृषी धोरणाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

महाराष्ट्र राज्यात १९८१ साली फलोत्पादन विभाग सुरू झाला. या विभागाकडून फळलागवडीसाठी शेतकऱ्यांना ÷एकात्मिक ग्रामीण विकास' योजनेप्रमाणे अनुदान मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे.

फळबागांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनांच्या वतीने मे १९९० मध्ये अनेक नव्या योजना, अनुदाने व सवलती जाहीर केल्या. दरवर्षी १०० कोटी रु. कर्जपुरवठा शेतकऱ्यांना उपलब्ध झाला. हळूहळू ही रक्कम वाढत आहे. २९ लक्ष हेक्टर पडीक जमिनीचा उपयोग फळबाग विकासासाठी व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहे.अकराव्या योजनेत फळबाग विकासासाठी रु. ३०० कोटी खर्च होणार आहे. राज्यशासन शेतकऱ्यांना फळरोपवाटिका, फळझाडे वाढविण्यासाठी अनुदान देणे याद्वारे फलोत्पादन विकासाला चालना देण्यासाठी कार्यक्रम राबवीत आहे. फलोत्पादन विकासाची सांगड १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी घालण्यात आली. याचा लाभ महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकरी घेत आहेत.

**निष्कर्ष:**

१) महाराष्ट्राचा ÷सुवर्ण महोत्सव' साजरा झाला. परंतु अद्यापही ८४ प्रतिशत जमीन पावसावरच अवलंबून आहे. अनियमित व अपुरा पाऊस यामुळे अन्नधान्य व इतर पिकांचे उत्पादन अत्यंत कमी आहे. त्यामुळे फळशेती हा योग्य पर्याय आहे.

२) ग्रामीण भागातील युवक कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. त्यांच्या भौतिक गरजा, दैनंदिन खर्च यामध्ये वाढ झाली आहे. या गरजांची पूर्तता करायची असेल तर बदल अपेक्षित आहे. तो बदल फळ उत्पादनाद्वारे करता येईल.

३) राज्यशासनाने फलोत्पादन योजना राबविण्याचे निश्चित केले त्याचा फायदा महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना होत आहे. विविध फळपिकांखालील क्षेत्रात वाढ झाली

४) पडीक जमिनीवर आंबा, सीताफळ, आवळा या फळ उत्पादनाला भरपूर वाव आहे. पडीक जमीन युवकांना ÷करार शेती' पद्धतीने दिल्यास रोजगाराची संधी उपलब्ध होऊन ÷जीवन निर्वाहाचे' साधन प्राप्त होईल.

५) केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या अनेक योजना फळ उत्पादकांपर्यंत पोहोचत नाहीत. गावपातळीवर छोटे शेतकरी, ासमात शेतकरी अनभिज्ञ असतात. तेव्हा शासकीय स्तरावर फळबाग विभागांनी फळ उत्पादनाला चालना देण्यासाठी शासकीय योजनांची व सवलतीची माहिती अत्यंत पारदर्शक व सविस्तर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. तेव्हा फळबाग लागवडीत वाढ होईल.

६) जिल्हास्तरावर निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी निर्यात संघटना निर्माण कराव्या. अचानक उद्‌भवलेल्या नैसर्गिक संकटांना सामोरे जाण्यासाठी शासकीय स्तरावर आजपर्यंत कोणतेही धोरण निश्चित केले गेले नाही किंवा कोणत्याही योजनांमध्ये उपायांचा समावेश नाही.

७) किंमत फैलाव कमी करण्यासाठी मध्यस्थांचे उच्चाटन करण्याकरिता दीर्घकालीन धोरणाची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :**


१) जहागिरदार दि.व्यं.(संपादित)(२०१२) : महाराष्ट्र : ५० *वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा.*

२) खांदेवाले श्रीनिवास व पाटील ज.फा.(२०१०)(संपादित) : *महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती : समस्या व उपाय.*

३) आवळे मनोज (२०१०) : *शेतकऱ्यांसाठी शासकीय अर्थसहाय्याच्या व अन्य विविध योजना.*

४) शिंदे जगन्नाथ (२००७) : *कृषी अर्थसहाय्य योजना,* गोदावरी पब्लीकेशन, नाशिक.

५) तोरडमल विश्वास व साळे यशवंत(२००८) : *फळबाग व फळरोपवाटिका व्यवस्थापन.*

६) सवदी ए.बी.(२०१०): *द मेगा स्टेट महाराष्ट्र,* निराली प्रकाशन.

७) Pujari A.G. (1997) : *Economics of Pomogranates & Ber fruits.*

८) चोरे वनिता (२०११) : *महाराष्ट्रातील फळ उत्पादनाची वाटचाल,* मराठी अर्थशास्त्र परिषद.

९) आमले ए.जे.(२००९): *शेतकरी दिनदर्शिका.*

१०) विशेषांक (२०१०) : *शेतकरी दिनदर्शिका फळबाग व भाजीपाला.*

११) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी* (२०१२) : अर्थ व सांख्यिकीय संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र.

# अस्मानी संकटः महाराष्ट्रातील शेती उत्पादन

**कल्पना व्ही.भागवत, धुळे,**
एस.एस.व्ही.पी.एस. बापुसाो.देवरे
अभियांत्रिकी महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ७५८८१०३३३८

**वर्षा कमलाकर नेहते, भालोद,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, जिल्हा जळगाव,
भ्रमणध्वनी: ७७९८५६७७९५

महाराष्ट्र हे देशातील प्रगत राज्यांपैकी एक राज्य आहे. राज्यामध्ये अजूनही शेतीचेच प्राबल्य जास्त आहे. राज्याच्या स्थूल उत्पादनामध्ये प्राथमिक क्षेत्राचा १३.५% वाटा असला तरी त्यामध्ये शेती क्षेत्राचे जवळपास १२% हिस्सा आहे. महाराष्ट्रामध्ये शेती क्षेत्राचा स्थूल राज्य उत्पादनातील हिस्सा घटत आलेला आहे. महाराष्ट्रात ३६ जिल्हे असून सहा विभाग आहे. महाराष्ट्रातील ४५.२% लोकसंख्या शहरात राहते. कृषि क्षेत्र हा आर्थिक विकासातील महत्वाचा भाग आहे. आजपर्यंतच्या आर्थिक विकासात कृषिक्षेत्राची उत्पादकता, उत्पादन, अन्नधान्याचा पुरवठा, निर्यात, कच्चामाल, मनुष्यबळाचा पुरवठा केला जातो. ५५.४४% लोकसंख्या शेतीवर आधारित आहे. पण शेतीचा राज्य उत्पन्नातील हिस्सा सातत्याने घटत आहे. २०११-१२ च्या आकडेवारी नुसार चालू किंमतीनुसार देशांतर्गत उत्पन्नाची सरासरी रु.११,९९,५४८ कोटी आहे. औद्योगिक क्षेत्र आणि सेवा क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ८७% आहे. तर शेती आणि शेती व्यतिरिक्त राष्ट्रीय उत्पन्नातील भाग १३% आहे.

**संशोधन पध्दती:**

१) प्राथमिक माहिती - सदर शोध निबंधासाठी, गारपिटग्रस्त भागांचा प्रत्यक्ष पहाणीनुसार अभ्यास करण्यात आला. व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्यात व त्या मुलाखतीनुसारच संशोधकाने मते मांडली.

संशोधकाने प्रस्तुत शोध निबंधामध्ये नमुना निवड पध्दतीने निष्कर्ष संकलित केले आहेत. त्यात सांख्यिकीय मध्य, ज्ञान निर्देशक, उत्पादकता

निर्देशक व प्रत्यक्षात शेतकऱ्यांची असणारी मते यांचा अभ्यास केला आहे.

धुळे जिल्ह्यातील सुक्ष्म विश्लेषण पध्दती जिल्हयातील सात गावांचा निवड पध्दतीने प्रत्येकी २० शेतकऱ्यांच्या अशा एकुण १४० शेतकऱ्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत व त्यानुसार निष्कर्ष मांडले आहेत.

२) दुय्यम माहिती - स्रोताचा वापर करण्यात आला. त्यात सांख्यिकी माहिती, अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पहाणी, सांख्यिकी गोषवारा, संदर्भ पुस्तके, वेबसाईट, योजना, अर्थसंवाद, इ.पी.डब्ल्यू मासिक, वर्तमानपत्रे इ.चा वापर करण्यात आला.

**महाराष्ट्रातील शेतीची सद्यस्थिती :**

महाराष्ट्रात जमिनीचे वर्गीकरण पाहिल्यास असे आढळून येते की, राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३.८ लाख चौ.कि.मी. असून त्यापैकी निव्वळ कृषि खालील जमीन १.७७ लाख चौ.कि.मी. म्हणजे ५७.५०% होते, १७.३% जलसिंचना खालील दिसून येते. महाराष्ट्र राज्यात ८२.७% एवढे शेतीखालील क्षेत्र प्रत्यक्षात पावसावर अवलंबून आहे. फक्त १/३ क्षेत्र पर्जन्य छायेखालील क्षेत्र आहे. कृषि क्षेत्राचा वाटा १२% एवढा आहे. शेती विकासदर हा नेहमीच कमी राहिलेला आहे. महाराष्ट्रात उत्पादकता वृद्धी कार्यक्रम राबविण्यात आला. परिणामी कृषि उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. पिकांखालील क्षेत्रही वाढले आहे. रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला.

**नविन आर्थिक धोरणानंतरचा शेतीचा विकास :**

पिकाखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पन्न यातील वार्षिक चक्रीय वृद्धीदर मोजण्यात आला आहे. या कालखंडातील विविध पिकांचा अभ्यास केल्यास ऊस, सोयाबिन, हरभरा, तेलबिया, कापूस पिकांचे उत्पादन चांगल्या पद्धतीने वाढल्याचे आढळून येते. एकूण कालखंडामध्ये अन्नधान्य पिकांपेक्षा बिगर अन्नधान्य पिकांचे उत्पादन वाढल्याचे दिसते.

पिकाखालील क्षेत्राच्याबाबतीत तेलबिया, ऊस, सोयाबीन, हरभरा, कापूस, सूर्यफुल या पिकाखालील क्षेत्र वाढल्याचे दिसून येते. या काळात सोयाबीन, ऊस, एकुण डाळी, हरभरा अणि तूर पिकाखालील क्षेत्र वाढल्याचे दिसते.

विशेष म्हणजे अन्नधान्यापेक्षा बिगर अन्नधान्याखालील नगदी पिके क्षेत्र वाढल्याचे दिसते. कारण अन्नधान्य पिकांपासून मिळणाऱ्या फायद्यापेक्षा नगदी पिकांपासून मिळणारा आर्थिक फायदा जास्त आहे.

याच दरम्यान उत्पादकतच्या बाबतीत ÷ऊस' उत्पादकता सर्वाधिक वाढल्याचे दिसते. त्याखालोखाल सोयाबीन, तेलबिया, बाजरी, गहू आणि डाळींचे उत्पादनही वाढल्याचे दिसते.

ऊसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. तसेच भुईमुग, तेलबिया, सोयाबीन, हरभरा, कापूस, बाजरी यांचे उतरत्या वृद्धीदराने उत्पादन वाढले. उत्पादकतेमध्ये तेलबिया सूर्यफूल आणि तूर वगळता इतर कोणत्याच पिकांची वृद्धी जाणवली नाही.

पिकाखालीलक्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकतेचा जर विचार केला तर ऊस आणि सोयाबिन वगळता एकूण २० ते ३० वर्षांच्या अभ्यासात ऊस आणि सोयाबीन या पिकांच्या

तक्ता क्र.१

पिकांच्या रचनेनुसार उत्पन्न, उत्पादन आणि गारपिट नुकसान दर्शविणारा तक्ता :

(लाख मेट्रीक टन)

| पिक | उत्पादन २०११-१२ | उत्पादन २०१२-१३ | गारपीट नुकसान २०१३-२०१४ |
|---|---|---|---|
| कडधान्ये (लाख मेट्रीक टन) | १०४.१९ | ८२.५५ | २१२.२५ |
| डाळी (लाख मेट्रीक टन) | २३.११ | २१.८४ | २.४० |
| तेलबिया (लाख मेट्रीक टन) | ४४.९२ | ५१.८६ | १०.८६ |
| कापूस (लाख गाठी, १७०कि.प्रतीनग) | ६८.२० | ६९.३५ | २०.१२ |
| ऊस (लाख मेट्रीक टन) | ८९४.५६ | ५९६.८९ | २१२.१० |

*स्रोत: इंडियन इकोनॉमी २०११-१३ मिश्रा, पुरी व प्रत्यक्ष पाहणी १४ फेब्रु. ते १८ मार्च २०१४*

बाबतीत अस्थिरता मोठ्या प्रमाणात जाणवेल. पिकाखालील क्षेत्र अन्नधान्य पिकांऐवजी नगदी पिके घेत आहे. तर दुसऱ्याबाजूस घटत्या कृषि विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष होत चालले आहे. पायाभूत शेती व्यवसायाकडे इतर क्षेत्राप्रमाणे कमी लक्ष दिले जाते. शेतकरी मोठ्या किमती शेतीसाठी मिळतात म्हणून सहजगत्या विकतात ही सुद्धा महाराष्ट्राच्या दृष्टीने धोक्याचे चिन्ह आहे.

**महाराष्ट्राच्या कृषि क्षेत्रामध्ये आदानांचा वापर :**

कृषि विकासात आदानांचा वापर ही महत्त्वाची बाब आहे. कारण आदानाच्या वापराने पिकांची उत्पादकता आणि उत्पादन वाढते. परिणामी कृषि विकासास चालना मिळते. उदा.बी-बियाणे, खते, जलसिंचन, यंत्रे अवजारे व संशोधन व विकास इ. वापराने कृषि क्षेत्रातील उत्पादन, उत्पादकता इ. मोठ्या प्रमाणात वाढ होते. परन्तु महाराष्ट्रात या वर्षी नैसर्गिक कारणांमुळे कृषि क्षेत्रावर परिणाम झाला. महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यांना कमी अधिक प्रमाणात गारपिटीचा तडाका बसला आहे. सर्वाधिक सोलापुर, धुळे, जळगांव, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, वाशिम, बुलढाणा, अकोला व नाशिक या जिल्ह्यांना बसला आहे. मुंबईत ८ लाख हेक्टर रब्बी पिकांचा नाश झाला. चाळीस हजार हेक्टर वरील पीक गारपीटीने नष्ट झाले. त्यात जवळजवळ १२० हजार कोटी रु.चे नुकसान झाले. पुणे येथे गहु, द्राक्षे, भाजीपाला, कडधान्ये इ. तेरा हजार कोटी रु.चे नुकसान झाले. वीस हजार टन भेंडी, २० लाख मेट्रीक टन गहू, तीन लाख मेट्रीक टन मसूर तसेच १.५ लाख मेट्रीक टन इतर पिकांचा समावेश आहे.

वरील कोष्टकात २०११-१२ व २०१२-१३ मधील कृषी क्षेत्रातील उत्पादन दर्शविले आहे. तसेच गारपिटीमुळे झालेले नुकसानही दर्शविले आहे.

कृषि क्षेत्राच्या बाबतीत एकूण २०११-१२ मध्ये १५५ लाख मेट्रीकटन दोन वर्षापासून कापूस, तेलबिया इ. वाढ झाली. परंतू कडधान्ये, डाळी, ऊस यांचे उत्पादन कमी झाले.

कृषि उत्पन्नात ÷कांदे' या पिकाचे उत्पादन एकूण सर्व कृषि उत्पादनात जास्त आहे. ते जवळजवळ ८.७७ मेट्रीक टन आहे.

फळांच्या बाबतीत महाराष्ट्रात ÷द्राक्षे' या फळांचे सर्वाधिक उत्पन्न होते. त्याचे खालोखाल, डाळींब, मोसंबी व पेरू तसेच केळी आणि चिकू ही फळे दिसतात. त्यापासून १०.५३ मिलीयन मेट्रीक टन उत्पादन असून गारपिटीने सर्व द्राक्ष फळांच्या बाबतीत गारपिटीने सर्व द्राक्ष पिक नष्ट झाले. डाळींबे, मोसंबी, संत्रे, पेरू इ.चे उत्पन्न अतिशय कमी झाले. परंतु अचानक उद्भवलेल्या अस्मानी संकटामुळे गारपिट झाली.

तर अशी गारपीट म्हणजे काय? त्याचा परामर्श घेवू यां× गारपीट ही एक नैसर्गिक घटना आहे. पावसासोबत छोट्या आकाराचे बर्फाचे खडे कोसळणे म्हणजे गारपीट होय.

**गारपीटीच्या संदर्भ/नोंदी :**

गारपीट ही पावसाप्रमाणे नियमित पडत नाही. ब्रिटीशकालीन नोंदीनुसार १९०८मध्ये साताऱ्याजवळ कोंढवा गावाजवळ नारळाएवढ्या आकाराच्या गारा पडल्याची घटना घडली. १९८२ मध्ये पुणे जिल्ह्याच्या पूर्व भागात शिरूर, शिक्रापूर, सासवड, बारामती परिसरात गारपीट झाल्याच्या नोंदी आहेत. त्यानंतर २००५मध्ये बारामती, २००७मध्ये रावेर व जळगाव, २०१० मध्ये माण, खटावमध्ये गारपीट झाल्याच्या नोंदी आहेत. मात्र नुकतीच झालेली गारपीट ही दुर्मिळ नैसर्गिक घटना आहे.

**गारपीटीचे कारणे :**

दरवर्षी जानेवारी ते मार्चच्या दरम्यान पश्चिमी चक्रावात असतो. मात्र त्याला पोषक वातावरण मिळत नसल्याने त्याचा परिणाम हवामानावर होत नाही. यंदा मात्र पश्चिमी चक्रावाताचे प्रभाव अमर्याद होते. त्यातच फेब्रुवारी महिन्यात हिंदी महासागरामध्ये पाण्याचे पृष्ठभागाचे तापमान २०८ ते २०९ केलिव्हिन्सच्या दरम्यान असणारे तापमान १८ फेब्रुवारी २०१४च्या दरम्यान ३०४ केलव्हिन्सपर्यन्त वाढले होते. त्यामुळे दक्षिण भारतालगत हिंदी महासागरामध्ये बाष्पयुक्त द्रोणीय स्थिती निर्माण झाली. पोषक स्थिती निर्माण झाली. बाष्पयुक्त गरम वाऱ्यांचे पोषक वातावरण मिळाले. हे ढग जमिनीपासून एक ते दीड किलोमीटर अन्तरावर आले. तसेच या बाष्पयुक्त ढगांना थंड वाऱ्याची साथ मिळाल्याने बाष्पाचे रूपांतर गारांमध्ये झाले. या गारा गुरूत्वाकर्षणाने जमिनीवर आल्या.

गारा ह्या क्युमिलिनिंबस् प्रकारच्या ढगांमध्ये गारांची निर्मिती होते. बर्फाचे कण आकाशात वाऱ्याच्या किंवा वादळाच्या वेगामुळे वर-खाली होत राहतात. त्यामध्ये विविध पाण्याच्या कणांशी त्यांची टक्कर होत आकारात वाढ होते. त्यामुळे गारांचा आकार हा टाचणीच्या टोकापासून ते चेंडूच्या आकारापर्यन्त कितीही असू शकतो. सर्वसाधारणपणे ०.५ इंच आकारापेक्षा लहान गारांचा पाऊस होतो. मात्र ०.४५ किलो आकारापर्यन्तच्या गारांचा पाऊस पडल्याची उदाहरणे जगभर आहेत.

**गारांचा आकार व वेग :**

गारांचा आकार सुरवातीला लहान असे बर्फाचे खडे पावसाचे थेंब गोठल्यामुळे तयार होतात. वादळामुळे हे बर्फाचे लहान थेंब आकाशात पुन्हा वर जातात. खाली येतात, पुन्हा वर जातात. त्यामुळे त्यात अनेक पावसाचे थेंब मिसळत जातात. बर्फाच्या कणांमध्ये वाढ होऊन

त्याचा आकार वाढत जातो. ही वाढ दोन प्रकारची आहे.

ओली वाढ : ज्या ठिकाणी हवेचे तापमान गोठणीबिंदूच्या खाली असते त्या ठिकाणी बर्फाचे कण पावसातील पाण्याच्या कणावर आदळत जातात. मात्र त्याचे रूपांतर त्वरित बर्फामध्ये होत नाही. द्रव स्वरूपातील पाणी सावकाशपणे गोठते. त्यामुळे हवेचे बुडबुडे त्यातून बाहेर पडून स्वच्छ असे बर्फाचे खडे तयार होतात.

कोरडी वाढ : ज्यावेळी हवेतील तापमान हे गोठणबिंदूच्या खूप खाली असते त्यावेळी पाण्याचे कण बर्फाच्या कणांवर आदळताच त्वरित गोठतात. ही गोठण प्रक्रिया त्वरित होत असल्याने त्यामध्ये हवेचे बुडबुडे तसेच राहातात. त्यामुळे या प्रकाराच्या तयार होणाऱ्या गारा गोठण बिंदूत तयार होण्याचे प्रमाण कमी असते. १८ मार्च रोजी अकरा वाजता सुरू झालेपासून सलग पडत होता. त्यामुळे मुंबई शहरात मनुष्यहानी व वित्त हानी झाली. एकाच दिवसात ९४०मि.मी. पावसाची नोंद झाली. सन २००६मध्ये महापुराचे पाणी सांगली शहरात घुसले. सन २००७ मध्ये पंचगंगेचे पाणी नदी किनाऱ्याच्या भोवतालच्या शेतात घुसले आणि पिकांचे नुकसान झाले. सन २००८मध्ये ÷होला' वादळामुळे पावसाच्या ढगाला अरबी समुद्रात दाबले गेले. त्यामुळे जून आणि जुलै महिन्यात पावसात मोठाखंड पडला. पावसाच्या अभावामुळे पेरण्या वेळेत होवू शकल्या नाहीत. २००८मध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये अवकाळी पावसाने द्राक्ष व इतर पिकांचे नुकसानही झाले.

महाराष्ट्रात जून आणि जुलै महिन्यात पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले. सन २००९ मध्ये ÷फियान' वादळाने कोकणपट्टी व इतर जवळपासच्या परिसराचे नुकसान झाले. कोकणातील आंबा पिकाचेही त्याने प्रचंड नुकसान झाले. सन २०११ मध्ये ÷लैला' वादळाची निर्मिती झाली. त्यामुळे मान्सूनवर परिणाम झाला आणि सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. सन २०१२ मध्ये महाराष्ट्राला भीषण दुष्काळाला तोंड द्यावे लागले. पाणी टंचाई व चाराटंचाईची समस्या निर्माण होवून महाराष्ट्र आपत्तीग्रस्त ठरला. शासनाला कॅटल कॅम्प आयोजित करावा लागला. सन २०१३ मध्ये प्रथम १२ ऑक्टोबर रोजी ÷फायलीन' वादळ आले. त्यानंतर ÷महासेन' वादळ आले. २२ नोव्हेंबरला ÷हेलन' वादळाची निर्मिती झाली. २७ नोव्हेंबरला ÷लव्हेर' वादळ आले तर डिसेंबर महिन्यात ÷मडी' वादळ आले. ही सर्व वादळे पूर्व किनारपट्टीवर थडकली.

विदर्भाच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या शेतीचा विचार करता असे दिसून येते की गहू, हरभरा, ज्वारी, मका, सोयाबीन, कापूस, फलोत्पादन क्षेत्राला हानी पोहोचली. १५ दिवस हजारो हेक्टर शेती पाण्याखाली होती. त्यामुळे मार्च महिन्यातील रब्बी पिके हाती आलीच नाही. एकवेळा नाहीतर गारपिटीचा चार वेळा भडिमार झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान व मानसिक, आर्थिक हानी झाली. नुकसान इतके झाले की अजूनही सरकारी आकडे येवू शकले नाही. त्यात विदर्भात साडेचार लाख हेक्टर, यवतमाळ जिल्ह्यातील ८९हजार हेक्टर, अमरावती जिल्ह्यात ६५हजार हेक्टर, बुलडाणा जिल्ह्यात १ लाख १४ हजार हेक्टर पिकांचा समावेश आहे. अमरावतीत सुमारे २५ हजार हेक्टरमधील संत्रापिकांचे नुकसान झाले. संत्रापिकांची हानीच

साडेपाचशे कोटी रुपयांची आहे. नागपूर जिल्ह्यात काटोल, नरखेडमधील संत्रा उत्पादकांचे नुकसान झाले. गारपिटीने मनुष्यहानी झाली. पाच जणांचा मृत्यू व ४२ जण जखमी झाले. जनावरे, पशुपक्ष्यांचाही जीव गेला.

उत्तर महाराष्ट्र - उत्तर महाराष्ट्राचा परामर्श घेतल्यास असे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यात स्ट्रॉबेरीची लागवड करुन आर्थिक उन्नतीचा मार्ग स्विकारला होता.

सांगली, लातूर, नाशिक, नगर, जिल्ह्यांत वीस हेक्टरहून अधिक क्षेत्रांवरील द्राक्षबागांना गारपिटीचा तडाखा बसला. अनुभवाच्या निकषांनुसार डाळिंबाच्या बागा फुलवल्या आहेत. नुकसानग्रस्तामध्ये केळी, आंबा, संत्रे, पपई, पेरु इ.समावेश आहे. कृषि अहवालानुसार २८ जिल्हे आपत्तीग्रस्त आहे.

पुणे जिल्हा - ९ मार्च रोजी बारामती, इंदापूर तालुक्यात गारपीट व वादळी पाऊस झाला. बारामती तालुक्यात ६ ते ७ हजार हेक्टर, इंदापूर तालुक्यात १३ ते १५ हजार हेक्टर शेतीतील उभ्या पिकांचा नाश केला व फळबागांचे नुकसान झाले. यापूर्वीची गार लहान आकाराची होती. परंतु या वर्षीच्या गारा एक किलो वजनापासून ते २५ किलो वजनाची आहे. या नुकसानीचा प्राथमिक अंदाज ५०० कोटींवर व्यक्त केला होता. इंदापूर गावातील ५७, तर बारामती तालुक्यातील ५६ गावांमधील गव्हाची, उसाची पिकेही जमिनदोस्त झाली.

'बोरी' हे गाव द्राक्ष उत्पादनासाठी ओळखले जाते त्यांचेही १२०० एकरांहून अधिक क्षेत्रात द्राक्षबागा होत्या.

'वरकुटे' या गावाच्या परिसरात दीड ते दोन हजार एकर डाळिंबाचे क्षेत्र आहे. याखेरीज याच तालुक्यातील शेळगांव, कनबनवाडी, धरणेवाडी, अंथुर्णे हे गावे फळबागांसाठी प्रसिध्द होवू लागली. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षापर्यंत या गावातील शेतकरी माळरान व पडीक जमिनीकडे लक्ष देत नव्हते. मात्र त्यातून लाखो रुपये उत्पन्न मिळू लागले. बारामती तालुक्यातही काटेवाडी, कन्हेरी, झारगडवाडी, डोळेवाडी, पिंपळी, माळेगाव, पणदरे, कोऱ्हाळे या भागात फळबागायती व आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त व्यावसायिक शेती मधल्या काळात वाढली होती. दोन्ही तालुक्यांत ५०० कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती जेव्हा घेतल्या तेव्हा त्यांत प्रामुख्याने निमडाळे, साक्री, न्योहाळोद, दोंडाईचा, कोंडाणेबारी, वार कुंडाणे, फागणे येथील शेतकऱ्यांना मिळणारे उत्पन्न दोन दिवसानंतर (होळी नंतर) गहू कापणी करु परंतु अचानक अनैसर्गिक स्थिती उद्‌भवली. त्यात काही शेतकऱ्यांची तर १००% तर काहींच्या बाबतीत गव्हाचे पिक संपूर्ण झोपून गेले. त्यावर परत तेच उगणे व नष्ट होण्याची स्थिती निर्माण झाली. त्यात मानसिक स्थिती, आर्थिक स्थितीचा अंदाज लावणेही कठीण होते. त्यात गव्हाचे ९०%, बाजरी १००%, कापूस, द्राक्षे १००%, डाळींब, सोयाबीन ८०% नुकसान झाले.

निष्कर्ष - गारपिटीने सर्वत्र शेती क्षेत्राचे नुकसान झाले. कांदा उत्पादनाला ४०%, घाटी, नाशिक, बीड या जिल्ह्यांमध्ये ७४ हजार हेक्टर, ज्वारी, हरभरा, गहू, टरबूज, खरबूज आणि द्राक्ष बागांचे ८० टक्के नुकसान झाले.

महाराष्ट्र कांदा लागवड स्थिती ३,४२,००० मेट्रीक

टन तर जानेवारीत फक्त १,२१,००० इतकेच झाले. बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांचे गारपिटीने ७४% नुकसान झाले. उत्पादनात घट मोठ्या प्रमाणात झाली. शारिरीक, मानसिक, आर्थिक स्थिती कोलमडली. परंतु शेतकऱ्यांना काही सामाजिक संस्थांनी दिलासाही दिला. उदा.साई समितीने धुळे जिल्ह्यात गारपिटग्रस्तांना 'अमृत कलश २०१४' या नावाने सात गावातील शेतकऱ्यांना ४० लाख रुपयांचे किराणा प्रत्येक कुटूंबास दिला. त्यात काडीपेटी, २० किलो गहू, १० किलो तांदुळ, ५ किलो साखर, ३ पॅक तेल, गूळ, तीखट, मीठ, हळद, डाळी, प्रत्येकी १ किलो याप्रमाणे दिले. सरकारच्या मदती तर मिळेतीलच परंतू अशा संस्था शेतकऱ्यांचे मनोबल वाढवितात व त्वरित धावून येतात.

भारतातील गारपीटग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्राने ८५६ कोटी रु. मदत जाहीर केली, विजबिल माफ करण्यात आले. पिक कर्जावरील व्याज माफ करण्यात आले. फळबागांच्या पुनरुज्जीवनासाठी सरकारने २०० कोटी रु. आणि ३५२ कोटी रु.ची मदत जाहीर केली.

**उपाययोजना:**

१) गारपिटीचा अंदाज देणारे मॉडेल हवे.
२) तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रशिक्षण देणे.
३) आपत्तीग्रस्तांसाठी धोरणाची आखणी करणे.
४) आपत्तीग्रस्त धोरणासाठी गावकऱ्यांना समाविष्ट करणे.
५) आपत्तीग्रस्तांसाठी शेतीचे निरीक्षण करुन त्यांना मोबदला त्वरीत मिळावा.
६) सरकारी यंत्रणेबरोबरच सामाजिक संस्थांनी मदत द्यावी.
७) 'ॲटिहेल' नेटचा वापर करावा.
८) 'ॲटिहेल'मुळे गारांना झेलणे व त्यामुळे पिकांचे नुकसान कमी होईल.
९) आधुनिक तंत्रामुळे नविन नेटचा वापर करण्यात आला आहे. ती नेट गारा, पशुपक्षी, सनस्ट्रोक, वारा इ. विविध कारणांपासून संरक्षण करेल.
१०) हवामानाच्या अंदाजाच्या बाबतीत वेळोवेळी येणाऱ्या अस्मानी संकटांच्या सुचना देणे व त्यावरील त्वरीत उपायांची अंमलबजावणी करणे.
११) सामाजिक संस्थांनीही मदत करणे.

**संदर्भ सूची:**


१) द्राक्ष बागायती संघ २-१३, २०१४
२) www.weather.in.com
३) *ॲग्रोवन* २०१४ जानेवारी, फेब्रुवारी, मार्च
४) लोकमत, दिव्यमराठी विविध लेख - २४ फेब्रुवारी २०१४
५) *महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २०११, २०१२, २०१३* (पृष्ठ क्र.११५, २१५, २२७)
६) *इंडियन इकोनॉमी २०११ ते १३* मिश्रा, पुरी
७) प्रत्यक्षात घेतलेल्या मुलाखती १४ फेब्रुवारी ते २८ मार्च
८) धुळे जिल्ह्याचे आर्थिक समालोचन पृ.१५ ते ३०
९) *समर्थ धुळे* २०२० खंड २, पृ.३५ ते ४५

# महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक-स्वरुप व सद्यःस्थिती

आर. के. नाळे, सरूड,
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिव-शाहू महाविद्यालय, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी -९४२११००४२७

मानवी विकास निर्देशांक हा अंक जगातील देशांचे अतिविकसित (अतिउच्च मानवी विकास), विकसित (उच्च मानवी विकास), विकसनशील (मध्यम मानवी विकास) व अविकसित (कमी मानवी विकास) असे वर्गीकरण करण्यासाठी वापरला जातो. जगात सर्वच देशात आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. आर्थिक विकासाचे मापन स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product-= GNP) या निकषाच्या आधारे केले जाते. अलीकडील काळात आर्थिक विकासाचे मापन विकासाचे व्यापक विस्तारीत निर्देशांक तयार करून केले जातात. ÷मानवी विकास निर्देशांक' (Human Development Index = HDI) ही संकल्पना संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाद्वारे (United Nations Development Programme = UNDP) मांडण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९० मध्ये पहिला मानवी विकास अहवाल प्रकाशित केला. मानवी विकास निर्देशांकाची संकल्पना मांडण्याचे श्रेय १९९८ चे नोबेल पारितोषिक विजेते व भारतीय कल्याणकारी अर्थशास्त्राचे जनक डॉ. अमर्त्य सेन आणि अर्थतज्ज्ञ मेहबूब-उल-हक यांच्याकडे जाते.

डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, ÷शिक्षण आणि मानवी भांडवलाचा विकास यांचेतील सहसंबंध धनात्मक असतो. मानवी साधन संपत्तीचा विकास शिक्षणामुळे होतो आणि मानवी साधन संपत्तीच्या विकासामुळे देशाच्या आर्थिक विकासास चालना मिळते. म्हणजेच आर्थिक विकास हे मानवी विकासाचे फल आहे. मानवी भांडवलाचा विकास हा शिक्षणाच्या गुणात्मक प्रसारावर अवलंबून असतो.

डॉ. मेहबूब-उल-हक यांच्या मते, ÷आर्थिक वृद्धी आणि मानवी विकास यातील मूलभूत फरक म्हणजे आर्थिक वृद्धीचा सहसंबंध फक्त उत्पन्नाच्या वाढीशी आहे. मानवी विकास संबंध मात्र मानवी जीवनाशी निगडीत आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घटक जे मानवी जीवनाची गुणवत्ता वाढवते.' प्रस्तुत शोध

निबंधात शाहूवाडी तालुक्यातील मानवी विकास निर्देशांक स्पष्ट करणेचा प्रयत्न केला आहे.

**मानवी विकास म्हणजे काय?** (What is Human Development?):

मानवी विकास म्हणजे, ÷÷लोकांना उपलब्ध असलेल्या निवड पर्यायाचा विस्तार करणेची प्रक्रिया होय'' यापैकी सर्वात महत्वाच्या बाबी म्हणजे जेणेकरून व्यक्तींना दीर्घायुष्य व निरोगी जीवन शिक्षण व राहणीमान आणि राजकीय स्वातंत्र्य लाभेल अशा बाबी होत. या पार्श्वभूमीवर मानवी समाजाचा विकास म्हणजे त्या समाजाचा सर्वांगीण विकास होय. भारतातील विविध राज्ये मानवी विकास अहवाल तयार करतात. महाराष्ट्र राज्याचा मानवी विकास अहवाल २००२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला.

**मानवी विकास निर्देशांक** (Human Development Index):

आर्थिक विकास मोजण्यासाठी मानवी विकास निर्देशांकाचा वापर केला जातो. समाजाची वास्तविक स्थिती ही निर्देशांकाच्या साहाय्याने प्रतिबिंबीत होते.

कारणे :

१) मानवी विकास निर्देशांकात उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, बेकारी, दारिद्रय, पाणीपुरवठा इत्यादीचे मापन केले जाते.

२) निर्देशांकाने सरकारचे लक्ष विकास कार्याकडे वेधून घेतले जाते.

३) निर्देशांकाच्या साहाय्याने एखाद्या देशाचे वास्तव चित्र समजते.

४) निर्देशांकाचे वाढीव मूल्य देशाची प्रगती दर्शविते.

५) मानवी विकास निर्देशांकात संख्यात्मक घटकाबरोबर गुणात्मक घटकावर ही अधिक लक्ष दिले जाते.

**मानवी विकास निर्देशांकाचे महत्व :** (Importance of Human Development Index):

मानवी विकासातील निर्देशांकाची भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

१) प्रत्येकास दीर्घायुष्य मिळणे, ज्ञान मिळविणे, रोजगारसंधी निर्माण करणे इत्यादीचा अवलंब आवश्यक वाटतो.

२) मानवी आयुर्मर्यादा, प्रौढ साक्षरता, शिक्षण, आरोग्य इत्यादीचे मापन मानवी निर्देशांकाच्या साहाय्याने करता येते.

३) मानवी विकास निर्देशांकामुळे आर्थिक व सामाजिक प्रगती मोजणे शक्य होते.

**महाराष्ट्र राज्य** (Maharashtra State):

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्रात ३६ जिल्हे असून प्रशासकीय प्रयोजनासाठी कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर हे सहा महसुली विभाग निर्माण केले आहेत. महाराष्ट्राचा अक्षवृत्तीय विस्तार १५.४४° उत्तर ते २२.६° उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७२.३६° पूर्व ते ८०.५४° असा आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३.०८ लक्ष चौ. कि.मी. असून महाराष्ट्राने देशाचा ९.३६% प्रदेश व्यापलेला आहे. महाराष्ट्रात एकूण ४३,७११ खेडी असून ३७८ शहरे आहेत. स्थानिक प्रशासनासाठी ३३ जिल्हा परिषदा, ३५५ पंचायत समित्या, २७९९३ ग्रामपायती असून २३ महापालिका व २२२ नगरपालिका आहेत. महाराष्ट्रात लोकसभा सदस्यांची संख्या ४८ तर विधानसभा सदस्यांची संख्या २८८ इतकी आहे.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेती आधारीत अर्थव्यवस्था असली तरी औद्योगिकरण व नागरीकीकरण ही मोठ्या प्रमाणात झाले आहे. तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका, कापूस, ऊस, तेलबिया, फळे, फुले, कडधान्ये, भाजीपाला इत्यादी विविध प्रकारचे उत्पादन महाराष्ट्रात होत आहे. सद्या भारतात सर्वाधिक ऊस उत्पादन घेणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचे नाव घेतले जाते. महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र व पर्यटन केंद्र अनेक असल्याने संबंधिताची गर्दी वाढताना दिसून येत आहे. महाराष्ट्रात मोठ्या तलावांची संख्या मोठी असून लोहमार्ग, रस्ते, बँका, शिक्षण, आरोग्य विषयक सोयी यामध्ये वाढ होत आहे. तसेच वडा-पाव, मिरचीभजी, खरडा-भाकर, पांढरा-तांबडा रस्सा ही येथील जेवणाची खासियत आहे.

## मानवी विकास निर्देशांकाचे स्वरूप :

मानवी विकास निर्देशांकामध्ये लोकसंख्या, दरडोई उत्पन्न, सरासरी आयुर्मान, अर्भक आणि बालमृत्यूचे प्रमाण, स्त्री-पुरूष साक्षरता दर, स्त्री-पुरूष प्रमाण, स्त्रीयांचा सामाजिक दर्जा, शिक्षण आणि आरोग्य विषयक सुविधा व सुधारणा, सामाजिक स्वास्थ इत्यादी घटकांचा समावेश केला जातो. या विविध घटकांचे भारान्वित निर्देशांक विचारात घेवून मानवी विकास निर्देशांक निश्चित केला जातो.

मानवी विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी मानव आणि विकासनिती यांचा समन्वय साधता आला पाहिजे. देशातील उपलब्ध साधन संपत्ती आणि लोकांच्या गरजा यांचा मेळ घालताना आर्थिक विकास प्रक्रियेत मानवाला केंद्रबिंदू मानले पाहिजे. मानवी गरजा अमर्यादित आहेत. त्या मर्यादित करणे , वाढती लोकसंख्या नियंत्रीत करणे व गुणवत्ता वाढविणे, उपलब्ध नैसर्गिक साधनांचा पर्याप्त व कार्यक्षमरित्या वापर होईल अशा धोरणांचा अवलंब करणे, ठरविलेल्या धोरणांची प्रामाणिकपणे अमलबजावणी करणे इत्यादीमुळे मानवी विकास निर्देशांकात सुधारणा घडवून आणणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्रातील मानवी विकास अहवालात राज्यातील व जिल्ह्यातील संयुक्त राष्ट्रांचा विकास कार्यक्रमाच्या पद्धतीनुसार मानवी विकास निर्देशांकाचा हिशेब करण्यात आला आहे. प्रा. सायमन कुझनेटस् आणि निकोलस कॅल्डॉर या अर्थतज्ञांच्या मते, ÷मानवी विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी प्रत्येक राष्ट्रांने लोकांच्या राहणीमान व जीवनमानात सुधारणा करणे, मानवी साधन संपतीची गुणवत्ता वाढविणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे पुनर्वाटप करणे, मानवी भांडवल निर्मितीवर भर देणे, मानवी भांडवलाची गुंतवणूक वाढविणे, श्रमप्रधान उत्पादन तंत्राच्या वापरावर भर देणे इत्यादी बाबीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

## महाराष्ट्रातील मानवी विकास निर्देशांकाची सद्यःस्थिती:

मानवी विकास अहवाल २००९ नुसार जगातील १८२ देशांच्या मानवी निर्देशांकाकडे पाहिल्यास सर्वात जास्त मानवी विकास निर्देशांक नॉर्वे या देशाचा असून तो ०.९७१ इतका आहे. तर सर्वात कमी नायजेरिया या देशाचा असून तो ०.३४० इतका आहे. भारताचा मानवी विकास निर्देशांक ०.५५४ इतका आहे. १८७ राष्ट्राच्या निर्देशांकात भारताचा १३४ वा क्रमांक आहे.

महाराष्ट्र राज्याचा मानवी विकास निर्देशांक १९८१ मध्ये ०.३३६, १९९१ मध्ये ०.४५२,

२००१ मध्ये ०.५३७ तर २०११ मध्ये तो ०.५७२ पर्यंत वाढला आहे. मानवी विकास निर्देशांक भारतात केरळ (०.७९०), दिल्ली (०.७५०), हिमाचल प्रदेश (०.६५२) , गोवा (०.६१७), पंजाब (०.६०५), आसाम (०.५७३), महाराष्ट्र (०.५७२) असा क्रम लागतो. महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोल असल्याने प्रत्येक विभागात मानवी विकास निर्देशांक वेगवेगळा आढळून येतो. महाराष्ट्र हे प्रमुख घटक राज्य असल्याने महाराष्ट्रात मानवी विकास निर्देशांक जास्त आहे. मात्र तो राज्यात सर्वत्र असमान आहे. म्हणजेच मानवी विकास निर्देशांक काही भागात जास्त तर काही भागात कमी आहे.

पुढील तक्ता क्र. १ मध्ये महाराष्ट्रातील विभागनिहाय मानवी विकास निर्देशांक स्पष्ट केला आहे.

तक्ता क्र.१

| विभाग | मानवी विकास निर्देशांक |
|---|---|
| कोकण | ०.७२३ |
| नाशिक | ०.६३८ |
| पुणे | ०.६९६ |
| औरंगाबाद | ०.६१३ |
| अमरावती | ०.६३६ |
| नागपूर | ०.६४६ |

*(स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-१३)*

तक्ता क्र.१ वरून राज्यातील सहा विभागातील मानवी विकास निर्देशांक स्पष्ट केला आहे. कोकण विभागाचा मानवी विकास निर्देशांक जास्त असून औरंगाबाद येथील तो सर्वात कमी दिसून येतो.

## मानवी विकास निर्देशांकाचे प्रमुख निर्देशक:

मानवी विकास निर्देशांक मोजताना ज्या घटकांचा अभ्यास केला जातो त्या पैकी काही प्रमुख घटक पुढीलप्रमाणे.

१) लोकसंख्या : महाराष्ट्र हे उत्तर प्रदेशानंतर सर्वाधिक लोकसंख्या असलेले दुसरे राज्य आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या २००१ मध्ये ९.९६ कोटी तर २०११ मध्ये ११.२४ कोटी इतकी वाढली होती. यामध्ये याच वर्षात पुरूषांची संख्या ५.०४ कोटी वरून ५.८४ कोटी तर स्त्रियांची संख्या ४.६५ कोटी वरून ५.४० कोटीपर्यंत वाढली होती.

२) नागरी लोकसंख्या : २०११ च्या जनगणना अहवालानुसार राज्यातील नागरी पुरूषांची संख्या २.६८ कोटी तर स्त्रीयांची संख्या २.४१ कोटी इतकी होती. २००१ च्या तुलनेत ही वाढ ४५.२% इतकी आहे.

३) सरासरी आयुर्मान : २०११ च्या जनगणना अहवालानुसार पुरूषांचे सरासरी आयुर्मान ६७.९ वर्षे तर स्त्रीयांचे सरासरी आयुर्मान ७१.३ वर्षे इतके होते. २००१ नुसार ते अनुक्रमे ६४.३ वर्षे व ६८.८ वर्षे इतके होते. त्यामध्ये वाढ झालेली आहे. याचाच अर्थ महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक वाढत आहे.

४) साक्षरता प्रमाण : २०११ मध्ये पुरूषांचे साक्षरता प्रमाण ८९.८२% तर स्त्रीयांचे साक्षरता प्रमाण ७५.४८ % इतके होते. २००१ मध्ये हे प्रमाण अनुक्रमे ४०.५% व १४.६ % इतके होते.

५) जन्म दर-मृत्यूदर : २०११ नुसार महाराष्ट्रात

जननदर १७.६% तर मृत्यूदर ६.७% इतका होता. २००१ मध्ये हे प्रमाण अनुक्रमे २१.५% व ७.५% असे होते.

६) शिक्षण : प्रा. मिर्दलच्या मते शिक्षण हे मानवी साधन संपत्तीच्या गुणवत्तेचा महत्वाचा निकष आहे. शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रीत करावे म्हणजे विद्यार्थ्यांची संख्या, शैक्षणिक सुविधा, शाळेतील गळतीचे प्रमाण , तंत्र शिक्षण , प्रशिक्षण इत्यादीवर अधिक लक्ष दिले पाहिजे. यावर मानवी विकास निर्देशांकाचे स्वरुप अवलंबून असते.

७) आरोग्य : संयुक्त राष्ट्र संघाचा २०२० पर्यंत सर्वांना आरोग्य या कार्यक्रमामध्ये सामान्य माणसास चांगल्याप्रकारे आरोग्य व वैद्यकीय सुविधा पुरविल्या गेल्या पाहिजेत. महाराष्ट्र शासनाने यासाठी विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी केली आहे. देशपाळीवरून २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू करण्यात आले आहे. राज्यांतर्गत लोकसंख्या नियंत्रण, जननदर-मृत्यूदर कमी करणे, स्त्री-पुरूष प्रमाणात बदल घडवून आणणे इ.साठी सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत.

८) मानवी विकास निर्देशांक मापनाचे सूत्र :

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य- किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य-किमान मूल्य}}$$

$$\text{आरोग्य निर्देशांक} = \frac{\text{जन्मवेळचे अपेक्षित आयुर्मान-किमान (जन्मवेळचे अपेक्षित आयुर्मान)}}{\text{जन्मवेळचे अपेक्षित आयुर्मानाचा विस्तार}}$$

शिक्षण निर्देशांक = १/३ (साक्षरता निर्देशांक) + २/३ (समायोजित शिक्षणाची सरासरी वर्षे)
येथे साक्षरता निर्देशांक = ७ वर्षे व अधिक वयाच्या लोकांचे साक्षरता दर समायोजित शिक्षणाची सरासरी वर्षे = ७ वर्षे व अधिक वयाची लोकांची शिक्षणाची सरासरी वर्षे ६ ते १७ या शाळेत जाणाऱ्या वयातील शाळा सोडलेल्या मुलांना समायोजित केलेले

$$\text{उत्पन्न निर्देशांक} = \frac{\text{मासिक दरडोई खर्च (१-ग) - मासिक दरडोई खर्च}_{\text{किमान}}\text{ (१-ग)}}{\text{मासिक दरडोई खर्च}_{\text{कमाल}}\text{ (१-ग) - मासिक दरडोई खर्च}_{\text{किमान}}\text{ (१-ग)}}$$

जेथे ग-मासिक दरडोई खर्चाच्या असमानतेचा गिणी सहगुणांक.
मानव विकास निर्देशांक = आरोग्य , शैक्षणिक व उत्पन्न निर्देशांक यांची सर्वसाधारण सरासरी.

**निष्कर्ष :**

१)महाराष्ट्र हे देशातील एक महत्वाचे घटक राज्य आहे.

२)महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक इतर राज्यांच्या तुलनेत उत्कृष्ट आहे.

३)मानवी विकास निर्देशांक हा आर्थिक विकासातील एक महत्वाचा घटक आहे.

४)महाराष्ट्रातील मानवी विकास निर्देशांकात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक घटकांचा अंतर्भाव होतो.

५)महाराष्ट्र राज्यात मानवी विकास निर्देशांक पाहिल्यास तो सर्वत्र असमान दिसून येतो.

६)महाराष्ट्राच्या मानव विकास निर्देशांकात राज्यांतर्गत विभागात साक्षरतेचे प्रमाण वाढविले तरच सरासरी आयुर्मान वाढेल. त्यामुळे मानवी विकास निर्देशांकत वाढ होईल.

७)मानवी विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी मानव विकास निती यांचा समन्वय साधता आला पाहिजे.

८)महाराष्ट्रातील मानवी विकास निर्देशांक विकसित करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रोजगार, वाहतुक, दळण-वळण इत्यादी बाबतीत सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत.

९)महाराष्ट्रातील मानवी विकास निर्देशांकात असलेला प्रादेशिक असमतोल दूर करणे गरजेचे आहे. तरच मानवी विकास निर्देशांकात वाढ होईल.

१०)महाराष्ट्रातील मानवी विकास निर्देशांक सुधारण्यासाठी शेती व शेतीआधारीत उद्योगांचा विकास झाला पाहिजे.

११)महाराष्ट्राच्या मानवी विकास निर्देशांकात वाढ होण्यासाठी बँका, पोस्ट व वित्तीय संस्थांची संख्या व त्यांच्याकडील आधुनिक घटकांचा विकास होणे आवश्यक आहे.

१२)महाराष्ट्राच्या मानवी विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी दूरसंचार सेवा व भ्रमणध्वनी सेवांचा अल्प किंमतीने विकास झाला पाहिजे.

**संदर्भ सूची:**


१) चव्हाण एन्.एल., *भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास*, प्रशांत प्रकाशन, जळगाव (२००४)

२) दत्त-सुन्दरम्, *इंडियन इकॉनॉमी*, एस्.चाँद, नवी-दिल्ली (२०१०)

३) देसाई-भालेराव, *भारतीय औद्योगिक विकास*, निराली प्रकाशन, पुणे (१९८८)

४) गायकवाड बी.आर. *महाराष्ट्राच्या आर्थिक विकास: एक चिंतन* चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. (२०१२)

५) जाधव तुकाराम, *महाराष्ट्र वार्षिकी*, द युनिक ॲकॅडमी, पुणे (२०१२)

६) के.सागर व व्ही.बी.पाटील, *मानव संसाधन विकास*, के.सागर पब्लि. पुणे, (२००९).

७) माथूर बी.एल., *इंडियन इकॉनॉमी*, आर. बी. एस्. ए. प्रकाशन, जयपूर, (१९८७)

८) नाळे आर. के., *शाहूवाडी तालुक्यातील मानवी विकास निर्देशांक*, एक अभ्यास (शोध निबंध-२०१३)

९) पुरोहित वसुधा, *विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र*, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद

१०) *अर्थसंवाद*, जुलै-सप्टेंबर (२००५)

११) *अर्थसंवाद*, ऑक्टोबर-डिसेंबर (२००६)

१२) *लोकमत*, २६ मे, २०१०.

१३) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी*, २०१२-१३.

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विशेष पैलू

**संभाजी गोपाळा शिंदे**, पिंपरी,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, पुणे ४११ ०१७,
भ्रमणध्वनी : ९८८१०३७८८९,
ई-मेल : shindesambhajig@gmail.com

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि त्यानंतर प्रांतरचनेच्या धोरणातून १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,६७० चौ.कि.मी. असून महाराष्ट्राचा क्षेत्रफळ व लोकसंख्या या दोन्ही बाबतीत देशात दुसरा क्रमांक आहे. १९६१ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या ३.९६ कोटी, २००१ मध्ये ९.६८ कोटी तर २०११ मध्ये ११.२३ कोटी झाली. ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन ५३ वर्षे झालेली आहेत. महाराष्ट्र राज्याने शेती, उद्योग, सेवा व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. महाराष्ट्र राज्यांने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे विविध पैलू असून प्रस्तुत शोधनिबंधात काही प्रमुख पैलूंवर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १) औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य :

औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्राचा पुढाकार स्वातंत्र्यपूर्व काळापासून आहे. अनुकुल भौगोलिक परिस्थिती आणि हवामान यामुळे सुतीकापड उद्योगाची सुरुवात मुंबई शहरात झाली. त्याच्या जोडीने यंत्रसामग्री व धातुउद्योग यांची स्थापना झाली. रेल्वे, रस्ते, वीज, पाणीपुरवठा यासारख्या सुविधा पुरेशा प्रमाणात मिळत गेल्यामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाला चालना मिळत गेली. महाराष्ट्र सरकारने वेळोवेळी औद्योगिक धोरणात बदल केलेला आहे. मागास भागात औद्योगिक वसाहती स्थापन करणे, विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करणे, उद्योजकांना गुंतवणुकीसाठी उत्तेजन देणे, करांमध्ये सवलती देणे यासारख्या धोरणांमुळे राज्यात उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढून औद्योगिक विकास होण्यास मदत झाली आहे. दिल्ली ही देशाची राजधानी असली तरी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. लघु उद्योगात महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे.

देशांतर्गत तसेच विदेशी संस्थांकडून औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्याने सातत्य राखले आहे. महाराष्ट्र राज्य मोटार वाहने उत्पादनाचे आणि माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या उद्योगांमध्ये रसायन, खाद्य वस्तू, साखर, सुतीकापड, लोकर-रेशीम व कृत्रिम धाग्याचे कापड, परिवहन सामग्री, अभियांत्रिकी उद्योग, औषधनिर्मिती, संगणक इ. उद्योगांचा समावेश होतो. फिल्म उद्योगाचा प्रारंभ महाराष्ट्रातून झाला व आज देशात सर्वाधिक चित्रपट मुंबईत निर्माण होतात. २०११ मध्ये महाराष्ट्रात देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.३% लोकसंख्या होती आणि भारतातील एकूण औद्योगिक भांडवल गुंतवणूकीपैकी १७% भांडवल गुंतवणूक १७.५% रोजगार महाराष्ट्रातील उद्योगक्षेत्रातून निर्माण होतो. १९६० पर्यंत महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती ही मुख्यत: मुंबई, ठाणे आणि पुणे या परिसरापुरती मर्यादित होती, परंतु त्यानंतर सरकारच्या विविध वित्तीय व विकास संस्थांच्या प्रयत्नांमधून महाराष्ट्रातील कोल्हापूर, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, जालना, जळगाव इ. भाग औद्योगिक दृष्ट्या विकसित झाले.

### राज्याच्या औद्योगिक विकासाची वैशिष्ट्ये:

अ) राज्याच्या औद्योगिक प्रगतीमुळे राज्य उत्पन्नातील द्वितीय क्षेत्र व तृतीय क्षेत्र यांचा वाटा वाढला आहे तर कृषी क्षेत्राचा वाटा तुलनेने कमी होत आहे. ही घडामोड म्हणजे प्रगतीचा एक निर्देशकच आहे.

ब) राज्याचा औद्योगिक विकास होत असताना उद्योगांची संरचना बदलली आहे. सुतीकापड, धातुची भांडी, उपभोक्त्यांच्या वस्तू, छोटी यंत्रे यांचे एकूण उत्पादनातील प्राबल्य कमी होऊन, भांडवली वस्तू, मोठी यंत्रे, दुचाकी व चार चाकी वाहने, रसायन, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक, अशा उद्योगांचे प्राबल्य वाढते आहे.

क) राज्यामध्ये मुलभूत मोठ्या उद्योगांबरोबरीने लघुउद्योग यांचीही वाढ झाली आहे. सर्व उद्योगांचे सहअस्तित्व हा येथील औद्योगिक प्रगतीचा पैलू आहे.

ड) बदलत्या परिस्थितीनुसार महाराष्ट्र सरकारने आपल्या औद्योगिक धोरणात अमुलाग्र बदल केलेले आहेत.

इ) महाराष्ट्रात औद्योगिक विस्तार हा सार्वजनिक, खाजगी व सहकारी अशा सर्व क्षेत्रांमध्ये झालेला आहे.

ई) शहरांचा नावलौकिक व तेथे उपलब्ध असणाऱ्या सुविधा यांमुळे ठराविक शहरात उद्योगांचे केंद्रीकरण झालेले आहे.

च) देशात औद्योगिक प्रगतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर असले तरी महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती मुंबई, पुणे आणि नाशिक या त्रिकोणाच्या पट्ट्यात केंद्रित झालेली आहे.

### महाराष्ट्राने सहकारी क्षेत्रात केलेली प्रगती:

संपूर्ण राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राने आपला ठसा अनेक कारणांनी उठविला आहे. त्यातील प्रमुख कारणांपैकी महाराष्ट्राने सहकारी क्षेत्रात केलेली प्रगती होय.

सहकारी संस्थांनी महाराष्ट्राच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक जीवनात महत्वाचे स्थान मिळविले आहे.

महाराष्ट्राची भूमी ही सहकारी

चळवळीच्या विकासाच्या दृष्टीने पोषक असल्याचे दिसून येते. १९०४ च्या सहकारी कायद्याने सहकारी पतसंस्था व १९१२ च्या कायद्याने इतर प्रकारच्या सहकारी संस्था स्थापण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्राचे भाग्य असे की, महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीला अनेक मोठ्या व्यक्तींचे आशिर्वाद लाभले.

महाराष्ट्र राज्यात कृषि वित्तपुरवठा, आदिवासी विकास, पणन प्रक्रिया सूतगिरण्या, साखर, गुळ, हातमाग, ग्राहकभांडारे, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, रेशीम, घरबांधणी, नागरी बँका, वाहतूक, कागद, अशा अनेक क्षेत्रात सहकारी संस्था कार्यरत आहेत. देशातील एकूण सहकारी संस्थांपैकी महाराष्ट्रात २७.३% सहकारी संस्था, १४.६८% सदस्य संख्या, २६.३% भाग भांडवल व २६.९% खेळते भांडवल आहे. राज्यातील एकूण रोजगारात सहकारी क्षेत्राचा वाटा १२.५% आहे.

देशात पहिला साखर कारखाना प्रवरानगर - लोणी (जि. अहमदनगर) येथे १९४९ मध्ये सुरु झाला. आज देशातील एकूण सहकारी साखर कारखान्यांपैकी (२५२) राज्यात २०१ सहकारी साखर कारखाने आहेत. त्यापैकी १५३ कारखाने उत्पादन करीत आहे. देशातील एकूण साखर उत्पादनापैकी जवळ-जवळ १/३ साखर महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीतून उपउत्पादने (By Products)सुरु केलेली आहे. तसेच उपसा जलसिंचन योजना, रस्ते व पुलबांधणी, आरोग्य सेवा, शाळा व महाविद्यालये, पाझरतलाव, गोबर गॅस, शेतीपूरक व्यवसाय मदत व मार्गदर्शन इ. अनेक सामाजिक उपयोगाची कामे सुरु केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने ही महाराष्ट्राच्या ग्रामीण समाज रचना उन्नतीची साधने बनलेली आहेत.

**रोजगार हमी योजना:**

महाराष्ट्र सरकारने ग्रामीण बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगार हमी योजना सुरु केलेली आहे. वि. स. पागे यांच्या शिफारशीवरुन ही अभिनव योजना सुरु झाली. सांगली जिल्ह्यातील तासगाव परिसरातील बेकारांसाठी १९६५ मध्ये एक रोजगार योजना सुरु करण्यात आली. या योजनेचे यश लक्षात घेऊन १९६९ पासून ही योजना काही निवडक तालुक्यात सुरु करण्यात आली. या योजनेच्या अंमलबजावणीचा अनुभव लक्षात घेऊन ही योजना १ मे १९७२ पासून ÷रोजगार हमी योजना' या नावाने महाराष्ट्रात सुरु करण्यात आली. २६ जानेवारी १९७९ पासून संपूर्ण महाराष्ट्रात रोजगार हमी कायदा लागू करण्यात आला. या कायद्यान्वये ग्रामीण भागातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीस अकुशल शारीरिक काम मिळण्याची हमी देण्यात आली.

या योजनेखाली डिसेंबर २००२ अखेर ३.९४ लाख कामे पुर्ण झाली त्यापैकी ६२% कामे भूविकास व मृदसंधारणाची होती. १०% कामे जलसिंचन योजनेची होती.

गेल्या तीस वर्षात महाराष्ट्र राज्याने रोजगार हमी योजनेवर एकूण सुमारे २१०० को. पेक्षा अधिक खर्च केला व एकूण २१५ को. श्रमदिवस काम पुरविले.

राज्यातील रोजगार हमी योजना ही स्वयंनिर्भर असून भारतात तसेच आशिया खंडात एकमेव व अभिनय योजना आहे. रोजगार हमी योजनेमुळे महाराष्ट्रात ग्रामीण बेकारीच्या प्रश्नाची

तीव्रता कमी होण्यास मदत झाली. १९७७ ते १९८३ या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांची संख्या ५४.७% वरुन ३५.७% पर्यंत खाली आली. महाराष्ट्रातील बेकारीत व दारिद्रयात झालेल्या घटीचे श्रेय रोजगार हमी योजनेला दिले जाते. जागतिक बँकेच्या १९८२ च्या अहवालात असे नमूद करण्यात आले की १९७३ ते १९७८ या काळात महाराष्ट्रात शेती व औद्योगिक प्रगती झालेली नसतानाही ग्रामीण बेकारीत जी घट झाली त्याचे श्रेय रोजगार हमी योजनेलाच देणे आवश्यक आहे.

### महाराष्ट्र राज्याची फळबाग लागवड:

महाराष्ट्रात ५२% लोकसंख्या उपजिविकेसाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून असूनही महाराष्ट्र राज्य अन्नधान्यांच्या बाबतीत कायमचे तुटीचे राज्य राहिलेले आहे. राज्यात ८२% क्षेत्र कोरडवाहू व ७३% शेतकरी अल्पभूधारक आहे. या शेतकऱ्यांची आर्थिक दुर्बलता कमी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी सन १९९०-९१ मध्ये राज्यात रोजगार हमी योजना ही फळबाग विकास कार्यक्रमास जोडून राज्यात फलोत्पादन विकासाची क्रांती घडवून आणली आहे.

महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामार्फत फळबाग लागवड योजनेबरोबरच प्रशिक्षण, प्रक्रिया उद्योग व पणन, शीतगृह, साठवणगृहे, निर्यात केंद्र, फलोत्पादन पुरस्कार, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरे इ. माध्यमातून फळबागांची लागवड, उत्पादनवाढ, प्रक्रिया उद्योग व निर्यातीला शासनामार्फत प्रोत्साहन दिले जात आहे.

१९९०-९१ मध्ये राज्यात फळपिकांखाली असलेल्या २.४२ लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन ते मार्च २०११ पर्यंत १७.८२ लाख हेक्टर इतके वाढले. फळबागा विकासासाठी दरवर्षी रु. १०० कोटींचा कर्जपुरवठा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिला जातो.

द्राक्षे, स्ट्रॉबेरी, कलिंगडे, आंबे यांच्या निर्यातीने महाराष्ट्राचे नाव आता मध्य युरोप व पश्चिम युरोपातही पोहोचले आहे. फळे व भाजीपाला निर्यातीसाठी पुणे व नागपूर येथील विमानतळावर विशेष सोयी करण्यात आल्या आहेत.

राज्यात राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाची स्थापना २००५ मध्ये करण्यात आली. राज्यातून फळांची निर्यात वाढावी म्हणून सात कृषि निर्यात विभागांची स्थापना करण्यात आली आहे. देशातून होणाऱ्या द्राक्षांच्या निर्यातीतील राज्याचा ९८% वाटा आहे. तर आब्यांच्या निर्यातीत ६५% वाटा आहे. शासनाने द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण २००१ मध्ये जाहिर केले. त्यानुसार सांगली व नाशिक जिल्ह्यात वाईन पार्क सुरु झाले आहेत. राज्यात ५८ वाइन पार्क सुरु झाले आहेत. फलोत्पादनात महाराष्ट्राचा देशात आन्ध्र प्रदेशानंतर दुसरा क्रमांक आहे. लिंबू वर्गीय फळे, द्राक्षे, डाळिंब यात राज्य देशात आघाडीवर आहे. केळी उत्पादनात तामिळनाडू नंतर महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे.

### महाराष्ट्राची दूध महापूर योजना:

महाराष्ट्रात कोरडवाहू क्षेत्र अधिक असल्याने शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसायाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. दुधाचा महापूर प्रकल्प भारतात १९७१ मध्ये राबविण्यात आला. १९७० नंतर या व्यवसायाने

धुळे, जळगांव, ठाणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, उस्मानाबाद या जिल्ह्यात चांगली प्रगती केली आहे. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर इ. ३६ ठिकाणी सरकारी दूध योजना राबविली जाते. त्यापैकी ०८ ठिकाणी सहकारी दुध योजना आहेत. राज्यात ११४ शीतकरण केंद्रे आहेत.

महाराष्ट्रात १९७५ मध्ये दररोज ४ लाख लीटर, १९८० मध्ये १५ लाख लीटर, २००० मध्ये ५८ लाख ली. ऑक्टोबर २०११ मध्ये राज्यात दररोज ३६.७६ लाख ली. दूधाचे संकलन झाले होते. मिरज, उद्‌गीर, अकोला, जळगाव, वारणानगर येथे दुधाची पावडर करणारे कारखाने आहेत. राज्यात असे ०८ कारखाने, ११४ दूध शीतकरण केंद्रे आणि ५६ दुधशाळा आहेत.

सन १९८३ पर्यंत राज्यात इतर राज्यांतून दूध आयात केले जात होते मात्र आता आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, बिहार, दिल्ली या राज्यांना महाराष्ट्रातून दुधाची निर्यात होते. आखाती देशांना दुधाची निर्यात करण्याच्या योजनेस मंजुरी मिळाली आहे. स्पेन व सीरिया या देशांना दुधाच्या भुकटीची निर्यात होत आहे. दुधाचा महापूर योजनेने १४ लाख शेतकऱ्यांना जोड व्यवसाय मिळाला आहे. त्यातील ७०% शेतकरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. राज्यात एकूण १०६ जिल्हा सहकारी दूध संघ आहेत. खाजगी क्षेत्रातही दूध उत्पादक संस्था कार्यरत आहेत.

अशा रीतीने महाराष्ट्र हरित क्रांतीच्या बाबतीत अयशस्वी ठरला असला तरी दुग्धव्यवसायात महाराष्ट्राने क्रांती घडवून आणली आहे. तिलाच ÷धवलक्रांती' असे म्हणतात. या धवलक्रांतीमुळे ग्रामीण महाराष्ट्रात रोजगार निर्मिती झाली, ग्रामीण लोकांच्या राहणीमानात वाढ झाली. राज्यातील लोकांच्या आहारातील दुधाचा वापर वाढला शिवाय महाराष्ट्र राज्य दुधाच्या निर्यातीचे केंद्र बनले.

**सारांश:**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या उपरोक्त काही पैलू व्यतिरिक्त कापूस एकाधिकार योजना, उच्च दरडोई उत्पन्न, लोकसंख्येत प्रचंड वाढ, वाढते शहरीकरण, कोरडवाहू शेतीचे मोठे प्रमाण, आर्थिक विकासात प्रादेशिक असमतोल, साक्षरतेचे उच्च प्रमाण, कृषी पंढरी योजना, प्रादेशिक विकास मंडळे, संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्ती ग्राम अभियान इत्यादीसारख्या अनेक अभिनव योजनांची अमंलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. त्यामुळेच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान आहे.

**संदर्भ सूची:**


१) दास्ताने संतोष, *÷महाराष्ट्र २०१२'*, नितीन प्रकाशन, पुणे ४११ ००२.

२) सोळुंखे आर. एस., *÷महाराष्ट्राची अर्थव्यवस्था'*, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

३) जगदाळे सुर्यकांत, *÷महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र'*, अर्थसंवाद, जानेवारी-मार्च २००४.

४) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी* २०११-१२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५) जाधव तुकाराम, *÷महाराष्ट्र वार्षिकी २०१२'*, ÷दि युनिक ॲकॅडमी' फर्ग्युसन कॉलेज समोर,

शिरोळे रस्ता, पुणे४.

६) टाले रामकृष्ण, *÷महाराष्ट्राचा आर्थिक विकास : एक अभ्यास'* अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर २०१२.

७) *Economic Survey of Maharashtra* 2010-11

८) *www.Census of India 2011*

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०१३ ते ३१ डिसेंबर २०१३ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरित पाठवाव्यात.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०१३ ते ३१/१२/२०१३ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंत पाठवाव्यात.

### डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१३ ते ३१ डिसेंबर २०१३ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१४ पूर्वी नवनियुक्त कार्यवाह, म.अ.प., गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ (भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६) यांच्याकडे पाठवावेत. २०१४ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- डॉ. आर.बी.भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन, अकोला

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अडतिसावे वार्षिक अधिवेशन **अकोला** येथील **श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि.७, ८ व ९ नोव्हेंबर २०१४** या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. जळगाव येथील डॉ.श्रीराम जोशी हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे, स्थानिक कार्यवाह डॉ.रामेश्वर भिसे (भ्रमणध्वनी:९९७०१५१३४८) हे आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

**१) मौद्रिक क्षेत्र व वास्तव क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैध्दांतिक विवेचन.**

**२) जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल.**

**३) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल सद्यस्थिती व आव्हाने.**

वरील विषयांचे टिपण सूत्रसंचालकांनी ***अर्थसंवाद*** च्या या अंकामध्ये दिले आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त २००० शब्दात विषय मांडावयाचा असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. MS-Word मध्ये टाईप करू नयेत. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे. निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रसिध्द केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

दि.५ सप्टेंबर २०१४ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

डॉ. श्रीराम जोशी,<br>
सार्थक, प्लॉट नं.२०, विवेकानंदनगर,<br>
रामानंदनगर जवळ, जळगाव-४२५ ००१,<br>
भ्रमणध्वनी:९४२१००८७७६

- आर. बी. भांडवलकर,<br>
कार्यवाह-खजिनदार,<br>
मराठी अर्थशास्त्र परिषद

(निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा)

# वास्तव क्षेत्र आणि मौद्रिक क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैद्धांतिक विवेचन

**दि. व्यं. जहागिरदार, अमरावती,**
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९६५७७०१७४८

मौद्रिक क्षेत्र व वास्तव क्षेत्र या दोहोतील विसंगतीचे सैद्धांतिक विवेचन हा विषय अत्यंत तांत्रिक स्वरूपाचा व जटील स्वरूपाचा मानावा लागतो. अशा विषयांवर आपणास प्रत्यक्षपणे ग्रंथ वा अहवालांमधून माहिती सहजासहजी उपलब्ध होत नाही. साधारणतः यासाठी समष्ठी अर्थशास्त्रावरील ग्रंथ, मौद्रिकशास्त्रावरील पुस्तके व अहवालांचा आधार घ्यावा लागतो. मात्र या विषयासंबंधात उपयोगात येऊ शकतील असे विविध संशोधनपर लेख विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. वानगीदाखल त्यापैकी ३-४ ग्रंथांचा उल्लेख करता येईल. मूळ ग्रंथ वा संशोधनपर लेख वाचण्यात आले नाहीत तरी अँड्रयू अबेल व बेन बेरनानके यांचे Macroeconomics (2007), विलीयम ब्रॅनसन यांचे Macroeconomic Theory and Policy (1998), चक्रवर्ती समितीचा अहवाल (१९८५) डॉन पॅटीन्किन यांचे Studies in Monetary Economics (1972), पॉऊल सॅम्युअलसन, विलियम नोरधांस (adopted by Sudip Chaudhari) यांचे Macroeconomics (2012) या ग्रंथांचा वापर करता येईल. संशोधन करून काही नवीन सांगणे बरेच कठीण आहे. याबाबत असणारे अद्यावत विवेचनाचे आकलन होणेही पुरेसे ठरेल.

अर्थव्यवस्थेत जसे कृषी, उद्योग आणि सेवा असे तीन महत्त्वपूर्ण क्षेत्रे (sectors) असतात व त्यांच्या विविध बाबींचा/पैलूंचे आपण अध्ययन करतो, अर्थशास्त्राचे समष्टी आणि व्यष्टी अर्थशास्त्र या दोन प्रकारात विभाजन करून आपण व्यष्टी व समष्टी अर्थशास्त्राचे विवेचन करतो तसेच अर्थशास्त्रातील वा देशाच्या अर्थव्यवस्थेत वास्तव किंवा वास्तविक क्षेत्र (Real Sector) आणि

मुद्रा (Money) किंवा मौद्रिक क्षेत्र असेही दोन भाग आपण स्वीकारतो. या दोनही क्षेत्रातील व्यवहार मुद्रेद्वारा केले जातात कारण अर्थव्यवस्थेचे स्वरूप मुद्रा अर्थव्यवस्था हे आहे.

वास्तव क्षेत्राचे अंतर्गत एकूण मागणी आणि एकूण पुरवठा संबंधित व्यवहारांचा विचार केला जातो. साधारणत: उत्पादन, उपभोग, बचत, गुंतवणूक, भांडवल निर्मिती, श्रमशक्ती, मजूरीचे दर अशा महत्त्वपूर्ण बाबी वास्तविक क्षेत्रात समाविष्ट केल्या जातात. मुद्रा वा मौद्रिक क्षेत्रात मुद्रेद्वारा घडून आलेल्या व्यवहारांचा अर्थात मुद्रेचा पुरवठा मागणीचा विचार होतो. वास्तविक क्षेत्राचा विस्तार आणि मुद्रा क्षेत्राचा विस्तार सारख्या प्रमाणात होतांना दिसत नाही. या दोन क्षेत्रांच्या विस्तारात विषमता-तफावत आढळून येते. या दोन क्षेत्रांच्या अध्ययनाचा समावेश समष्टी अर्थशास्त्रात आपणास दिसून येतो.

वास्तव क्षेत्रातील उत्पादन, रोजगार, उपभोग, बचत व गुंतवणूक निर्धारित करणारे घटक कोणते आहेत? हे घटक कशावर अवलंबून आहेत याची चर्चा वास्तविक क्षेत्राच्या स्पष्टीकरणात करता येईल. त्यासंदर्भातील तत्त्वे किंवा सिद्धांताची रूपरेषा येथे अपेक्षित राहील. तसेच मुद्रा क्षेत्र विचारत घेतांना मुद्रेचा पुरवठा निर्धारित करणाऱ्या घटकांचा विचार अपेक्षित आहे. वास्तविक क्षेत्राचा विस्तार हा मुद्रा क्षेत्रापेक्षा कमी का? म्हणजे मुद्रेचा पुरवठा हा वस्तू-सेवांच्या पुरवठ्यापेक्षा जास्त का असतो किंवा उलट स्थिती का व कशी उद्‌भवू शकते. तसेच या दोन क्षेत्रात विसंगती निर्माण झाली आहे हे ओळखण्याचे निकष कोणते ? याचा विचार झाला पाहिजे.

वास्तव क्षेत्र निर्धारित करणारे जे भिन्न घटक असतात त्या घटकांची चर्चा अर्थशास्त्रीय सिद्धांताद्वारे अपेक्षित आहे. तसेच मुद्रा क्षेत्राचा वास्तविक क्षेत्र निर्धारित करण्यात असणारा सहभागही विचारात घ्यावा लागेल. मुद्रा क्षेत्रात प्रामुख्याने त्या क्षेत्राचे स्त्रोत आणि मुद्रेचा पुरवठा निर्धारित करणारे घटक चर्चिल्या जातात. गेल्या अनेक वर्षापासून वास्तविक क्षेत्रात व मुद्रा क्षेत्रात होणाऱ्या वाढीचा विचार केला तर हे लक्षात येते की वास्तविक क्षेत्रातील वाढीपेक्षा मुद्रा क्षेत्रातील वाढ जास्त आहे. वास्तविक क्षेत्रातील उत्पादीत वस्तू व सेवांसाठी मुद्रेची मागणी केली जाते. मुद्रा क्षेत्रातील वाढ ही वास्तविक क्षेत्राच्या संदर्भात जास्त आहे. कधीकधी उलटही स्थिती असू शकते. या विसंगतीमुळे अर्थव्यवस्थेत स्फिती वा अस्फिती निर्माण होते. स्फितीचे जे पारंपरिक विवेचन केले जाते त्यापेक्षा आधुनिक विवेचनाकडे लक्ष दिल्यास हे दिसते की, स्फिती ही एक मौद्रिक घटना असून अतिरिक्त मुद्रा पुरवठ्यामुळे ती निर्माण होते. वास्तविक क्षेत्रातील व मुद्रा क्षेत्रातील विसंगती हे संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संदर्भात जशी अभ्यासता येते तशीच ती शेती, उद्योग, परिवहन, इ. क्षेत्राचे बाबतही स्पष्ट करता येऊ शकते. या विसंगतीचे पडसाद अधिक प्रमाणात कुठे उद्‌भवू शकतात हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबत सांगता येईल का? एकूण मागणी ही वस्तू व सेवांच्या पुरवठ्याच्या तुलनेत वाढते. ही मागणी वाढ अर्थातच मुद्रा परिमाणातील वाढीमुळे निर्माण होते. त्याच्या परिणाम स्वरूप व्याजदर घटतात. उपभोग वा गुंतवणूकीवरील वाढत्या खर्चामुळेही स्फिती उद्‌भवू शकते. काही तज्ञांच्या मते स्फितीची स्थिती ही उत्पादन व्ययात झालेल्या वाढीतून विशेषत:

श्रमिकांच्या वेतन वृद्धीद्वारे घडून येऊ शकते. प्रत्यक्षात असे दिसते की स्फितीची प्रक्रिया मुद्रेचा वाढत जाणारा पुरवठा आणि उत्पादन व्ययातील वाढ (Cost push) या दोहोंमुळे घडते. अस्फिती (Deflation) बाबत वास्तव आणि मुद्रा क्षेत्राचा विचार करता येईल.

वास्तव क्षेत्र व मुद्रा क्षेत्रातील विसंगतीमुळे स्फिती निर्माण होते. याबाबत फिलीप्स वक्राचे टीकात्मक विवेचन करता येईल. स्फिती व बेकारी संबंधातील सममूल्यन (Trade off) त्याद्वारे स्पष्ट केले जाते. साधारणतः असे आढळते की जर स्फितीचा दर अधिक असेल तर बेरोजगारीचा दर कमी असतो. मिल्टन फ्रिडमन आणि फेल्पस् यांनी केलेल्या नव्या स्पष्टीकरणाचा या संदर्भात विचार करता येईल.

व्याजदर निर्धारित करणाऱ्या विवेचनात केन्सपूर्व तज्ज्ञांनी गुंतवणूक/बचतीची मागणी पुरवठ्याच्या घटकांना निर्धारक घटक म्हणून स्वीकार. केन्स व त्यानंतरचा अर्थशास्त्रज्ञांनी मुद्रेच्या पुरवठाला निर्धारक घटकांपैकी एक घटक (पुरवठा घटक) म्हणून मान्यता दिली. वास्तव क्षेत्राची व्याप्ती ठरविणाऱ्या घटकांमध्ये व्याजदर हा महत्त्वपूर्ण घटक आहे. भारताच्या संदर्भात व्याजदर निर्धारण व वास्तविक क्षेत्रातील वस्तू, सेवांचे उत्पादन यात मुद्रेचा पुरवठा हा घटक कितीसा प्रभावी आहे ?

भारतातील मौद्रिक व्यवस्थेचे अवलोकन शास्त्रीय पद्धतीने करून योग्य ती उपाययोजना सुचविण्यासाठी १९८२ मध्ये सुखमय चक्रवर्ती यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. समितीने आपला अहवाल एप्रिल १९८५ मध्ये RBI ला सादर केला. समितीच्या अनेक शिफारशीपैकी एक शिफारस मौद्रीक लक्ष निश्चिती (Monetary Targeting) ही आहे. गेल्या वर्षातील उत्पादन वाढ व किंमती विचारात घेऊन मौद्रिक लक्ष्य निश्चित करतांना M3 हा मौद्रिक चल मानला गेला. समितीच्या या प्रकारच्या शिफारशी व नंतरच्या २५ वर्षातील याबाबतच्या घटनांचा आढावा घेता येईल. वास्तव क्षेत्र व मुद्रा क्षेत्रातील विसंगती त्यातून दिसू शकेल.

१९७० च्या दशकात जेव्हा सुवर्णप्रमाप संपल्यात जमा झाले तेव्हापासून विविध देशातील मध्यवर्ती बँका त्यांच्या मतानुसार चलनाचा पुरवठा वाढवू लागलेत. त्याचा स्वाभाविक परिणाम किंमतीवाढीवर होऊ लागला. स्फितीचे लक्ष निश्चित करणारी उपाययोजना आखली जाऊ लागली. याबाबत जॉन बी टेलर यांनी धोरणागत दर (Policy rate), स्फिती आणि वृद्धी यांचे संबंधात एक नियम सांगितला. जागतिक वित्तीय संकटास कारणीभूत ठरलेला एक घटक असा की, अमेरिकन मौद्रिक धोरण त्यावेळी सैल होते व त्याचे टेलरच्या नियमापासून विचलन झाले होते.

लेखकांनी वास्तव क्षेत्र निर्धारणाचे घटक तसेच मुद्रा क्षेत्राचे स्त्रोत व त्यांना निर्धारित करणारे कारक, या दोन क्षेत्रातील विसंगतीचे स्वरूप, त्या विसंगतीचे संभाव्य परिणाम व ही विसंगती कमी करणारी उपाययोजना अशा बाबींची आपल्या लेखांमध्ये चर्चा करावी. लेखाचे शीर्षक हे ज्या मुद्दास धरून लेख लिहला आहे त्याला अनुसरून द्यावे.

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन, अकोला

(निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा)

# जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल

**व्ही. बी. भिसे, औरंगाबाद,**
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,
प्राध्यापक (उच्च श्रेणी),
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
भ्रमणध्वनी: ९९७०६२८९४३

कृषी जैवतंत्रज्ञान आणि कृषी विकास यामध्ये अतिशय जवळचा संबंध आहे. कारण कृषी जैवतंत्रज्ञानाच्या मदतीने पिकांच्या गुणधर्मामध्ये सुधारणा करणे शक्य असते. जैवतंत्रज्ञानीय प्रक्रियांद्वारे कृषीचे आधुनिकीकरण करण्याची कल्पना नविन नाही. शेतकऱ्यांनी पिकांत सुधारणा करण्यासाठी जनूकिय विनिमयाच्या नैसर्गिक प्रक्रियांचा अवलंब करण्याचा प्रयत्न केला आहेच. आज आपणाकडे जनूकिय सुधारणा संबंधीचे जे ज्ञान आहे ते विसाव्या शतकातील या संदर्भात झालेल्या सखोल व विस्तृत संशोधनाचा परिपाक आहे. १९७१ मध्ये Cohen आणि Boyer या शास्त्रज्ञांनी जनूकांचे (Genes) एक जिवाणूकडून दुसऱ्या जिवाणूकडे हस्तांतरीत करण्याचे तंत्र शोधले आणि हे तंत्रज्ञान १९८३ मध्ये यशस्वी झाले. जनूकिय बदलाच्या तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्रात मोठी क्रांती घडून आली आहे. पिकांमध्ये जनूकिय बदल केल्यामुळे त्यांची पर्यावरणीय व जैविक ताणांसंदर्भात (Stresses) (तापमान, दुष्काळ, पौष्टिक तत्वांची कमतरता, रोग व किडी) प्रतिकार शक्ती वाढते. सध्या कृषी जैवतंत्रज्ञान इतक्या उंचीवर पोहचले आहे की, त्याच्या मदतीने जवळपास कोणत्याही जिवाणूमधून (उदा. रोपटी, प्राणी, विषाणू, बुरशीजन्य वनस्पती) एक वा अधिक जनूके दुसऱ्या जिवाणूमध्ये अंतर्भूत करणे शक्य झाले आहे. अशा प्रकारचे जनूकियदृष्ट्या सुधारित तंबाकू व बटाटे पिकांच्या विषाणू रोधक वाणांचा शोध लावणारा व त्याच्या व्यापारी उपयोगास परवानगी देणारा चीन (१९९०) हा पहिला देश होय.

त्यानंतर अमेरिकेतील मोसान्तो ह्या कंपनीने कापसाच्या Coker 312 या वाणात मातीतील Bt (Bacillus thuringiensis) हे bacterium अंतर्भूत केले व Bt कापूस हा वाण तयार केला. भारतात सुद्धा हा प्रयोग करण्यात आला व त्याच्या व्यापारी उपयोगास २००२ मध्ये मान्यता दिली. त्यानंतर भारतातील कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनास खुप गती प्राप्त झाली.

या तंत्रज्ञानाच्या संदर्भात सुरूवाती पासूनच संभ्रमाचे वातावरण राहिले आहे. या तंत्रज्ञानाच्या बाजूने व विरोधात अनेक मुद्दे अनुभवनिष्ठ पुराव्यांआधारे (Empirical evidences) उपस्थित करण्यात येत आहेत. विशेष करून शेतकऱ्यांच्या संघटना, स्वयंसेवी व सामाजिक संघटना आणि काही राज्य सरकारे यांनी जनूकीयदृष्ट्या सुधारित पिकांच्या व्यापारी उपयोगास कडाडून विरोध करीत हा विषय न्यायसंस्थेपर्यंत नेला आहे व न्याससंस्थेने हस्तक्षेपण केला आहे. परंतु माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार आणि सध्याचे कृषी मंत्री राधामोहन सिंह यांचा पिकांमध्ये व विशेष करून अन्न पिकांमध्ये जनूकिय सुधारणा करण्याच्या कार्यक्रमास पाठिंबा असलेला दिसतो. सध्याच्या कृषी मंत्र्यांनी काही अन्न धान्य पिकांच्या (उदा.तांदुळ, गहु, मका) जनूकिय सुधारणा करण्यास परवानगी देण्याचे सुतोवाच केले आहे. जनूकिय सुधारणामुळे पिकांची उत्पादकता, उत्पादन, उत्पन्न, गुणवत्ता, टिकाऊपणा इ. मध्ये वाढ होते आणि अन्नसुरक्षा साध्य करणे शक्य आहे असे म्हटले जाते. परंतु हे तंत्रज्ञान पर्यावरण, जैविक विविधता, मानव व प्राण्यांचे आरोग्य इ. दृष्टीने नुकसानकारक आहे असे म्हटले जाते. अलिकडेच वासुदेव आचार्य यांच्या अध्यक्षतेखालील समिती नेमून या तंत्रज्ञानाची सत्यता पडताळण्याचा प्रयत्न झाला.

Norman Borlaug या जागतिक पातळीवर हरितक्रांतीचे जनक असलेल्या शास्त्रज्ञाने भारतात जनूकियदृष्ट्या सुधारित पिकांच्या अवलंबाची गरज असल्याचे म्हटले होते. तसेच भारतातील हरित क्रांतीचे जनक एम.एस. स्वामीनाथन यांनी सुद्धा जनुकिय सुधारणा संबंधी तंत्रज्ञानाच्या सर्व बाजू समजून घेणे आणि त्याचा अवलंब करण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना असले पाहिजे असे म्हटले होते.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या येत्या ३८ व्या अधिवेशनात ÷जैवतंत्रज्ञान, पर्यावरण आणि भारतीय शेतीची वाटचाल' हा विषय चर्चेसाठी ठेवला आहे. त्यासाठी पुढील बाबींवर स्वतंत्रपणे संशोधन लेख लिहिणे शक्य आहे.

१. कृषी जैवतंत्रज्ञान आणि भारताचा कृषी विकास
२. भारतातील बी. टी. कापूस तंत्रज्ञानाचा अनुभव
३. कृषी जैवतंत्रज्ञान आणि जैविक विविधता व पर्यावरण,
४. कृषी जैवतंत्रज्ञान आणि भारत सरकारचे धोरण

वरील विषयांवर संशोधनपर लेख लिहिण्यासाठी सैद्धांतिक व अनुभवनिष्ट वाङ्मय व आकडेवारी ग्रंथ, लेख, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनी तयार केलेल्या अहवालांमधून उपलब्ध आहे. सर्वेक्षणाद्वारे सुद्धा आवश्यक आकडेवारी व तथ्ये मिळविणे शक्य आहे. भारतीय संसदेने नेमलेल्या Standing Committee on Agriculture (August 9, 2012) समितीचा अहवाल लेखकांना मार्गदर्शक व उपयुक्त ठरू शकेल.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन, अकोला

(निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा)

# महाराष्ट्रातील असमतोल, सद्यस्थिती आणि आव्हाने

विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर,
प्र-कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
भ्रमणध्वनी : ९८२२७३७७२५

गेल्या दोन दशकात भारतीय अर्थव्यवस्थेने अनेक प्रकारची स्थित्यंतरे अनुभवली. तीन ते चार टक्के वृद्धि दराची कारकिर्द मागे टाकून अर्थव्यवस्था आगेकुच करावयास लागली. पूर्वीच्या कालखंडाच्या तुलनेत गेल्या दशकातील वृद्धी दरात साधारणपणे दुपटीने वाढ झाली. संपूर्ण देशात आणि विशेषतः महाराष्ट्र राज्यात आर्थिक आणि राजकीय घडामोडी मोठ्या प्रमाणात झाल्या. परिवर्तनाची लाट एकेरी पक्षाच्या रिवाजापासून अनेक पक्षीय राजकारणाच्या दिशेने जाऊ लागली आणि प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व तसेच प्रत्येक स्तरावर युती अशी व्यवस्था अस्तित्वात येण्यास सुरूवात झाली. अशा गतिमान आर्थिक आणि राजकीय स्थितीच्या संदर्भात प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न समजून घेणे आवश्यक आहे.

सत्यशोधन समितीचा अहवाल (दांडेकर समिती १९८४) सादर झाल्यानंतर भारतात आणि महाराष्ट्रात अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले. भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार प्रचंड प्रमाणात वाढला. १९८४-८५ साली भारताचे सकल घरेलू उत्पादन रु.२,३५,११३ कोटी होते. त्यात वाढ होऊन २०१२-१३ साली हे उत्पादन रु.९४,६१,९७९ कोटी झाले. १९८४-८५ साली महाराष्ट्र राज्याचे सकल घरेलू उत्पादन रु.२५,५५८ कोटी होते तर २०१२-१३ साली हे रु.१३,७२,६४८ कोटी झाले. याचाच अर्थ १९८३-८४ सालच्या अर्थव्यवस्थेच्या तुलनेत महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेत अनेक पटीने आज वाढ झाली आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नात महाराष्ट्राच्या उत्पन्नाचा हिस्सा जवळपास १४.५१ टक्के येतो. राज्यातील एकूण उत्पन्नाच्या वाट्यात सेवा क्षेत्राचा वाटा देखील जलद गतीने वाढतो आहे या वाढीची गती भारतात वाढणाऱ्या सेवा क्षेत्रापेक्षा अधिक आहे.

## महाराष्ट्रातील असमतोल :

ऐतिहासिक दृष्टीकोनातून बघितल्यास महाराष्ट्र राज्याची निर्मिती तीन अत्यंत भिन्न असे प्रदेश एकत्रित येऊन झाली. मराठी भाषिक जिल्हे यात १. बॉम्बे प्रॉव्हिन्सेस २.पूर्वीचा सेंट्रल प्रॉव्हिन्सेस आणि बेरार (विदर्भ) आणि ३. निझामाच्या अधिपत्याखाली हैद्राबाद राज्य (मराठवाडा). एक भाषिक राज्य निर्माण होतांना विदर्भ आणि मराठवाड्याचा आर्थिक मागासलेपणा आणि दुष्काळग्रस्त भाग म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग आणि कोकण या प्रादेशिक असमतोलाबाबतची जाण राज्यकर्त्यांना होती. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर केलेल्या पहिल्याच भाषणात या बाबतचा उल्लेख आढळतो. तुलनात्मक दृष्ट्या काही भागांची आर्थिक पिछेहाट होण्यास ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीय घटक कारणीभूत आहेत. मुंबईचे सान्निध्य आणि गुजरात मधील सुरत आणि अहमदाबाद येथील औद्योगिक केंद्रांची जवळीक पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा विकास साधण्यास पोषक ठरले. विदर्भ आणि मराठवाडा या प्रदेशात परंपरेने चालणाऱ्या कापूस गिरण्या आणि हस्तउद्योग या व्यतिरिक्त मोठे उद्योग महाराष्ट्रात सामिल झालेल्या भागांमध्ये नव्हते. महाराष्ट्र शासनाने याची दखल घेतली परंतु अंमलात आणलेल्या उपाययोजना अपेक्षेपेक्षा कमकुवत ठरल्या तसेच पारंपारिक औद्योगिक प्रसरणशील धोरण देखील कुचकामी ठरले. सत्यशोधन समिती आणि निर्देशक अनुशेष समिती या दोन्ही समित्यांनी विस्तृत अभ्यास करून सर्व प्रदेशामध्ये नियोजित शासन खर्चाची समान वाटणी झाल्यास मागास भागातील उणिवा कमी होऊन विकास साध्य होण्यास मदत होईल यावर अधिक भर दिला.

आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास साध्य करण्यास अनेक घटक कारणीभूत असतात सर्वच घटक सर्व प्रदेशांमध्ये उपलब्ध राहतीलच असे नाही. अनेक पैलू आणि अर्थसूचकता विकासातील असमानता आणि विविधतेच्या संबंधात मांडण्यात येतात. त्यामुळे त्याचे वर्णन आणि मापन करतांना विभिन्न घटक किंवा निष्पत्ती चलांचा उपयोग करावा लागेल. अनेक अभ्यासकांनी आणि तज्ज्ञ समित्यांनी विविध निर्देशक लक्षात घेऊन यथायोग्य अशा सर्व घटकांना एकत्रित करून एक निर्देशांक विकसित करण्याचा प्रयत्न केला. या निर्देशकाच्या आधारे विकसित आणि मागास भागातील समानता आणि असमानता ओळखणे शक्य होऊ लागले. महाराष्ट्र राज्यात विकासातील असमानता आणि शासनाच्या विकासात्मक प्रयत्नाने भौतिक प्रगती कितपत साध्य करता आली याचे मापन करून जिल्हा स्तरावरील अनुशेष सत्यशोधन समितीने दांडेकर समिती १९८४ केला. समितीने भौतिक अनुशेषाचे रूपांतर पैशाच्या स्वरूपात करून अनुशेष भरून काढण्यास वित्तीय खर्च किती येईल याचा देखील अंदाज वर्तविला. समितीने क्षेत्र निहाय अनुशेष काढुन प्रत्येक जिल्ह्याचा अनुशेष किती हे सर्व क्षेत्राच्या अनुशेषाची बेरीज करून दर्शविले. नागपूर कराराचे योग्यरित्या पालन न झाल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले.

निर्देशक आणि अनुशेष समितीने महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक प्रदेशामध्ये क्षेत्रनिहाय शासनाने किती खर्च केला या बाबतचा आढावा

घेतला. या समितीने दांडेकर समितीच्या शिफारशींची कितपत अंमलबजावणी झाली याचे परिक्षण करून १९८४ च्या तुलनेत १९९५ साली अनुशेष किती वाढला किंवा कमी झाला या बाबतची क्षेत्र निहाय पाहणी करून अहवाल सादर केला.

३१ मे २०११ रोजी माननीय राज्यपालांनी समतोल प्रादेशिक विकासाच्या संबंधी उच्च स्तरीय समितीचे (केळकर समिती) गठन केले. विकासाचे एकच सूत्र महाराष्ट्र राज्यातील सर्वच प्रदेशांसाठी एकसारखे लागू होणार नाही हे तत्व विचारात घेऊन प्रदेशातील भौतिक संसाधनांची उपलब्धता, सामाजिक भांडवलाची जमवाजमव, शासकीय धोरण, भौतिक पायाभूत संरचना, संस्थात्मक क्षमता, प्रादेशिक राजकीय नेतृत्व, सुशासन आणि व्यवसाय करण्यासाठी लागणारा व्यवहार खर्च असे विकासाचे अनेक पैलू समितीने लक्षात घेतले तसेच सामाजिक भांडवल आणि उद्यम शीलता हे घटक देखील प्रादेशिक असमतोलाचा विचार करतांना उपयोगात आणावे असे सूचविले. प्रादेशिक आर्थिक वृद्धीची व्युहरचना आणि विकास निती आखतांना जलद विकास साध्य करणारे घटक ओळखणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत मागास प्रदेशाचा विकास जलद गतीने न होण्यास काही त्रुटी आढळतात. १.कृषी आणि उद्योगांची उर्जा-गरज, २. कृषी आणि उद्योगांसाठी लागणारा पाणी पुरवठा, ३. खासगी गुंतवणुकी आकृष्ट करण्याची क्षमता, ४.सामाजिक भांडवली आणि संस्थात्मक रचना, ५.शासन कर्त्यांची गुणवत्ता/सुशासन, ६.कौशल्य विकास, ७.आर्थिक व्यवहारासाठी कर्ज सोयी.

**महाराष्ट्राची सद्यस्थिती :**

महाराष्ट्रातील असमतोल, सद्यस्थिती आणि आव्हाने या विषयावरील निबंध लेखक असमतोलाचा अभ्यास विकासाशी निगडीत विविध घटकांच्या सहाय्याने करू शकतील. या बाबतची विस्तृत चर्चा उपरोक्त परिच्छेदात केली आहे. सद्यस्थिती विचारात घेतांना पुढील बाबींचा उहापोह करता येईल. १.वित्त पुरवठ्याचे नव्याने बदललेले स्त्रोत-पूर्वी संपुर्ण भर शासनावर राहात असे आता सार्वजनिक-खासगी भागीदारी या सारखी रचना पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी अस्तित्वात आली आहे. विकासाच्या प्रक्रियेत दानशुरांची भूमिका देखील आता महत्त्वपूर्ण ठरते आहे. निगम सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility) सारख्या योजना आल्याने प्रादेशिक असमतोलाबाबत वेगळ्या दृष्टीने विचार करावा लागेल. २. सिंचनाच्या संदर्भात ठिबक सिंचन, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हे १९८४ साली दांडेकर समितीच्या वेळी विशेष लोकप्रिय नव्हते. ३. जागतिक व्यापार संघटना आणि त्याचे विविध क्षेत्रावर झालेले परिणाम प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करतांना विचारात घेता येतील. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक कोणत्या घटकांनी प्रभावित होते. प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात या गुंतवणुकीच्या योगदानाचा अभ्यास करण्यास देखील वाव आहे. ४. निवडुन येणाऱ्या आमदार/खासदारांमध्ये तसेच राजकीय पक्षांमध्ये सातत्याने निवडून येण्याचे सामर्थ्य आर्थिक विकासावर कसा परिणाम करू शकतात? ५. शेजारी असलेल्या राज्यांचे आर्थिक धोरण देखील संबंधित प्रदेशाच्या विकासावर परिणाम करतात. उदा. वीज पुरवठा

शेजारच्या राज्यात तुलनात्मक दृष्ट्या स्वस्त दरात उपलब्ध झाल्यास उद्योगांची स्थापना त्या राज्यात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या राज्याला भेडसावत असलेल्या अशा अनेक समस्यांचा उहापोह निंबध लेखकांना शक्य आहे.

**प्रादेशिक असमतोल आव्हाने :**

प्रादेशिक असमतोलाची अनेक आव्हाने आहेत. १. राजकीय अस्थिरता आणि राज्य शासनावरील ढळता विश्वास, २. प्रगत प्रदेशांकडे मोठ्या प्रमाणावर होत असलेले स्थलांतर आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या नागरीकरणाच्या समस्या, ३. मागासलेपणामुळे होत असलेली वेगळ्या राज्याची मागणी, ४.मंत्रालयात कार्यरत असणाऱ्या नोकरदार वर्गाचे प्रतिनिधित्व-मागास भागातील लोक मंत्रालयात नसल्यास कामे खोळंबुन राहणे, ४. वन संपत्ती, पर्यावरण आणि आर्थिक विकास यातील संतुलन साधण्याचे आव्हान, ५. मागासलेपणा निश्चित करतांना तालुका निहाय विचार व्हावा की जिल्हा घटक असावा या बाबतचा देखील उहापोह निबंध लेखकांना करता येईल., ६. संतुलीत विकास म्हणजे नेमके काय ? राज्यातील सर्व प्रदेशामध्ये समप्रमाणात गुंतवणुकी झाल्यास मागासलेपणा कमी होण्यास मदत होईल का? निबंध लेखकांना प्रादेशिक असमतोला बाबतचा विचार करतांना समतोल विकासाची नेमकी व्याख्या करता येईल. महाराष्ट्रातील अनुशेष सद्य स्थिती आणि आव्हाने या गंभीर आणि महत्त्वपूर्ण विषयावर लेख लिहितांना लेखकांनी पुढील बाबी प्रामुख्याने ध्यानात घ्याव्या :

१) समतोल प्रादेशिक विकासाची सैद्धांतिक संकल्पना विशद करून महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात विकासाशी निगडीत विविध पैलुंचा उहापोह लेखकांना करता येईल.

२) शासनाच्या निधी वाटपात राज्यातील विविध प्रदेशांना प्राप्त होत असलेला हिस्सा आणि त्यात होणारे बदल या बाबतची आकडेवारी देऊन प्रादेशिक असमतोला बाबत भाष्य करणे शक्य होईल. या संदर्भात मा. राज्यपालांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे विश्लेषण देखील उपयुक्त ठरेल.

३) सार्वजनिक क्षेत्रातील संसाधनांचा वापर आणि कार्यक्षमतेने करण्याच्या दृष्टीने आवश्यक संस्थात्मक सुधार आणि जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी खाजगी गुंतवणुकीचा प्रवाह वाढविण्याच्या अनुषंगाने खाजगी व्यवसाय सुरू करण्यास लागणाऱ्या खर्चावर कसे नियंत्रण आणता येईल? या बाबतचा अभ्यास देखील करण्यास वाव आहे.

४) समतोल विकासाचे सातत्य टिकुन राहण्यासाठी प्रादेशिक आणि स्थानिक पातळीवर अधिकाधिक सक्षमीकरण व्हावे आणि जबाबदारी निश्चित करता यावी या दृष्टीने आवश्यक यंत्रणा काय असावी? या संदर्भात देखील लेखकांना विचार करता येईल.

५) प्रदेश निहाय दारिद्र्याचे प्रमाण आणि दरडोई उत्पन्नाचे विश्लेषण करून महाराष्ट्र राज्यातील असमानता देखील लेखकांना दर्शविता येऊ शकेल. स्वतंत्र राज्य स्थापन झाल्यास प्रदेशातील मागासलेपणा कमी होणे शक्य आहे का? या बाबतही लेखकांना मांडणी करण्यास वाव आहे.

६) जल संसाधने, सिंचन, आरोग्य, शिक्षण, रस्ते विकास अशा विविध घटकांबाबत माहिती संकलित करून प्रादेशिक स्तरावर कृषी, उद्योग

आणि सेवा क्षेत्र यांच्या आर्थिक विकासातील योगदानाबाबत प्रदेशानुरूप भाष्य करता येईल.

७) सामाजिक आणि राजकीय घटक आर्थिक विकासाला कसे प्रभावित करतात या बाबतचे विश्लेषण देखील उपयुक्त होऊ शकेल.

८) महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील/जिल्ह्यातील मानवी विकासाबाबतची माहिती संकलित करून प्रादेशिक अनुशेष दर्शविता येऊ शकेल.

९) वैधानिक विकास मंडळाची प्रादेशिक विकासातील भूमिका या एका स्वतंत्र पैलूचा अभ्यास लेखक करू शकतील.

१०)इतर राज्यांनी (जसे कर्नाटक) सादर केलेल्या अहवालांचा देखील आढावा घेऊन महाराष्ट्र राज्यातील विकासाच्या असमानतेबाबत चर्चा करता येईल.

महाराष्ट्रातील अनुशेष सद्य स्थिती आणि आव्हाने या विषयावर निबंध लिहितांना लेखकांना पुढील काही ग्रंथ उपयुक्त ठरू शकतात.


1] *Directives of the Government of Maharashtra under rule 7 of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the Rest of Maharashtra order 201, for the regionwise distribution of outlays in the Annual Plan.*

2] *Economic Survey of Maharashtra*, Government of Maharashtra.

3] *Report of the Fact Finding Committee on Regional Imbalance in Maharashtra* (1984) Planning Department, Bombay, Government of Maharashtra (GOM.)

4] *Report of Fact Finding Team of Vidarbha* (2006). Regional Disparities and Rural Distress in Maharashtra with particular reference to Vidarbha, Planning Commission Government of India.

5] *Performnance Evaluation of Statutory Development Board in Maharashtra* (2003) Programe evaluation organisation Planning commission, Government of India.

6] *Maharashtra Human Development Report* 2012 : Towards Inclusive Human Development. Yashwantrao Chavan Academy of Development Administration, Pune

7] *Report of the Indicators and Backlog Committee* Vol.I (1997) and Vol.2 (2000) Maharashtra.

8] Government of Karnataka - *Dr. Nanjundappa's Report* (2010).



हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

# अर्थ शब्दांची वाट पाहे
# खाद्य सुरक्षा
# (Food Security)

**ज. फा. पाटील, कोल्हापूर,**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

**खाद्य सुरक्षा** (Food Security):

देशाच्या लोकांसाठी, आरोग्य व कार्यक्षमतेस योग्य प्रमाणात व संतुलित रचनेचे अन्न पोषण वेळोवेळी मिळत राहण्याची आर्थिक व्यवस्था म्हणजे अन्न सुरक्षा. सध्या तरी देशात अन्न सुरक्षा अध्यादेश गरजू नागरिकांसाठी अमलात आला आहे. पण देशाच्या मतदान करू न शकणाऱ्या करोडो दुभत्या व कष्टकरी जनावरांच्या विश्वसनीय व्यवस्थेचे काय ? याचा विचार कायदे मंडळांच्या पातळीस झालेला दिसत नाही. दुष्काळाच्या काळात चारा छावण्या किंवा जनावरांचे सामुदायिक तत्कालिन गोठे एवढाच प्रकार सध्या आहे. श्री. राहुल कुमार यांनी (Food Security for non voter) या इकॉनॉमीक टाईम्सच्या ९ ऑगस्ट २०१३ च्या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखात या प्रश्नाची चर्चा प्रथमच केलेली दिसते. भारतामध्ये एका बाजूस वाळल्या चाऱ्यात २५%, ओल्या चाऱ्यांच्या बाबतीत ६५% व पेंडेच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात पुरवठ्याची कमतरता असताना आपण मोठ्या प्रमाणात धान्य कोंड्याची व पेंडेची दर वर्षी ८५०० कोटी रुपयांची निर्यात करतो. अशी निर्यात नियंत्रित केल्यास मुक्या बिचाऱ्या जनवरांना अधिक प्रमाणात खाद्य मिळेल. परिणामी लोकांना अधिक प्रमाणात प्रथिने (मांस, मासे, कोंबड्या, अंडी इत्यादी) मिळतील. यासाठी अन्न सुरक्षेप्रमाणे जनावरांसाठी खाद्य सुरक्षा (Food Security) कायदा करणे आवश्यक आहे.

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद,<br>द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर,<br>गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया,<br>जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं. ३०, परिमल<br>कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे,<br>शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी<br>स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६,<br>एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल<br>जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३<br>समोर, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक